म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ४९८

REFEK-0019243

४८८

# न्यायमूर्ति पंडित केशवरावसाहेब

यांचें

# अल्पचरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०२५
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. चरित्र नं.
ता. ८.१२.३३
ठाणें.

लेखक

काशिनाथराव वैद्य, एम्. ए., एलएल्. बी.,
ॲडव्होकेट, दक्षिण हैद्राबाद.

REFBK-0004836

४८८४

१९३३

# कै. न्यायमूर्ती केशवराव

लंडन येथें मे. इ. स. १९२९ सालीं घेतलेला फोटो



जन्म इ. स. १८६७ मृत्यू ता. २१ मे, इ. स. १९३२

# प्रस्तावना.

न्यायमूर्ति केशवरावसाहेब यांचें हें अल्प चरित्र, त्यांच्या पहिल्या सांवत्सरिक श्राद्धतिथीचे दिवशीं लोकसेवेस सादर करीत आहें. न्या. केशवरावसाहेब हे हैद्राबाद संस्थानांत 'रावसाहेब' ह्या नांवानें संबोधिले जात व आम्हीही ह्या चरित्रांत त्या नांवाचाच उपयोग केला आहे. महाराष्ट्रांत 'रावसाहेब' ह्या नांवानें न्या. महादेव गोविंद रानडे हे ओळखले जात असत. त्यांचें ब्रिटिश हिंदुस्थानांत जितकें महत्व होतें, तितकेंच आमच्या 'रावसाहेबांचें' आमच्या या निजाम इलाख्यांत होतें. हैद्राबाद संस्थानांतील सार्वजनिक कार्यांचा इतिहास पुढेंमागें कोणी लिहिला, तर रावसाहेबांच्या कामगिरीचा उल्लेख त्यास पहिल्या प्रथम करावा लागेल. या संस्थानांतील बहुधा सर्व सार्वजनिक चळवळींचे ते जनक होते, व सार्वजनिक कार्यांबद्दल त्यांची कळकळ प्रसिद्ध होती. ह्या संस्थानांतलि परिस्थितीच्या मानानें येथें आतांपर्यंत ज्या कांहीं चळवळी झाल्या, त्या त्यांच्या कळकळीमुळेंच होऊं शकल्या व दुसऱ्या कार्यकर्त्यांसही त्यामुळें प्रोत्साहन मिळालें. त्यांचें चरित्र म्हणजे हैद्राबाद संस्थानांतलि गेल्या तीस चाळीस वर्षांच्या चळवळींचा इतिहासच होय.

त्यांच्या निधनानंतर, येथील स्थानिक वर्तमानपत्रांत त्यांचें चरित्र कोणीं लिहावें, ह्याबद्दल थोडीबहुत चर्चा झाली. त्यांत माझें नांव सुचविलें गेलें होतें. गेलीं पंधरा वर्षें त्यांचा माझा निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या चळवळींत निकट संबंध आला. त्यामुळें व त्यांच्या चरित्रापासून भावी कार्यकर्त्यांना परिस्थितीची थोडीबहुत कल्पना यावी म्हणून हें अल्पसें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

या कार्यांत माझे मित्र रा. दिगंबरराव बिंदु ह्यांनीं बराच हातभार लावला व श्री. राघवेंद्र शर्मा यांनीं जी मदत केली ह्याबद्दल ह्या मित्रद्वयाचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. अगदीं थोड्या अवधींत म्हणजे केवळ पंधरा दिवसांत हें पुस्तक सुबक रीतीनें छापून दिल्याबद्दल आर्यभूषण छापखान्याच्या चालकांचाही मी आभारी आहें. रावसाहेबांच्या प्रथम श्राद्धतिथीचे (ता. २१ मे १९३३)दिवशींच हें पुस्तक प्रसिद्ध करतां आलें, याचें सर्व श्रेय त्यांचेकडेच आहे.

न्या. केशवरावसाहेब यांचे चहाते व मित्र निजाम इलाख्यांत पुष्कळच आहेत; पण ब्रिटिश हिंदुस्थानांतही त्यांची संख्या कमी नाहीं. या सर्वांस ही अल्प सेवा मान्य होईल अशी आशा आहे.

रेसिडेंसी बाजार,
हैद्राबाद दक्षिण.
ता. २१ मे १९३३

सर्वांचा नम्र,
**का. सि. वैद्य.**

# अनुक्रमणिका.


| विषय | पान |
|---|---|
| ( १ ) बालपण व कौटुंबिक स्थिति ... ... ... | १ |
| ( २ ) गुलबुर्गा येथील वकिली ... ... ... | ९ |
| ( ३ ) हैद्राबाद येथील वकिली ... ... ... | १६ |
| ( ४ ) न्यायासनावरील कामगिरी ... ... ... | २४ |
| ( ५ ) सार्वजनिक कामें (सभा व शिक्षणसंस्था ) ... ... | ३४ |
| ( ६ ) सार्वजनिक कामें ( सामाजिक व इतर चळवळी ) ... | ४५ |
| ( ७ ) स्वभाववर्णन ... ... ... | ५९ |
| ( ८ ) शेवटचे दिवस ... ... ... | ७० |



कै० न्या. मू. केशवराव कोरटकर.

४८३६

# न्यायमूर्ति पंडित केशवराव यांचें अल्पचरित्र.

ग्रंथ संग्रह नों. ६०२५
ग्रंथ संग्रहालय स्थल चरित्र नं. ता. ८-१२-३३

## प्रकरण १ लें.

### बालपण व कौटुंबिक स्थिति.

न्या. पं. केशवराव यांचा जन्म सन १२७७ फ. (इ. स. १८६७) या वर्षी हैद्राबाद संस्थानांतील मौजे पुरजळ, ता. बसमत, जिल्हा परभणी ह्या आपल्या आजोळच्या गांवीं झाला. त्यांचें मूळ गांव त्याच तालुक्यांतील 'कोरटें' या नांवाचें एक खेडें असून त्यांच्या घराण्यांत तेथील जोशीपणाची वृत्ति पूर्वींपासून चालू आहे. त्यामुळें ते केव्हां केव्हां 'मी जोशी आहें' असें आपल्या व्याख्यानांत अभिमानानें म्हणत. केशवराव साहेबांच्या वडिलांचें नांव संतुकराव होते. संतुकरावांना एकंदर पांच अपत्यें होतीं, चार मुलगे व एक मुलगी. केशवराव साहेब हे त्यांचे द्वितीय चिरंजीव होत. वडील मुलाचें नांव तात्या होतें. रावसाहेबांचे धाकटे दोन बंधु एक नारायणराव व दुसरे गणपतराव. रा. नारायणराव हे गुलबर्गा येथें राहून रावसाहेबांच्या जमीनजुमल्याची व्यवस्था पहात असतात. रा. गणपतराव हें सर्वांत धाकटे असून अत्यंत बुद्धिमान् आणि अभ्यासी होते. ते सतरा अठरा वर्षांच्या वयांतच मॅट्रिकचा अभ्यास करीत असतां वारले. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल केशवराव साहेबांस पुष्कळच आशा वाटत होती व त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल ते नेहमीं

अभिमानानें व कौतुकानें उल्लेख करीत असत. त्यांच्या थोरल्या बहिणीचें नांव बाळूबाई असून त्या गुलबुर्गा मुक्कामीं असतात. यांचें लग्न रा. हरि रावजी शेष यांच्याशीं झालें होतें. हरिराव शेष हे सुप्रसिद्ध कवि वामन पंडित यांच्या घराण्यांतील होते. हे सरकारी नौकरींत असून, सदर अदालत सुभे गुलबुर्गा येथील शिरस्तेदारीच्या जागेवर असतांना त्यांनीं पेन्शन घेतलें होतें.

केशवरावजींच्या बालपणीं त्यांच्या स्वतःच्या किंवा आजोळच्या गांवीं प्राथमिक शिक्षणाची मुळींच सोय नव्हती व त्यांना दुसऱ्या ठिकाणीं शिक्षणाकरितां ठेवण्याइतकी त्यांच्या वडिलांची सांपत्तिक स्थितिही अनुकूल नव्हती. रा. संतुकराव हे त्यावेळीं एका सावकाराचे घरीं दरमहा ३ रुपये पगारावर नौकर होते. त्यांचे वडील चिरंजीव तात्या हेही पुरजळ येथील रुद्रवार या सावकाराकडे दरमहा ५ रुपये मिळवीत. स्वतः रावसाहेबही त्याच सावकाराचे घरीं देवपूजा करून आपल्या कपड्यालत्त्याचा भार आपल्या वडिलांवर पडूं देत नसत. याप्रमाणें घरची गरिबी होती. शिवाय तेव्हांच्या परिस्थितीच्या मानानें व लोकांच्या दृष्टीनें शिक्षणाला या इलाख्यांत फारसें महत्त्वहि दिलें जात नसे. त्यामुळें केशवरावजींस शाळेंतील शिक्षणाचा विशेष लाभ होऊं शकला नाहीं. जें थोडें बहुत शिक्षण झालें तें त्यांनीं स्वतः आपल्या प्रयत्नानें प्राप्त करून घेतलें. त्यावेळीं क्रमिक किंवा इतर पुस्तकेंही मिळणें बरेंच कठीण होतें. म्हणून ते दुसऱ्याचीं पुस्तकें आणून स्वतः आपल्या हातानें त्यांची नकल करून घेत. ह्यामुळें त्यांचीं मोडी व उर्दू हस्ताक्षरें फार वळणदार होतीं.

वडील माणसांचें मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष्य नाहीं, समाजांत मुलें सुशिक्षित असावीं अशी भावना नाहीं, शिक्षणाचीं साधनेंही उपलब्ध नाहींत व शिक्षणाबद्दल चोहोंकडे अनास्था, अशा परिस्थितींत रावसाहेबांनीं आपल्या बाळपणांत जें थोडेंबहुत ज्ञान संपादन केलें तें खरोखरच अभिनंदनीय होतें असें म्हटलें पाहिजे. त्यांची बुद्धि कुशाग्र

होती व बालपणापासूनच ज्ञान संपादन करण्याची त्यांची हौस वाखा-णण्यासारखी होती. त्यांच्या परिस्थितींत दुसऱ्या एकाद्या सामान्य व्यक्तीस साधारण शिक्षणसुद्धां संपादन करणें अशक्य होतें. रावसाहेब सन १२८६ (इ. स. १८७६) फसलींत म्हणजे आपल्या वयाच्या ९ व्या वर्षीं आपले मेहुणे रा. हरिराव शेष यांचेकडे गुलबुर्गा मुक्कामीं गेले; व तेथें त्यांनीं उर्दू व फारशी भाषेचाही अभ्यास केला.

त्या काळीं संस्थानांतील पांढरपेशा हिंदूंपुढें कोणतीही फारशी महत्त्वाकांक्षा नव्हती. दहावीस रुपयांची कशीबशी नौकरी मिळाली व दोन हांताचे चार हात होऊन एक दोन मुलें झालीं म्हणजे ते आपणांस कृतकृत्य समजून आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असें ते मानीत असत. त्यांतल्यात्यांत दहावीस रुपयांचीच कां होईना सरकारी नौकरी मिळणें हें महत्‌भाग्य समजलें जाई. त्यावेळच्या या ध्येयाच्या मानानें रा. हरिराव यांनीं सन १२९२ ( इ. स. १८८२ ) फसलींमध्यें केशवरावजींस तहसील कचेरींत १५ रु. पगाराचे नौकरीवर चिकटविलें. केशवराव यांचें वय त्यावेळीं लहान होतें व स्वाभाविकपणें ते सरळ मनाचे, मेहनती व उत्साही असल्यामुळें, तहशीलदारसाहेबांची मर्जी त्यांचेवर लवकरच बसली व तहशीलदारसाहेबांना अशी इच्छा झाली कीं, कशाही रीतीनें केशवरावांना दोन पैसे जास्त मिळावे; म्हणून त्यांस त्यांनीं नगदी कारकून नेमिलें. त्यावेळीं नगदी कारकुनाची जागा अशी असे कीं, प्रयत्नांशिवाय सुद्धां महिन्याकांठीं शंपन्नास रुपयांची मिळकत सहज होत असे, परंतु रावसाहेबांनीं या जागेचा मुळींच फायदा करून घेतला नाहीं व तहशीलदारसाहेबांनीं एकदां असेही उद्गार काढिले कीं "अरे 'केशू'* तुझें पुढें कसें व्हावें, तुझा संसार कसा चालावा, व तुला चार पैसे कसे मिळावे?" याप्रमाणें रावसाहेबांनीं तहशील कचेरींत तीन वर्षें नौकरी केल्यानंतर सदर अदालतींत २५ रु. पगाराची त्यांना नौकरी मिळाली. ही नौकरीही त्यांनीं दोन वर्षें केली.

* 'केशव' हा शब्द उर्दूत लिहिला असतां 'केशू' असाही वाचला जातो.

रावसाहेब हे स्वत: त्या वेळच्या समाजाला खरोखर अपवाद होते. त्यांना नोकरींत राहणें मनापासून मुळींच आवडेना. त्यांची महत्त्वाकांक्षा फार मोठी होती. त्यामुळें त्यांना आपल्या आकुंचित परिस्थितींत बरें वाटेना, सरकारी नोकरींत विशेष प्रगति करितां येणार नाहीं हें ते पूर्णपणें जाणून होते त्यामुळें त्यांच्यापुढें प्रगतीचा एकच मार्ग मोकळा होता व तो म्हणजे वकिली हा होय.

नौकरी करीत असतांनाच त्यांनीं वकिलीचा अभ्यास सुरू केला व ते एकाच वर्षीं ज्युडिशिअल व वकिलीच्या परीक्षेस बसले आणि त्याच वर्षीं म्हणजे १२९९ फसली ( इ. स. १८८९ ) या सालीं ज्युडिशिअलच्या परीक्षेंत वरिष्ठ वर्गात व वकिलीच्या परीक्षेंत दुसऱ्या वर्गात पास झाले. ज्युडिशिअल परीक्षेंत वरिष्ठ वर्गात उत्तीर्ण झाल्यामुळें त्यांस हायकोर्टाची सनद मिळाली. त्यानंतर वास्तविक त्यांस पुन्हां वकिलीच्या पहिल्या वर्गाच्या परीक्षेस बसण्याचें कारण नव्हतें. परंतु पहिल्या वर्षीं आपले इच्छेप्रमाणें यश मिळालें नाहीं ही भावना व दुसरें कारण म्हणजे लोकसमज असा होता* कीं ज्युडिशिअल परीक्षा अगदीं सोंपी व या परीक्षेस बसून कोणीही पास व्हावें.

ह्या दोन कारणांमुळें ते पुढल्या म्हणजे सन १३००फ.(इ.स.१८९०) या वर्षीं पुन्हां वकिलीच्या परीक्षेस बसले व त्यांत त्यांनीं अभिनंदनीय यश संपादन केलें.

---

*हैद्राबाद संस्थानांतील त्या वेळच्या नियमाप्रमाणें वकिलीचे परीक्षेस बसण्याकरितां दुय्यम किंवा उच्च शिक्षणाची अमूक परीक्षा पास झाली पाहिजे अशी अट नव्हती. आणि कोणीही विद्यार्थी वकिलीच्या परीक्षेस बसूं शके. संस्थानांत एक वकिलीची व दुसरी ज्युडिशिअल अशा दोन परीक्षा आहेत. वकिलीच्या परीक्षेंत पहिला, दुसरा व तिसरा असे तीन वर्ग आहेत. ज्युडिशिअलचेही वरिष्ठ व कनिष्ठ असे दोन वर्ग आहेत. वरिष्ठ वर्गाची परीक्षा पास होणारास पहिल्या वर्गाची वकिलीची सनद मिळत असे व कनिष्ठ वर्गात पास होणारास दुसऱ्या वर्गाची सनद मिळत असे.

आजपासून चाळीस वर्षांपूर्वी संस्थानांत वकिलीचा धंदा चांगलाच फायदेशीर होता. वकिलांची संख्या बरीच कमी होती व लोकांची सांपत्तिक स्थिति चांगली असे, व मध्यम स्थितींतील मनुष्यसुद्धां केवळ जामिनावर मोकळे राहण्याचा हुकूम मिळविण्याकरितां दोन दोन चार चार हजार रुपये फी वकिलांना देत असे. हल्लींपेक्षां तेव्हां लोकांना अब्रूची चाड जास्त वाटत होती, किंवा कोर्टाचा व त्यांचा संबंध विशेष न आल्यामुळें कोर्टांत जाणें अपमानास्पद वाटत असे. साध्या फौजदारी खटल्यांत सुद्धां अब्रूला धक्का न बसतां सुटका होण्याकरितां ते आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवण्यास सुद्धां तयार होत असत. हल्लीं मात्र याच्या उलट स्थिति दिसेल. पुष्कळ वेळां आतां पक्षकार असा विचार करतात कीं, आपणास किती दंड द्यावा लागेल व वकिलाला तेवढी किंवा त्यापेक्षां जास्त फी देण्यापेक्षां दंडाची रक्कम देऊन मोकळें होणें जास्त शहाणपणाचें समजतात. त्या काळीं दिवाणी दावेसुद्धां जे अटीतटीचे असत तेच दाखल होत. त्यामुळें दिवाणी दाव्यांत सुद्धां चांगली फी मिळत असे. दाव्याच्या रकमेवर वकिलांची फी शेंकडा अमुक टक्के अशी ठरत नसे; तर शेंकड्यांनीं फी ठरत असे, व केव्हां केव्हां वकिलांना भांडण जितक्या रकमेचें असे तितकी रक्कम सुद्धां फी म्हणून मिळत असे. पुष्कळ वेळां यश आल्यावर वकिलाला फीच्या ठरावाशिवाय बक्षीस म्हणूनही चांगली रक्कम मिळत असे. बक्षिसाची पद्धत संस्थानांत पूर्वीपासून प्रचलित आहे व अजून सुद्धां येथें असा परिपाठ आहे कीं, पक्षकार वकिलाची जी फी ठरवितात त्यांतील निम्मी फी अगोदर देतात व निम्मी फी मागाहून देण्याचा करार करितात. मागाहूनची निम्मी फी पक्षकार बक्षिसादाखलच समजत असतो व वकीलही यश संपादन झालें तरच त्याची आशा धरतो. मात्र हल्लींच्या परिस्थितीमुळें पक्षकाराची ही खटपट असते कीं कायद्यानें शेंकडा ५ किंवा ३ टक्के जी फी ठरली आहे, तितकी किंवा त्यापेक्षां कमी फीचा ठराव वकिलांशीं करावा व ठरावांतील निम्मी

रक्कम आधीं द्यावी, व वकिलाचा उलट प्रयत्न असा असतो कीं कार्य-र्थ्यानें ठरविलेली पूर्ण फी अगोदर द्यावी व यश संपादन झाल्यास तितकीच फी बक्षिसादाखल द्यावी. वास्तविक त्याकाळीं फीच्या ठरावा-करितां वकिलांना फारशी घासाघीस करावी लागत नसे.

त्या वेळची वकिलीची जी स्थिति वर वर्णन केली आहे त्यावरून वाच-कांच्या लक्षांत आलें असेल कीं, रावसाहेबांची वकिली चांगलीच चालली व ते स्वत: बुद्धिमान् व मेहनती असल्यामुळें चांगले वकील म्हणून फार लवकर नांवाजले. याच सुमारास रावसाहेबांचा विवाह होऊन, त्यांच्या गृहस्थाश्र-मास सुरवात झाली. त्यांच्या कुटुंबाचें नांव गीताबाई असून त्यांचें माहेर ता. कळम जिल्हा धाराशीव ( उस्मानाबाद ) येथें आहे. श्री. गीताबाई यांचा कळंब येथील देशमुखांच्या घराण्यांत जन्म झाला. रावसाहेब यांस तीन चिरंजीव व एक कन्या अशीं चार अपत्यें आहेत. वडील चिरंजीव रा. विनायकराव यांचें शिक्षण अगदीं लहानपणापासून गुरुकुल कांगडी (हरिद्वार) येथें झालें. रावसाहेबांच्या मनावर आर्य समाजाच्या तत्त्वांचा व चळवळींचा बराच परिणाम झाला होता व संस्थानांतील आर्य समा-जाचे ते एक मोठे आधारस्तंभ होते. कांगडी येथील गुरुकुलाची शिक्षण-पद्धति त्यांस फार आवडली. त्यामुळें त्यांनीं विनायकराव यांस गुरु-कुलाच्या नियमाप्रमाणें त्यांचे आठवे वर्षीच तेथें पाठविलें. विनायकरावांच्या मातुश्रीस साहजीकच पुत्रप्रेमामुळें आपल्या पहिल्या मुलास आपणा-पासून दूर ठेवण्याची इच्छा नव्हती. मुलगा पुढें चौदा वर्षेपर्यंत गुरु-कुलाच्या नियमाप्रमाणें घरीं येणार नाहीं व आपणासही ह्या मुदतींत त्याचें दर्शन होणार नाहीं ही कल्पना त्यांस असह्य झाली. त्यामुळें त्यांनीं बराच विरोध केला. परंतु रावसाहेबांची तत्त्वनिष्ठा फार जबर होती व त्यांचा स्वभाव चांगलीं कामें करण्यांत हट्टी होता. त्यांनीं आपल्या कुटुंबास न कळवितां विनायकरावांस गुलबर्ग्यास घेऊन जातों असें सांगून मुलास गाडींत बरोबर घेऊन थेट गुरुकुलास पोहोंचविलें.

विनायकरावांच्या मातोश्रीस मागाहून जेव्हां हें वृत्त समजलें तेव्हां त्यांच्या मनावर बराच परिणाम झाला. रा. विनायकराव चौदा वर्षे गुरुकुलांत ब्रह्मचर्याश्रमांत राहून तेथील स्नातक झाले व त्यांनीं "विद्यालंकार" ही पदवी मिळविली. हे जेव्हां आपला अभ्यासक्रम संपवून हैद्राबादेस आले तेव्हां ते आपली मातृभाषाहि विसरले होते, व हिंदींतच भाषण करीत असत. त्यावेळेस संस्कृत भाषेंत व्याख्यान देण्याइतकी त्यांची तयारी असे, व त्याप्रमाणें त्यांनीं दोनतीन व्याख्यानें संस्कृत भाषेंत दिलींही. गुरुकुलाहून आल्यानंतर रा. विनायकराव बॅरिस्टरीच्या अभ्यासाकरितां विलायतेस गेले. ते लंडन युनिव्हर्सिटीचें एल एल. बी. असून बॅरिस्टर आहेत, व सध्यां हैद्राबाद येथील प्रसिद्ध वकील आहेत. ते येथील "दक्कन लॉ रिपोर्ट" ह्या नांवाचें कायद्याचें मासिक पुस्तक चालवितात. या मासिकांत हैद्राबाद हायकोर्टाचे महत्त्वाचे ठराव छापले जातात. ज्याप्रमाणें ब्रि. हिंदुस्थानांत प्रत्येक हायकोर्टाच्या महत्त्वाच्या ठरावांचीं मासिकें निघतात, तशाच पद्धतीचें हेंही मासिक आहे. रावसाहेबांचे द्वितीय चिरंजीव रा. विठ्ठलराव हें ॲब्रिस्टविथ (वेल्स) युनिव्हर्सिटीचें एलएल. बी. असून हैद्राबाद हायकोर्टाची वकिलीची सनद घेतली आहे. विलायतेंत असतांना ते बॅरिस्टरीच्या टर्म्स भरीत होते व अजून त्यांच्या सर्व टर्म्स भरून झाल्या नव्हत्या, तोंच त्यांस एकाएकीं परमपूज्य वडिलांच्या निधनाची बातमी मिळाली व ते तसेच आपल्या मातोश्री व बंधूंस भेटण्यास येथें आले. त्यांचा मराठी वाङ्मयाचा अभ्यास चांगला आहे, व ते आधुनिक काव्याचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनीं मराठी भाषेंत पुष्कळशा कविता लिहिल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रसिद्धही झाल्या आहेत. त्यांनीं आपल्या कवितांचें एक छोटेसें पुस्तक "कुंदाच्या कळ्या" ह्या नांवानें प्रसिद्ध केलें आहे. रावसाहेबांचे सगळ्यांत धाकटे चिरंजीव रा. रामराव हे हल्लीं कराची येथें वैमानिक इंजिनीयर आहेत. विलायतेंत क्रॉयडॉन येथें त्यांचें वैमानिक शिक्षण झालें असून, महाराष्ट्रांतील पहिल्या वैमानिकांपैकीं ते एक

आहेत. हे फार धाडशी स्वभावाचे आहेत व वैमानिक शिक्षण संपादणें हें त्यांच्या धाडशी स्वभावाचें द्योतक होय. हेही मराठीचे एक लेखक असून, त्यांचे वैमानिक विद्येबद्दल चित्रमयजगत्‌मध्यें वेळोवेळीं आलेले लेख प्रसिद्धच आहेत. रावसाहेबांची कन्या सौ. गंगूबाई ( सासरचें नांव सिंधूबाई ) ह्यांचें शिक्षण पुणें येथील ‘ हिंगणें व हुजूर पागे ’ त झालें आहे. त्यांचा विवाह येथील सुप्रसिद्ध बॅरिस्टर रा. श्रीनिवास शर्मा ( रा. राघवेंद्रराव शर्मा ह्यांचे कनिष्ठ बंधु ) ह्यांच्याशीं झाला आहे.

# प्रकरण २ रें

## गुलबुर्गा येथील वकिली

रावसाहेबांनीं गुलबुर्गा मुक्कामीं पांच सहा वर्षें वकिली करून चांगली मिळकत व यश संपादन केलें. त्यांची वकिलीची पद्धत अशी असे कीं, आपल्या खटल्याची पूर्ण तयारी केल्याशिवाय ते कधींही कोर्टांत जात नसत. खटल्याच्या तयारींत कोर्टांतील कागदपत्र पहाणें हा महत्त्वाचा भाग असे. त्यांचें नेहमीं असें म्हणणें असे कीं, अस्सल कागदपत्र जे कोर्टांत दाखल होतात ते वकिलांनीं अवश्य पाहिले पाहिजेत. कारण त्यामुळें पुष्कळ नवीन गोष्टी वकिलाला सुचतात व कोर्टाच्या फाईलींत पुष्कळ असेही कागद असतात कीं, ज्याबद्दल पक्षकार वकिलास बरोबर माहिती देत नाहीं किंवा पक्षकारास त्या कागदांचें महत्त्व माहीत नसल्यामुळें तो वकिलाचें त्या कागदांकडे लक्ष वेधीत नाहीं. विशेषतः अपील कोर्टामध्यें तरी काम चालवितांना खालच्या कोर्टाची फाईल पाहणें ते अत्यंत अवश्यक समजत. संस्थानांतील कोर्टाचें सर्व काम उर्दू भाषेंत चालतें व उर्दू लिहिण्याची 'शिकस्ता'* म्हणून जी पद्धत आहे त्या पद्धतीनें लिहिलेलें उर्दू वाचणें फार कठीण जातें, त्यांत वकील लोकांच्या स्वतःच्या ऑफिसच्या फाइली वाईट स्थितींत ठेवलेल्या असतात. कोर्टांत जे अर्ज दाखल होतात ते वकिलांच्या फाइलींत पुष्कळ वेळां नसतातच व असलेच तर ते अगदीं रद्दी कागदावर, पेन्सिलीनें दहा पांच ठिकाणीं खाडाखोड केलेले असे असतात. प्लीडिंग्ज बरोबर जे कागद उभय पक्षांकडून दाखल होतात त्यांच्या पुष्कळ वेळां नकला नसतात,

---

* मराठींत ज्याप्रमाणें लवकर लिहिण्याकरितां मोडी लिपी आहे त्याचप्रमाणें उर्दू लवकर लिहिण्याची ही 'शिकस्ता' पद्धत आहे.

इतकेंच नव्हे, तर त्यांची यादी सुद्धां वकिलांच्या फाइलींत नसते. त्यामुळें अपील कोर्टांत काम करणाऱ्या वकिलाला खालच्या कोर्टांत कोणते कागद दाखल होतात हें सुद्धां पुष्कळ वेळां समजत नाहीं. येथें इंग्रजी कोर्टांच्या पद्धतीप्रमाणें जज्जमेंटच्या शेवटीं उभय पक्षांनीं दाखल केलेल्या कागदांची यादी देण्याची पद्धत नाहीं किंवा उभय पक्षांकडील साक्षीदारांचीं नांवें सुद्धां नसतात. त्यामुळें वकिलास आपली फाईल चांगली ठेवली नसल्यास मोठी अडचण पडते. रावसाहेबांना याची पूर्ण जाणीव असल्यामुळें ते खालील कोर्टाची फाईल अवश्य पहात असत. दुसरें असें कीं कायद्याचें ज्ञान चांगलें असावें अशी त्यांची फार महत्त्वाकांक्षा होती. कायद्याचीं पुस्तकें व ब्रिटिश हायकोर्टांचे ठराव इंग्रजींत असल्यामुळें, त्यांनीं इंग्रजीचाही थोडाबहुत अभ्यास केला. यापूर्वी उत्तर हिंदुस्थानांतील इंग्रजी न जाणणाऱ्या अशा वकिलांच्या सोयीकरितां, मुंबई, मद्रास, अलाहाबाद व कलकत्ता अशा चारी हायकोर्टांच्या इंडियन लॉरिपोर्ट सिरीजचें उर्दूत भाषांतर होत असे. त्यापासून रावसाहेब पुष्कळच फायदा घेत असत. इंग्रजी हायकोर्टांचे ठराव आपल्या वादाच्या ( आर्ग्युमेंट ) पुष्ट्यर्थ प्रमाण म्हणून कोर्टापुढें ठेवण्याची पद्धत सुरू करणारे रावसाहेब हे गुलबुर्ग्यास बहुधा पहिलेच वकील होते. रावसाहेब विनोदानें असें सांगत कीं, त्यांनीं एकदां एका न्यायाधिशापुढें ब्रिटिश हायकोर्टाचा एक ठराव ठेविला, व त्यांतील मुद्दे वाचून दाखवून कोर्टाचा निकाल आपल्या मताप्रमाणें व्हावा अशी विनंति केली. त्या कज्यांत ते अपिलांटतर्फे होते. पण त्यांनीं जो ठराव वाचून दाखविला त्यांत अपील नामंजूर करण्यांत आलें होतें. म्हणून न्यायाधीश साहेब म्हणाले “तुमच्या ठरावाप्रमाणें मी तुमचें अपील नामंजूर करतों. कारण इंग्रजी हायकोर्टानें सुद्धां अपील नामंजूर केलें आहे.” रावसाहेब सांगत कीं मीं त्या न्यायाधिशास पुष्कळ समजावून सांगण्याचा प्रयत्न केला व ठरावांत कायद्याच्या प्रश्नाचा कसा निकाल केला इकडे लक्ष्य द्यावें,

असें सांगितलें. परंतु नाझमसाहेब म्हणाले कीं, मी तुमच्या म्हणण्या-प्रमाणेंच निकाल करीत आहें.

गुलबुर्गा मुक्कामीं असतांना, त्यांची अशी पद्धत असे कीं ते कोर्टांत ठराविक वेळेच्या बहुधा अगोदर जात व न्यायाधीश येईपर्यंत कोर्टाच्या फाइली चाळीत असत. त्यांचा स्वभाव निरलस व मेहनती असल्यामुळें, पुष्कळ वेळां आपल्या केसच्या फायली चाळल्यानंतर दुसऱ्याही महत्त्वाच्या केसेसच्या फायली पहात असत. त्यामुळें त्यांचें कायद्याचें ज्ञान फार लवकरच वाढलें. साधारण मानानें कोर्टातील चालू असलेल्या सर्व केसेसची त्यांस माहिती असल्यामुळें, दुसरी वकील मंडळीही आपलीं कामें त्यांच्याकडे पाठवीत असत. कारण त्यांस रावसाहेबांच्या कामाबद्दल पूर्ण भरंवसा असे. यामुळें रावसाहेबांस दुसराही असा फायदा झाला, कीं त्यांची पुष्कळ पक्षकारांशीं ओळख झाली, व पक्षकारवर्गांत त्यांचा चांगला नांवलौकिक झाला.

अशा रितीनें ५।६ वर्षें गुलबुर्गा मुक्कामीं काम केल्यावर, त्यांस तेथील क्षेत्र आकुंचित वाटूं लागलें, व त्यांनीं हळू हळू हैद्राबादेस वकिली सुरूं करण्याचा विचार केला. त्यावेळेस पंडित रामाचार्य या नांवाचे वकील हैद्राबादेस बरेच प्रसिद्धीस आले होते. श्री. रामाचार्य ह्यांनीं सन १२९८ फ. ह्या वर्षीं वकिलीस प्रारंभ केला व पांच सहा वर्षांच्या अवधींतच त्यांनीं उत्तम यश प्राप्त करून घेतलें होतें. त्यांची व रावसाहेबांची अतिशय मैत्री होती. रावसाहेबांनीं आपला विचार त्यांस कळविला व त्यांनींही रावसाहेबांस बरेंच उत्तेजन दिलें. रा. रामचार्य यांस रावसाहेबांची योग्यता पूर्णपणें माहीत होती. त्यावेळेस हैद्राबाद हायकोर्टांत वकिली करणारे फारच थोडे हिंदू वकील होते. संस्थानची लोकसंख्या शेंकडा ९० हिंदू असल्यामुळें, सहाजिकच हायकोर्टांतील जास्त खटले हिंदूंचेंच असत व पुष्कळशा खटल्यांत हिंदूधर्म शास्त्राचेच मुद्दे निकालाकरितां पुढें येत. ह्या कारणामुळें रावसाहेबांसारख्या मनुष्याची हैद्राबादेस त्यावेळीं फार जरूर होती.

रावसाहेबांनीं स्वतः गुलबुर्ग्यास चालविलेले खटले जे हैद्राबाद हाय-कोर्टांत अपीलांत येत असत ते बहुधा रा. रामाचार्य यांजकडेच येत असत व म्हणून रा. रामाचार्य यांच्या मतानें असें ठरलें कीं, रावसाहेबांनीं गुलबुर्ग्यास चालविलेले खटले रावसाहेबांनींच हायकोर्टांत चालवावे. त्याप्रमाणें रावसाहेब आपले गुलबुर्ग्याचें कामही सांभाळीत व कधींकधीं हायकोर्टांत येऊन काम करीत. हेतु हा कीं, हायकोर्टांत काम करण्याची संवय व्हावी. थोड्याच दिवसांत रावसाहेबांस अशा खात्री वाटली कीं, हायकोर्टांत आपण चांगल्या रीतीनें काम करूं शकूं व हायकोर्टांतील न्यायाधीशांसही रावसाहेबांसारखा मनुष्य हायकोर्टांत वकील असावा असें वाटूं लागलें. अशी खात्री झाल्यावर सन १३०६ फ (इ. स. १८९६) मध्यें रावसाहेब गुलबुर्गा सोडून हैद्राबादेस वकिलीकरितां येऊन राहिले.

हैद्राबादेंतील रावसाहेबांच्या आयुष्यक्रमाची माहिती देण्यापूर्वी गुलबुर्गा येथील त्यांचेसंबंधीं आणखी जी थोडी माहिती आहे ती येथेंच दिलेली बरी. रावसाहेबांचें शाळेंतील शिक्षण जरी विशेष झालें नव्हतें, तरी त्यांना ज्ञानाची फार आवड असे. ते आपल्या सवडीच्या वेळांत निरनिराळ्या प्रकारचें वाङ्मय वाचीत असत. त्यामुळें त्यांचे विचार बरेच प्रगल्भ झाले होते. समाजाची सुधारणा कोणत्या मार्गानें झाली पाहिजे याचा ते नेहमीं विचार करीत व अशा विचारांना पुण्यासारख्या ठिकाणीं जाण्यायेण्यानें पुष्कळच चालना मिळत असे. महाराष्ट्रांतील मागील दोन पिढ्यांत ज्या मोठमोठ्या कर्तबगार व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्याबद्दल रावसाहेबांस फार आदर वाटे, व त्यांची अशी इच्छा असे कीं त्या व्यक्तींशीं भेटण्याचे व विचारविनिमयाचे जितके जास्त प्रसंग येतील तितके बरे. इतकेंच नव्हे तर जास्त प्रसंग घडवून आणण्याचा ते प्रयत्न करीत असत. अशा व्यक्ति आमच्या मोगलाईंत येण्याचें कांहींच कारण नव्हतें म्हणून ते दरवर्षी पुण्या-मुंबईस उन्हाळ्याची सुट्टी घालवीत असत. हा क्रम त्यांचा गुलबुर्ग्यास असतांनाच सुरू झाला. पहिल्या पहिल्यानें जोंपर्यंत त्यांची विशेष

प्रसिद्धी नव्हती तोंपर्यंत, त्यांचा क्रम असा असे कीं, वसंतव्याख्यान-मालेचीं शक्य तों सर्व व्याख्यानें ऐकावीं, त्यांवर विचार करावा, व त्या विषयासंबंधीं व्याख्यात्यांच्या घरीं जाऊन विचारविनिमय करावा. ज्या ज्या विषयाची जी जी विद्वान् मंडळी असतील त्यांस भेटून त्यांच्या विषयासंबंधीं पूर्ण माहिती ते मोठ्या आस्थेनें करून घेत असत. पुण्यांतील महाराष्ट्रीयांच्या सार्वजनिक कामाबद्दल त्यांना फार आदर व कौतुक वाटत असे व तेथें कोणत्या पद्धतीनें कामें होतात त्याचा ते मन लावून अभ्यास करीत असत. याचाच परिणाम असा झाला कीं, संस्थानांत हीं सार्वजनिक उपयुक्ततेचीं कामें व्हावीं अशी त्यांस तीव्र इच्छा वाटूं लागली. गुलबुर्गा येथें रा. विठ्ठलराव देऊळगांवकर वकील आणि रा. गिरिराव अण्णा जहागिरदार ह्या उभयतांशीं रावसाहेबांचा अतिशय स्नेह होता. त्या स्नेह्यांनाही व्याख्यानांची व सार्वजनिक कामाची हौस असल्यामुळें रावसाहेबांच्या नवीन विचारांना चांगलीच मदत झाली. रावसाहेब हैद्राबादेस आल्यानंतर रा. विठ्ठलराव ह्यांनींच गुल-बुर्गा येथें सन १३१८ ( इ. स. १९०८ ) फसलींत 'नूतन विद्याल-याची' स्थापना केली त्याची हकीकत पुढें येईलच.

रावसाहेब गुलबुर्ग्यास असतांना तेथें सन १२९६ फ. ( इ. स. १८८६ ) पासून 'गुलबुर्गा समाचार' या नांवाचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र रा. रा. परशुरामपंत बोडस या नांवाचे एक गृहस्थ काढीत असत. ह्या वर्तमानपत्राबद्दल रावसाहेबांस फार आपलेपणा वाटे व एक तरी मराठी वर्तमानपत्र आपल्या संस्थानांत निघतें, ह्याचा त्यांना फार अभिमान वाटत असे. ह्या वर्तमानपत्रांत ते स्वतःही केव्हां केव्हां लेख लिहीत असत. अधिकारीवर्गाच्या प्रजेवरील जुलमाबद्दल स्पष्टपणें वर्त-मानपत्रांत लिहिणें शक्य नव्हतें. तथापि अशा रीतीनें लिहीत असत, कीं, त्यामुळें जो अधिकारी जुलमी असेल त्यास सूचना मिळावी व पुष्कळ वेळां त्याचा इष्ट परिणामही होत असे. उदाहरणार्थ तहशील-दार जुलमी असला व त्याचा दौरा निघाला म्हणजे वर्तमानपत्रांत अशी-

बातमी छापिली जाई कीं, " अमूक अमूक तहशीलदार दौऱ्यावर निघाले आहेत, म्हणून दौऱ्याच्या गांवांतील लोक भयभीत झाले आहेत, तेव्हां परमेश्वरच त्यांचें रक्षण करो " वगैरे.

चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी, व कांहीं अंशीं आजही संस्थानांतील वकील मंडळीची अशी स्थिति आहे कीं, त्यांना आपल्या स्वार्थापेक्षां दुसरी कसलीही कल्पना नसे. त्यावेळीं वकिलांची साधारण पद्धति अशी होती कीं, आपला धंदा कोणत्या रीतीनें किफायतशीर होईल याची खटपट करणें, अधिकारी लोकांची मर्जी संपादन करणें व पक्षकारांचा असा समज करून देणें कीं, अधिकाऱ्याची आपल्यावर मर्जी आहे. पूर्वी कायद्याचें महत्त्व कमी असल्यामुळें व कायदेही जास्त स्पष्ट नसल्यामुळें कज्जांच्या निकालाचा भर विशेषतः अधिकाऱ्यांच्या मर्जीवरच असे. अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करणें ही वकिलीच्या यशाची गुरुकिल्ली त्यावेळीं समजत व आजही पुष्कळ वकिलांचा असा समज आहे. त्यामुळें अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्याची खटपट ह्या वर्गाची नेहमीं चालू असते. वकील वर्गापुढें, वकिली चांगली चालणें हेंच एक ध्येय असल्यामुळें त्या मार्गानेंच त्यांची खटपट असे व ज्यांची वकिली चांगली चाले त्यांच्यापुढें जमीनजुमला घेणें व चैन करणें येवढ्याच गोष्टी असत. त्याच कारणानें पन्नाशी उलटून गेलेले वकीलसुद्धां नवरदेवाचा पोषाख घालून फिरतांना दिसत व आजही हा वर्ग पूर्णपणें नामशेष झाला आहे असें नाहीं. आपली श्रीमंती व चांगली वकिली दाखविणारे मार्ग, भारी पोषाख व डामडौल हेच समजले जात. ज्यांचा कल धार्मिक मार्गाकडे असे, ते ब्राह्मणभोजनांत व दक्षिणा देण्यांत आपल्या पैशाचा सदुपयोग समजत असत. त्यावेळीं सर्व वकील वर्ग अत्यंत सनातनी विचाराचा असल्यामुळें, धार्मिक समजल्या जाणाऱ्या अव्यवहार्य गोष्टींचें गांठोडें आपल्या डोक्यावर घेऊन मिरवितांना, त्या गांठोड्यांतच आपला वडिलोपार्जित शहाणपणा आहे असें ते समजत असत. वेदवाक्याचा अर्थ करणें, हें

किंवा आपल्या सामाजिक परिस्थितींत फेरफार करण्याचा विचार करणें हें सुद्धां पाप समजलें जात असे. अशा समाजाची कोंडी फोडून बाहेर पडणें व स्वतंत्र बुद्धीनें विचार करणें ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. अशा प्रकारच्या समाजांतून रावसाहेबांसारखा मनुष्य बाहेर पडला यांतच त्यांचें मोठेपण आहे.

# प्रकरण ३ रें.

## हैद्राबाद येथील वकिली.

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें रावसाहेबांनीं हैद्राबादेस ( सन १३०६ फ. ) इ. स. १८९६ सालीं वकिली सुरू केली, व फार थोड्या दिवसांतच त्यांची सबंध संस्थानांत प्रसिद्धी झाली. त्यावेळेस वकील मंडळींत प्रसिद्धीस आलेले वकील मुसलमान होते व हायकोर्टांत त्यांचीच चलती व प्राबल्य होतें. त्यांतही विशेष नांवाजलेल्या वकिलांचा अधिकाऱ्यांशीं कशाना कशा रीतीनें संबंध होता. हिंदु वकील फारच थोडे, बोटावर मोजण्याइतके, हायकोर्टांत काम करीत असत. व हे सर्व उत्तर-हिंदुस्थानांतील होते; किंवा अशा वर्गांतील होते कीं ज्यांची जन्मभाषा उर्दू होती. मुसलमान वकिलांचें प्राबल्य असल्याचीं मुख्य कारणें म्हणजे त्यांचें अधिकाऱ्यांशीं असणारें वळण व कोर्टाची भाषा हीच त्यांची मातृभाषा, हीं होत. हिंदू वकिलापुढें उर्दू भाषेची नड ज्याप्रमाणें होती, त्याचप्रमाणें अधिकारी वर्गाशीं वळणाचे मार्गही त्यांचे बाबतींत कमी होते. ह्या कारणानेंच महाराष्ट्रीय वकील किंवा उर्दू ज्यांची भाषा नाहीं असे हिंदू वकील, हायकोर्टांत क्वचितच दृष्टीस पडत. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू व मुसलमान यांच्या आचाराविचारांत बरेंच साम्य असल्यामुळें, मुसलमानांस हे लोक जास्त जवळचे वाटतात व महाराष्ट्रीयांची संस्कृति व आचारविचार मुसलमानांपेक्षां भिन्न असल्यामुळें मुसलमानांस सहाजीकच ते दूरचे वाटतात.

त्याच कारणामुळें केशवरावांच्या वेळेस कोणीच प्रसिद्ध महाराष्ट्रीय वकील हायकोर्टांत काम करणारा नव्हता. महाराष्ट्रीयांमध्यें विशेष नांवलौकिकास चढलेले रावसाहेब हे पहिलेच वकील होत.

कुबेर येथील खुनाच्या खटल्यांतील आरोपीतर्फे काम चालविणारे वकील.
( १९२० )



( १ ) डॉ. सर तेजबहादूर सप्रू. ( ३ ) श्री. ना. केशवराव कोरटकर
( २ ) श्री. काशिनाथराव वैद्य.

रावसाहेबांनीं हैद्राबादेस काम सुरू केल्यावर थोड्याच काळांत रा. रामाचार्य वकील यांचा अंत झाला. पंडित रामाचार्य हे एक मोठे वकील होते व त्यांच्याकडे कामही पुष्कळ असे. त्यांच्या निधनामुळें व त्यांचा व रावसाहेबांचा संबंध असल्यामुळें रावसाहेबांकडे त्यांचें थोडें बहुत कामही आलें. रावसाहेबांची प्रासिद्धि गुलबर्गा सुभ्यांत असल्यामुळें गुलबर्गा सुभ्यांतील काम रावसाहेबांकडेच येत असे. रावसाहेबांची मातृभाषा मराठी व परभणी जिल्ह्यांत त्यांचें जन्मस्थान शिवाय त्यावेळीं हैद्राबादेस मराठी बोलणारा दुसरा कोणी योग्य वकील नसल्यामुळें, मराठवाडीचें म्हणजे औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड इत्यादि जिल्ह्यांतील कामें रावसाहेबांकडे येऊं लागलीं. ह्या कारणामुळें त्यांचें काम हायकोर्टांत लवकरच वाढलें. रावसाहेबांच्या विशेष प्रासिद्धीचें कारण हेंही झालें कीं, औरंगाबाद एथें हिंदू-मुसलमानांचा एक दंगा झाला. हिंदूंच्यातर्फे काम चालविण्याकरितां दुसरा कोणी वकील धजेना. तेव्हां रावसाहेबांनीं हिंमत करून हिंदूंच्यातर्फे काम करण्याचें कबूल केलें. हिंदूंच्यातर्फे वकील म्हणून सुद्धां काम करणें हें फार धोक्याचें आहे, असें ते समजून होते, व ते एकदां असें सांगत होते कां, आपल्या वस्तःच्या बचावाकरितां त्यांना काय काय गोष्टी कराव्या लागत. अशिक्षित व गुंड मुसलमानांच्या क्रोधापासून स्वतःचें रक्षण करण्याकरितां, इतर योग्य उपायांचें अवलंबन करूनही, ते मुद्दाम मुसलमानांच्यातर्फे काम करणाऱ्या वकिलांमध्यें मिळून मिसळून वागत, त्यांच्या ऑफिसमध्यें जात येत, व त्यांच्याबरोबर त्यांच्या मशिदींत व आजूबाजूस जाऊन भांडणाच्या जागा पहात असत. ह्या खटल्यांत हिंदूंच्यातर्फे काम केल्यामुळें ते हिंदूंचे कैवारी आहेत, हिंदूंच्या सुखदुःखांत भाग घेण्याची त्यांची तयारी आहे; हिंमतीनें काम करणारे आहेत अशी त्यांची सहाजीकच ख्याति झाली. व हिंदू लोकांचीं मनें त्यांनीं आपलींशीं करून घेतलीं.

अशाच प्रकारचा एक दंगा वरंगळ मुक्कामींही हिंदु–मुसलमानांत झाला होता व त्या खटल्यांतही त्यांनीं हिंदूंतर्फे काम केलें होतें.

ह्यानंतर त्यांनीं चालविलेला अत्यंत महत्त्वाचा खटला म्हणजे कुंबेर येथील खुनाचा खटला होय. नांदेड जिल्ह्यांत दय $\frac{\text{इ. स. १९१९}}{\text{सन १३३७}}$ फसलींत कुबेर एथें जलाल शहा या नांवाचा एक इसम मारला गेला व त्याच्या खुनाचा आरोप त्रिंबकराव व यशवंतराव या पितापुत्रांवर व कांहीं इसमांवर पोलिसांनीं ठेविला. त्रिंबकराव हे कुबेर येथील मक्तेदार व देशमुख होते व त्यांचें उत्पन्न फार मोठें होतें. ते वऱ्हाडचे श्रीमंत दादासाहेब खापर्डे ह्यांचे व्याही होते. या खुनाच्या खटल्यास पोलिसांनीं फार महत्त्व दिलें होतें. हे देशमुख अग्निहोत्री होते व ह्या खटल्यांत जरी त्यांस ज्युडिशिअल कमिटीचा निकाल होईपर्यंत दोन तीन वर्षें कारागृहांत काढावीं लागलीं, तरी त्यांनीं आपलें व्रत सोडलें नाहीं. या सबंध मुदतींत त्यांस ताजें अन्न मिळालें नाहीं. अग्निहोत्राच्या कुंडांतील अग्नीवर तयार झालेलें जें फराळाचें सामान, त्यांच्या गांवाहून येत असे, त्यावरच त्यांनीं दिवस काढले. त्यांच्याबद्दल अशी बातमी होती कीं सकाळीं ते आपलें पूर्ण आन्हिक आटपेपर्यंत मुसलमानाचें तोंड पहात नसत व त्यांच्या देशमुखीच्या गांवाच्या हद्दींतून ते गोमांसही जाऊं देत नसत. सरकारनें ह्या खटल्यांत पुष्कळ फी देऊन सरकारकडून काम चालविण्यास, प्रसिद्ध बॅरिस्टर नॉर्टन ह्यांस आणिलें होतें व एका स्थानिक वकिलास ३०० रु. रोज ठरवून त्यांच्या मदतीस दिलें होतें. ह्या खटल्यांत रावसाहेबांनीं आरोपीतर्फें पहिल्यापासून अखेरपावेतों काम केलें होतें. हा खटला हायकोर्टमध्यें असतांना कांहीं आरोपींतर्फें मुंबईचे सुप्रसिद्ध बॅरिस्टर जीना हे आले होते. व ज्युडिशिअल कमिटींत अत्यंत नांवाजलेले ॲडव्होकेट डॉ. सर तेजबहाद्दर सप्रू आरोपीतर्फें आले होते. अखेरीस हे दोघेही पितापुत्र दोषमुक्त ठरले. रा. यशवंतराव देशमुख हायकोर्टांतच सुटले व त्र्यंबकराव

देशमुख ज्यूडिशिअल कमिटींत सुटले. ह्या खटल्यांत रावसाहेब पहिल्यानें मुलाकडून वकील होते व त्यांनीं हायकोर्टांत त्यांच्यातर्फे काम चालविलें व यश मिळविलें. ह्या खटल्यांत रावसाहेबांनीं पुष्कळ परिश्रम घेतले व त्यांत त्यांची तैल बुद्धि चांगलीच प्रत्ययाला आली.

रावसाहेब वकील म्हणून बरेच प्रसिद्ध होते व आजपर्यंत त्यांच्या इतका नांवलौकिक मुसलमान वकिलांतही फार थोड्यांच्याच वांट्यास आला. त्यांची वकिली चांगली चालण्याचीं कांहीं कारणें मागील प्रकरणांत दिलीं आहेतच. त्याशिवाय वकिलीस अवश्य असणारे दुसरेही पुष्कळ गुण त्यांच्या अंगांत होते. पक्षकार नेहमीं त्यांच्यावर फार खुष असत व त्यांचा रावसाहेबांवर अतिशय विश्वास असे. रावसाहेबांचा स्वभाव फारच गोड व मनामिळाऊ असल्यामुळें, त्यांचा त्यांस वकिलीच्या धंद्यांतही फार उपयोग झाला. अपशब्द त्यांच्या तोंडून कधींच निघत नसे व दुसऱ्यांशीं भाषण करतांना ते फार गौरवून बोलत असत. त्यामुळें पक्षकार त्यांच्याशीं राजी असत. वकिलीच्या धंद्यांत यश मिळण्यास खटल्यांची पुष्कळ तयारी करणें हें तर अवश्यक आहेच, परंतु त्यापेक्षांही पक्षकारास वकील पुष्कळ तयारी करीत आहे हें समजणें अधिक महत्त्वाचें आहे. रावसाहेब पक्षकाराचें पूर्ण म्हणणें ऐकून घेत असत व त्याच्याशीं तो शहाणा असल्यास वादविवादही करण्याची त्यांची तयारी असे. कारण ते असें म्हणत असत कीं, पक्षकाराचें म्हणणें ऐकून घेतल्यामुळें व त्याच्याशीं वादविवाद केल्यामुळें वकिलास पुष्कळ फायदा होतो व पुष्कळ नवीन मुद्दे सांपडतात. जे मुद्दे सकृत् दर्शनीं कमी महत्त्वाचे वाटतात तेच थोड्या विचारांनीं फार महत्त्वाचे वाटून, पुष्कळ वेळां त्या मुद्यांवरच यश मिळतें. परंतु केव्हां केव्हां त्यांस पक्षकारही फार खाष्ट भेटत. ते त्यांच्या चांगुलपणाचा दुरुपयोग करीत. ते स्वतःचेंही काम करूं देत नसत व दुसऱ्याचेंही काम होऊं देत नसत. अशा वेळेस रावसाहेब एक मजेची युक्ति करीत. ते पक्षकारास सांगत कीं, “ तूं जर

येथें बोलत बसलास तर तुझें काम होणार नाहीं व तुला कज्जांत यश येणार नाहीं," असें सांगून त्यास ऑफिसच्या बाहेर बसवीत, व आपण आंत दुसऱ्या दिवशींचें सर्व काम करून घेत. त्यांत त्यांची स्वतःचीही सोय होई व पक्षकारासही असें वाटे कीं, आपल्या एकाच कज्जाकरितां वकिलानें फार परिश्रम केले. कांहीं कांहीं वेळां असें आग्रहानें सांगणारे पक्षकार भेटत कीं, आमच्या खटल्याकरितां कायद्यांचीं व ठरावांचीं पुष्कळ पुस्तकें काढा व पुष्कळ खटपट करा. पुष्कळ खटले असे असतात कीं, त्यांत कायद्याचे प्रश्न फार थोडेच असतात व त्यांत ठराव हुडकून काढण्याचें प्रयोजन नसतें. पक्षकाराचें त्यामुळें समाधान होत नाहीं. अशा परिस्थितींत ते आणखी एक युक्ति योजीत. पक्षकारानें विचारिलें कीं, आमच्या खटल्याचीं कायद्याचीं पुस्तकें कोणतीं तर त्यांस रावसाहेब कोर्टांत बरोबर जाणाऱ्या सर्व पुस्तकांकडे बोट दाखवीत. त्यांचेजवळ काम पुष्कळ असल्यामुळें बहुधा एक दोन गठे पुस्तकांचे त्यांचेबरोबर रोज कोर्टांत जात असत व त्यामुळें पक्षकारांस फार समाधान वाटत असे. कित्येक वेळां आनंदानें तो तीं पुस्तकें आपल्या डोक्यावर घेऊन इकडून तिकडे फिरतांना सुद्धां दिसे व त्यामुळें माहितगारांचीही बरीच करमणूक होई.

त्यांच्यांत आणखीही एक मोठा गुण होता आणि तो म्हणजे शांतपणा हा होय. ते केव्हांही कोणावरही रागावत नसत व कोर्टांत सुद्धां ते अत्यंत शांतपणें आपलें काम करीत. खटला चालवीत असतांना ते कधींही रागावत नसत व न्यायाधीश कितीही त्यांच्या विरुद्ध असला किंवा त्यानें कितीही वेडेवांकडे प्रश्न केले तरी, ते शांतपणें त्यांचीं उत्तरें देत. ह्यामुळें त्यांचें व न्यायाधिशाचें कधींही भांडण होत नसे व न्यायाधिशाचे मनांतही त्यांचेबद्दल फार आदर असे.

खटला चालवीत असतांना ते आपल्या पक्षकाराचे मुद्दे कोर्टापुढें फार शिताफीनें मांडीत. अशा रीतीनें ते खटल्याची हकीकत सांगत कीं, खट-

त्यांत महत्त्वाचा व आपणास फायदेशीर असा भाग न्यायाधिशाच्या मनावर ठसावा, व खटल्यांतील आपल्या विरुद्ध गोष्टींवर पांघरूण पडावें. खटला चालवीत असतांना एखाद्या महत्त्वाच्या मुद्यावर न्यायाधीश आपल्या विरुद्ध आहे असें त्यांच्या निदर्शनास आलें तर ते तेवढ्यापुरते तो मुद्दा सोडून पुढें जात, व सोयीसोयीनें मुद्याकडे पुन्हां वळत. पुष्कळ वेळां असें होत असे कीं, न्यायाधिशाच्या मनावर एखाद्या साध्या गोष्टीचाच परिणाम होई. रावसाहेबांच्या ती गोष्ट चटकन ध्यानांत येई व ते त्या मुद्यावर जास्त जोर देत व आपल्या कज्जांत यश मिळवीत. न्यायाधिशाला आपल्याकडे वळविण्याची त्यांची अशी एक युक्ति होती कीं पुष्कळ वेळां न्यायाधीश रावसाहेबांच्या म्हणण्याच्या विरुद्ध बोलत असला तरी रावसाहेब असें म्हणत कीं "आपलें म्हणणें बरोबर आहे, परंतु त्यांत थोडा फरक आहे, व असें सांगून ते आपली केस न्यायाधिशास ऐकवून घ्यावयास लावीत. ते फार चांगले ॲडव्होकेट होते व त्यांस न्यायाधिशाच्या कलाची चांगली पारख असे. त्यामुळें ते आपली केस न्यायाधिशापुढें अशा खुबीनें मांडीत कीं न्यायाधिशाला त्यांचें म्हणणें खरें वाटे.

इ. स. १९१९ / १३२९ फसलीमध्यें ब्रिटिश हिंदुस्थानप्रमाणें फॅक्टरी ॲक्ट करण्यांत यावा असें वाटून संस्थानांतील कारखाने व मजूर ह्यांच्यासंबंधीं प्राथमिक चौकशी करण्याकरितां, सरकारी व बिनसरकारी सभासदांचें एक कमिशन सरकारनें मुक्रर केलें होतें. त्यांत रावसाहेबांची बिनसरकारी सभासद म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. ह्या कमिशनने संस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं दौरा करून व परिस्थितीचें अवलोकन करून ज्या शिफारसी केल्या होत्या, त्याचा विचार करून फॅक्टरी ॲक्ट मंजूर करण्यांत आला. ह्या कमिशनचें काम जवळ जवळ दोन वर्षें चाललें होतें. त्यांत रावसाहेबांनीं जें काम केलें त्याचा सरकारावर फार अनुकूल परिणाम झाला. त्याच सुमारास म्हणजे इ.स. १९२० / १३३०

फसली ह्या वर्षी गुलबुर्गा मिलमधील मजुरांनीं संप पुकारला होता व मिलचे चालक आणि सरकारी अधिकारी ह्यांनीं शिकस्तीचें प्रयत्न करूनही संप मिटण्याचें चिन्ह दिसेना. उलट मिलचे चालक व मजूर यांच्यामधील वितुष्ट वाढत चाललें. शेवटीं रावसाहेबांनीं मध्यस्ती करून हा संप मिटविला. ह्यावरून रावसाहेबांची लोकप्रियता व त्यांचें वजन याचा सरकारास प्रत्यय आला.

हैद्राबाद येथें आल्यानंतर रावसाहेबांस प्राप्ति पुष्कळ झाली व ती दिवसेंदिवस वाढतच होती. शेवटीं शेवटीं त्यांचें उत्पन्न दरमहा ४।५ हजारांपर्यंत होतें. सन १३३१ (इ. स. १९२१) सालीं जेव्हां सर अली इमाम हे हैद्राबाद एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष होते तेव्हां रावसाहेबांची नेमणूक हायकोर्ट जज्जाचे जागीं झाली. हैद्राबाद हायकोर्टांत पूर्वी इतर न्यायाधिशांशिवाय एक शास्त्री व एक “ मुफ्ती ” अशा दोन जागा होत्या. हिंदुधर्मशास्त्राच्या मुद्यावर शास्त्र्यांचें मत घेतलें जाई, व मुसलमानी धर्मशास्त्राच्या मुद्यावर मुफ्तीचा “ फतवा ” घेत. परंतु पुढें शास्त्र्याची जागा निराळी न ठेवतां हीच जागा हायकोर्ट जज्जाची जागा समजून एक जज्ज वाढविण्यांत आला व नेहमीं अशी प्रथा ठेवण्यांत आली कीं, हायकोर्टांतील एक जज्ज तरी हिंदू असावा. राय बालमुकुंदसाहेब हे हिंदु जज्ज हायकोर्टांत वरीष्ठ वर्ष होते व ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागेवर वास्तविक एका हिंदूचीच निवड व्हावयास पाहिजे होती;परंतु तशी ती झाली नाहीं. हायकोर्टाच्या सहा जज्जांपैकीं एकही जज्ज हिंदू नव्हता. त्यामुळें हिंदू समाजांत थोडी खळबळ उत्पन्न झाली. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, हैद्राबाद हायकोर्टांत शेंकडा ९० खटले हिंदूंचे व त्यांत हिंदू धर्मशास्त्राचे गुंतागुंतीचे पुष्कळ प्रश्न उत्पन्न होतात. परंतु हिंदुधर्मशास्त्र उत्तम रीतीनें जाणणारा किंवा हिंदू समाजाच्या अंतर्व्यवस्थेचें ज्ञान असणारा एकही जज्ज नव्हता. ही गोष्ट सर अली इमाम ह्यांच्या

लक्षांत आलों व ते मनुष्याची चांगली पारख करणारे असल्यामुळें, त्यांनीं रावसाहेबांची नेमणूक ॲडिशनल जज्ज म्हणून मुद्दाम केली. रावसाहेबांच्या नेमणुकीमुळें हिंदु समाजास फार आनंद झाला, व आपल्या पुढाऱ्याबद्दल सरकारनें आपलेपणा दाखवून त्यांस बहुमानाची व विश्वासाची जागा दिली, याबद्दल समाधान वाटलें. ह्या जागेचा पगार जरी दरमहा दोन हजार रुपये होता व रावसाहेबांची प्राप्ति त्याच्या दुपटीपेक्षां जास्त होती, तरी रावसाहेबांनीं आपल्या स्वार्थाकडे लक्ष न देतां ही जागा पतकरली. ही जागा पतकरण्यांत त्यांचा मुख्य हेतु असा होता कीं, हिंदु समाजाचें वजन वाढावें. त्यांनीं ही जागा पतकरली नसती तर सरकारला असें म्हणण्यास जागा राहिली असती कीं, हिंदु लोक सरकारी नोकरी करण्यास तयार नाहींत. त्यांचा आणखी असा हेतु होता कीं, ह्या जागेवर राहून आपल्या देशबांधवांचें कल्याण करावें व त्यांस खरा न्याय मिळावा. महाराष्ट्रीयांच्यातर्फे त्यांस त्यांच्या नेमणुकीप्रीत्यर्थ पानसुपारी करण्यांत आली, तेव्हां उत्तर देतांना त्यांनीं स्पष्ट सांगितलें होतें कीं माझी सामाजिक कार्याची दृष्टि पूर्वीप्रमाणेंच राहील व मी सरकारी जागेवरून समाजाची पूर्वीप्रमाणेंच सेवा करीन फरक एवढाच कीं पूर्वी तुमच्यांत बसून काम करीत असें, आतां निराळ्या जागीं बसून काम करीन. ते असेंही म्हणाले होते कीं, पूर्वी ज्या सरकारी धोरणाची माहिती मिळणें शक्य नव्हतें, किंवा सरकारच्या अंतरंगांतील गोष्टी समजत नसत. त्या सरकारी नोकर या नात्यानें समजल्या तर त्यापासून समाजाचा फायदाच होईल. ह्या नेमणुकीबद्दल त्यावेळेस असा सार्वत्रिक समज होता कीं, रावसाहेबांच्या पायांत सरकारी नोकरीच्या रूपेरी शृंखला घालून सार्वजनिक कार्यास आळा घालावा असाच सरकारचा अंतस्थ हेतु आहे.

---

# प्रकरण ४ थें.

## न्यायासनावरील कामगिरी.

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें इ. स. १९२१ / सन (१३३३) मध्यें रावसाहेबांची नेमणूक, हैद्राबाद हायकोर्टांत ॲडिशनल जज्ज म्हणून (मुद्दाम त्यांच्याकरितां जागा उत्पन्न करून) झाली. प्रत्यक्ष हुकूम येईपर्यंत कोणालाच कल्पना नव्हती कीं रावसाहेबांची नेमणूक होईल. एक दिवस रात्रीं नऊ वाजल्यानंतर त्यांच्या नांवावर एकाएकीं हुकूम आला व तो हुकूम रावसाहेबांच्या हातीं रात्रीं ११॥ वाजतां पडला. दुसरे दिवशीं सकाळींच ५॥ वाजतां रावसाहेब प्रस्तुत लेखकाकडे आले आणि म्हणाले कीं " आमचा व तुमचा आतां संबंध तुटला. तुमच्यापासून आम्हांस अलिप्त राहावें लागेल ! " त्यांच्या एकंदर चर्येवरून व वरील उद्गारांवरून कोणालाही काळजीच वाटली असती. हैद्राबादचें वातावरण त्यावेळीं विशेष स्थिर नव्हतें व मधून मधून अशा गप्पा उठत कीं, चळवळी करणाऱ्या लोकांना " मनानुरला* " पाठविण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामुळें त्यांस पुन्हां प्रश्न केल्यावर, त्यांनीं नेमणुकीची हकीकत सांगितली. त्यांच्यासारख्या स्वातंत्र्यप्रिय माणसाच्या मनावर अशा प्रकारचा परिणाम होणें अगदीं स्वाभाविकच होतें. ते म्हणाले कीं "आतां मला एका कैद्याप्रमाणें राहावें लागेल." हुकूम आल्यानंतर ते दुसरे दिवशीं हायकोर्टांत नेहमींप्रमाणेंच गेले. वकील ज्या जिन्यानें वर जातात, त्याच जिन्यानें वर चढले. †वकील मंडळी जेथें बसतात तेथें येऊन ते

---

* मनानूर हें गांव महबूबनगर जिल्ह्यांत निजाम इलाख्यांत आहे व सरकारला अनिष्ट असणाऱ्या व्यक्तीस तेथें ठेवण्यांत येत असे.

† हैद्राबाद हायकोर्टांत कांपाऊंडांत शिरल्यावर जज्जाकरितां एक रस्ता राखिलेला आहे व वर जाण्याकरितां विजेचा पाळणा आहे. त्यांचा उपयोग वकिलांना करितां येत नाहीं ?

सर्व वकील मंडळीस मोठ्या प्रेमानें भेटलें, व तास दोन तासांनंतर त्यांनीं आपल्या जागेचा चार्ज घेतला. हें काम पाहिल्या पहिल्यानें त्यांना फारच जड गेलें. कारण हायकोर्टांत आल्याबरोबर येथील पद्धतीप्रमाणें त्यांना आपल्या चेंबरमध्यें बसावें लागे. तेथून ते परभारेंच बेंचावर जाऊन बसत व बेंचवर जाण्याचाही रस्ता जज्जांचा निराळा राखून ठेविला असल्यामुळें, तेव्हांही वकिलांची व त्यांची भेट होत नसे. पूर्वीं पक्षकारांची घरीं गर्दी असे, ती आतां पूर्ण मोडली. घरीं सुद्धां त्यांस एकटें एकटेंच वाटे व त्यांच्या विशेष मित्रांपैकीं कोणी भेटला तर ते विनोदानें असेंही म्हणत कीं “ तुम्हीं सर्व लोकांनीं मजवर बहिष्कार टाकला आहे. ” हायकोर्टांत चेंबरमध्यें बसले असतांना त्यांची नेहमीं अशी इच्छा असे कीं, आपल्या मित्रमंडळींनीं यावें व मोकळ्या मनानें बोलावें. परंतु त्यांची मित्र मंडळी त्यांच्याकडे मुद्दामच जात नसत. कारण त्यांना अशी भीति वाटे कीं, आपल्यासारख्याच्या जाण्यायेण्यानें रावसाहेबांच्या चारित्र्याबद्दल शंका उत्पन्न होण्याला विनाकारण जागा उत्पन्न होईल, कारण अधिकाऱ्यांकडे वरचेवर जाणें, त्यांच्या चेंबरमध्यें घुसून त्यांच्याशीं गप्पा मारीत बसणें, किंवा त्यांच्या घरीं विशेष जाणें याचा अर्थ पक्षकार असा करील कीं त्या वकिलावर त्या त्या अधिकाऱ्याचें विशेष प्रेम आहे; तो अधिकारी त्या वकिलाचें विशेष ऐकतो व त्या वकिलामार्फत अन्य मार्गानेंही अधिकाऱ्याची मर्जी संपादन करतां येईल. रावसाहेबांनीं दोन वर्षें जज्ज या नात्यानें फार उत्तम काम केलें व न्यायदानाच्या कामांत त्यांच्या मागील ३५ वर्षांच्या वकिलीच्या अनुभवाचा फायदा प्रजेस मिळाला. काम करण्याची त्यांची नेहमींच तयारी असे. व त्यामुळें कोणत्याही बेंचावर जाऊन ते काम करीत असत. दरवर्षीं जेव्हां सर्व जज्जांच्या कामाचा आढावा घेतला जाई, त्यावेळेस रावसाहेबांचें काम दुसऱ्यापेक्षां दुपटीनेंही

जास्त भरे. पहिल्या वर्षाचा आढावा पाहिल्यानंतर तर इतर न्यायाधिशांनाही त्यांच्याबरोबर काम करण्यास बसावेसें वाटे. कारण त्यांच्यामुळें दुसऱ्यांच्या कामाचाही आढावा वाढे. त्यांची काम करण्याची पद्धति इतर जज्जांपेक्षां निराळी होती. ते बेंचावर येण्यापूर्वी खटले पाहून येत असत. त्यामुळें खटल्याची हकीकत सांगतांना वकिलाचा जो बराच वेळ मोडतो तो मोडत नसे. ते एकदम खटल्याच्या मुद्यावरच वकिलास भाषण करण्यास सांगत व विरुद्ध पक्षाचें म्हणणें जरूर पडेल तेव्हां व जरूर त्याच मुद्यावर ऐकून घेत. त्यामुळें इतर जज्जांना एक खटला ऐकण्यास जितका वेळ लागे त्याच वेळांत ते तीन चार खटले सहज ऐकत.

रावसाहेब हे स्वतः वकील असल्यामुळें व वकिलांचें महत्त्व व त्यांची योग्यता त्यांस ठाऊक असल्यामुळें, ते त्यांचा बराच मान ठेवीत व त्यामुळें इतर न्यायाधिशांनाही वकिलांचा मान राखावा लागे. त्यांच्यामुळें न्यायाधीश व वकील ( बेंच आणि बार ) यांचे संबंध फार चांगले राहिले. ते स्वतः बार असोसिएशनचे पुष्कळ वर्षें अध्यक्ष होते व त्यांचा बऱ्याच वकिलांशीं व्यक्तिशः संबंध असल्यामुळें वकील आपल्या अडचणी मनमोकळें करून त्यांच्यापुढें मांडीत. जेव्हां जेव्हां एखाद्या वकिलाबद्दल हायकोर्टाकडे तक्रार येई, तेव्हां ते सहानुभूतिपूर्वक त्याचा विचार करीत. पुष्कळ वेळां असें होतें कीं, जज्जास वकिलीच्या धंद्याचा अनुभव नसल्यामुळें व पक्षकारांची मनोवृत्ति त्यांस माहीत नसल्यानें पुष्कळ वेळां वकिलांसच न्याय मिळत नाहीं. परंतु रावसाहेबांनीं आपल्या काळांत जज्जांच्या अशा प्रकारच्या वागणुकींत बराच फरक केला.

जज्ज ह्या नात्यानें त्यांनीं फार स्वतंत्र रीतीनें काम केलें व काम करतांना केव्हांही आपल्यासमोर ही गोष्ट ठेविली नाहीं कीं मी अमूक रीतीनें वागलों म्हणजे माझ्या नौकरीच्या मुदतींत बढती होईल. इतकेंच नव्हे तर त्यांनीं बढतीची आशाही ठेविली नव्हती. त्यांना पुढें तीन वर्षांनी बढती मिळाली तीही त्यांच्या बाणेदारपणामुळेंच होय.

त्यांची नौकरीची दोन वर्षें झाल्यानंतर येथील सरकारी नियमाप्रमाणें त्यांची वयोमर्यादा पूर्ण झाल्यामुळें त्यांना सेवानिवृत्त होणें भाग होतें. अर्थात् नोकरीच्या मुदतींत वाढ करण्याचा अधिकार सरकारास होता. त्याप्रमाणें त्यांनीं एक वर्षाची मुदत वाढविली. परंतु रावसाहेबांना ही गोष्ट मान्य नव्हती. त्यांनीं सरकारला अशी अट घातली कीं जर मुदत वाढवावयाची असेल तर ती तीन वर्षांनीं वाढली पाहिजे. नौकरीसंबंधीं येथें असा नियम आहे कीं, वकिलांपैकीं हायकोर्ट जज्जाच्या जागेवर कोणाची नेमणूक झाली तर त्यांच्या वकिलीचा मोबदला म्हणून बारा वर्षें नौकरी धरतात. त्याप्रमाणें रावसाहेबांस तीं बारा वर्षें मिळालीं. व हीं दोन वर्षें मिळून १४ वर्षें त्यांची नोकरी झाली. परंतु नियमाप्रमाणें कमींत कमी १७ वर्षें झाल्याशिवाय पेन्शनचा हक्क उत्पन्न होत नाहीं व सतरा वर्षें जरी नौकरी झाली तरी पगाराच्या $\frac{1}{3}$ पेक्षां अधिक पेन्शन मिळत नाहीं. रावसाहेबांचें असें स्पष्ट म्हणणें होतें कीं, मी नौकरी पत्करली ती केवळ सरकारचा शब्द मोडूं नये म्हणून, नौकरीपेक्षां वकिलीमध्यें माझें उत्पन्न बरेंच जास्त आहे, म्हणून मला सेवानिवृत्त करून वकिली करूं द्यावी. त्या वेळेस हा एक मोठाच चर्चेचा विषय झाला होता. कारण लोकांची नौकरी मिळविण्याची खटपट असते, तर रावसाहेबांची घालविण्याची दिसूं लागली. रावसाहेबांस त्यावेळेस पुष्कळांनीं असाही पोक्त सल्ला दिला कीं एक वर्षाची मुदत मिळते आहे तेवढी घ्यावी, व दुसऱ्या वर्षाकरितां पुढें प्रयत्न करावा. परंतु रावसाहेबांच्या आग्रही स्वभावास ही गोष्ट पटेना. त्यांना असें वाटे कीं, मीं जर असें केलें तर माझ्यांत व नौकरीकरितां हपापलेल्या लोकांत फरक तो काय राहिला? नोकरीच्या मुदतींत सरकारकडून वाढ आपण होऊन मिळाली व कोणी ती नाकारली किंवा आपल्याच अटी सरकारपुढें मांडल्या अशा प्रकारचें आमच्या संस्थानांत तरी हें पहिलेंच उदाहरण होय. रावसाहेबांची योग्यता सरकारलाही पटली होती. व त्यांच्या कामाचा प्रत्यक्ष पुरावा सरकारच्या नजरेपुढें उभा

होता. म्हणून सरकारनेंही रावसाहेबांना आणखी एक वर्षाची मुदत दिली होती. परंतु रावसाहेबांच्या मागणीमुळें सरकारमध्यें व त्यांच्यामध्यें ओढाताण सुरू झाली. रावसाहेब आपला आग्रह सोडीनात व सरकारपुढेंही स्वतःच्या इभ्रतीचा प्रश्न उभा राहिला. रावसाहेबांना असेंही सांगण्यांत आलें कीं, तुम्ही हा हट्ट धरला तर ही एक वर्षाची मुदतही मिळणार नाहीं व पेन्शनही मिळूं शकणार नाहीं. रावसाहेबांनीं चोख उत्तर दिलें कीं, " ज्यांनीं नोकरी दिली त्याला घेण्याचाही अधिकार आहे व ती माझी असें पूर्वींही मीं समजलों नाहीं. " नोकरीची मुदत संपत आली तेव्हां रावसाहेब आपण आतां वकिली करणार असें उघड उघड बोलूं लागले, इतकेंच नव्हे तर जिल्ह्यांतील ज्या प्रसिद्ध वकिलांच्या ऑफिसचीं कामें पूर्वीं रावसाहेबांकडे येत असत त्यांस त्यांनीं पत्रें लिहिण्यासही सुरुवात केली.आतां सरकारपुढें मोठाच प्रश्न पडला.सरकारासही सारासार विचार करून केशवरावांच्या योग्यतेचा मनुष्य आपल्या हातून घालविणें इष्ट वाटलें नाहीं. अजून सरकारचा हुकूम आला नव्हता व रावसाहेबांच्या नोकरीच्या मुदतीचा अखेरचा दिवस संपला तरी सरकारी हुकूम हातीं आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं रावसाहेब वकिलांच्या रस्त्यानेंच हायकोर्टांत आले, वकिलांच्या जिन्यानेंच वर चढले व वकिलांत जाऊन बसले. हें करणें इतर जज्जांस चमत्कारिक वाटलें, व सर न्यायाधिशांनीं टेलीफोननें एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलला सर्व हकीकत कळविली. त्यावर टेलिफोनवरच बाबेहुकूमतचा हुकूम हायकोर्टांत आला, व रावसाहेब पुन्हां बेंचावर जाऊन बसले. त्यांच्या इच्छेप्रमाणें तीन वर्षांची मुदतही मिळाली व सेवानिवृत्त झाल्यावर १००० रुपये पेन्शनही देण्याचें ठरलें.

सन १३३५ च्या मोहरमाचेवेळीं ( आगष्ट १९२४ ) गुलबुर्गा येथें हिंदु-मुसलमानांचा एक मोठा दंगा झाला त्याची साद्यंत हकीकत येथें देणें शक्य नाहीं. येवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं त्या दंग्यांत मुसलमानांकडूनच आततायीपणा झाला होता. दोनतीन दिवस दंगा झाला व

हिंदूंची स्थिति अत्यंत अनुकंपनीय होती. आश्चर्याची गोष्ट ही कीं, दंग्याच्या दिवसांत एकही हिंदू आपल्या घराबाहेर पडला नाहीं. श्री. शरणबसप्पा नांवाचें लिंगायतांचें प्रसिद्ध देऊळ गुलबुर्गा येथें आहे.त्यावर मुसलमानांनीं हल्ला चढविला. पोलिसांकडून मुसलमानांना देवळाकडे जाऊं न देण्याची खटपट झाली व त्यांत गुप्त पोलिसखात्याचा एक सुपरिंटेंडंट गोळी लागून मेला. हा पोलीस सुपरिंटेंडंटही मुसलमानच होता. ही बातमी हैद्राबादला समजतांच हैद्राबादेहून दंगा मोडण्याकरितां फौज पाठविण्यांत आली. फौज पोहोंचल्यावर व जिकडे तिकडे शांतता झाल्यावर देखील बिचाऱ्या हिंदूंना घराबाहेर पडण्याचेंसुद्धां धैर्य होईना. गुलबुर्गा हा गांव सोलापुरापासून ८० मैलांच्या अंतरावर जी. आय. पी. रेल्वेच्या लाईनीवर आहे. ज्यांना शक्य होतें त्यांनीं संधी साधून आपलीं बायकामुलें बाहेरगांवीं पाठवून दिलीं व घर सांभाळण्याकरितां एखादा मनुष्य घरीं राहिला. कांहीं कांहीं लोक तर इतके घाबरले होते कीं, मुसलमान दरवाजे तोडून आंत येतील म्हणून घरांच्या दरवाज्यांच्या आंतल्या बाजूस त्यांनीं दगडांच्या व विटांच्या राशी टाकल्या होत्या. मुसलमानांनीं या दंग्यांत हिंदूंचीं पांच पन्नास देवळें उध्वस्त केलीं व देवळांतील मूर्ति भ्रष्ट केल्या. हिंदूंच्या घरांत शिरून कांहीं ठिकाणीं हिंदूंच्या बायकांची मुसलमान गुंडांनीं अब्रू घेतली व एका सावकाराचें घर लुटावयास सांपडलें नाहीं म्हणून त्याच्या घरास आग लावण्याचाही प्रयत्न केला.

ह्या दंग्याची चौकशी करण्याकरितां सरकारनें एक स्वतंत्र कमिशन नेमलें होतें. एखाद्या विशिष्ट स्वरूपाचा खटला सामान्य कोर्टांत चालूं नये असें सरकारास वाटलें, तर ब्रिटिश हिंदुस्थानांत जसें "स्पेशल ट्रायब्यूनल" नेमण्यांत येतें, तसें ह्या राज्यांत कमिशन नेमण्याची पद्धति आहे. सदरहू कमिशनमध्यें न्या. केशवराव हायकोर्ट जज्ज, नवाब आगायारजंग बहादूर ( जॉ. रे. सेक्रेटरी ) व त्यावेळचे गुलबुर्गा

येथील सेशनजज्ज मौ. हाशम मोइजोद्दिन (आतां नवाब हाशिमयार-जंग) असे तीन सभासद होते. त्यांत रावसाहेब हें सर्वांत वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असल्यामुळें तेच कमिशनचे अध्यक्ष होते. ह्या कमिशननें आपल्या कामास दंगा संपल्यानंतर लवकरच सुरुवात केली. कमिशनचें थोडें काम झाल्यावर कांहीं अज्ञात कारणामुळें मौ. हाशिम मोईजोद्दीन यांचे ऐवजीं नवाब जुलकदरजंग बहाद्दर सेक्रेटरी (पोलीस वगैरे डिपार्टमेंट) यांची नेमणूक करण्यांत आली. पूर्ण चौकशीनंतर कमिशननें आपला रिपोर्ट सरकारकडे पाठविला. परंतु तो रिपोर्ट प्रसिद्ध न झाल्या-मुळें त्यांत कोणास किती शिक्षा दिली होती हें समजलें नाहीं. परंतु ज्या गुन्हेगारांवर आरोप सिद्ध होऊन त्यांना शिक्षा देण्यांत यावी असें कामिशननें सुचाविलें होतें, त्यांनाही सरकारनें माफी देऊन सोडून दिलें. अर्थात् जुलकदरजंग हे रावसाहेबांच्या बरोबरीच्या दर्जाचे, परंतु सर-कारी नौकरींत सिनिअर असल्याकारणामुळें रावसाहेबांचे ऐवजीं ते कमि-शनचे अध्यक्ष झाले. ह्या चौकशींत रावसाहेबांना अत्यंत मानसिक त्रास झाला. त्यांना असें वाटे कीं सर्व गुन्हेगार सांपडले नाहींत व त्यांविरुद्ध जास्त पुरावा यावयास पाहिजे होता तसा येत नाहीं. त्यांना यामुळेंही दुःख वाटे कीं, कसलाही संबंध नसतां हिंदू पुढाऱ्यांचीं नांवें वेळीं अवेळीं विना-कारण घेतलीं जात आहेत. त्यांनीं त्या परिस्थितींत आपल्याकडून गुन्हे-गारांवर गुन्हा शाबीत व्हावा व त्यास योग्य शिक्षा मिळावी याबद्दल शक्य ती खटपट केली. गुलबुर्ग्याच्या दंग्यामुळें ही गोष्ट जगाच्या निद-र्शनास आली कीं संस्थानांतील हिंदू लोक किती हीनदीन व दुबळे आहेत व आपल्या संरक्षणाची सुद्धां त्यांच्यांत ताकद नाहीं. दंगा शांत झाला. कमिशनचे सभासद गुलबुर्ग्यास पोहोंचले व हैद्राबादची पुढारी मंडळी परिस्थितीचें अवलोकन करण्याकरितां तेथें गेली, तरी तेथील हिंदू घरा-च्या बाहेर सुद्धां पडले नव्हते व पडण्याचीही त्यांची हिंमत नव्हती. पुढारी मंडळींनीं आम्ही येणार असें तारेनें कळविलेंही होतें. परंतु "तुम्ही येऊं नका, येथील परिस्थिति फार नाजूक आहे." असा उलट

निरोप पाठविण्यांत आला होता. सरकारी अधिकारी तेथें गेले असल्या-मुळें, हिंदू पुढाऱ्यांस डांक बंगल्यांतही जागा मिळाली नाहीं. म्हणून त्यांस स्टेशनजवळील एका ओसाड देवळाचा आश्रय करावा लागला. ज्या हिंदू स्त्रियांवर बलात्कार झाला होता त्यांच्याबद्दल कोणी अब्रूला भिऊन, तर कोणी अशा तक्रारींपासून उपयोगही होणार नाहीं असें वाटत असल्यामुळें पोलीसजवळ तक्रारही केली नाहीं. गुलबुर्गा शहरास रावसाहेब आपलें स्वत:चें गांव समजत. त्यामुळें तेथील हिंदूंच्या ह्या अनुकंपनीय स्थितीपासून त्यांस कित्येक दिवस झोंपही आली नाहीं. ह्या दंग्यासंबंधीं विशेष गोष्ट जी रावसाहेबांच्या नजरेस आली ती ही होय कीं, मुसलमान गुंडांना स्टेशनच्या कांपा-ऊंडामध्यें घुसण्याची छाती झाली नाहीं. कारण रेल्वे लाईनवर ब्रिटिश सरकारचा ताबा असल्यामुळें तेथें इंग्रजी पोलीसची व्यवस्था होती व त्याच कारणामुळें कित्येक स्त्रिया व मुलें स्टेशनच्या वेटिंगरूममध्यें व स्टेशनच्या कांपाऊंडांत दंग्याच्या दिवसांत रहात होतीं.

गुलबुर्गा कामिशनप्रमाणेंच भूम--परंडा व बीड येथील प्रकरणांतही जीं कमिशनें नेमलीं गेलीं त्यांतही रावसाहेबांची कमिशनर म्हणन नेमणक झाली होती. रावसाहेब जज्ज असतांना सरकारकडून सीतारामबाग देवस्थान व राजा शिवराज बहादूर ह्यांच्या इस्टेटीच्या व्यवस्थेकरितां ज्या कामिट्या स्थापन झाल्या त्यांतही त्यांची एक सभासद म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. सीताराम बाग देवस्थानास तीन गांवें जहागीर आहेत. देवस्थानचें वार्षिक उत्पन्न ५०००० रु. आहे. परंतु व्यवस्था नीट होत नाहीं ह्या सबबीवर सरकारनें तीं आपलेकडे घेतलीं व त्याकरितां एक कमिटी नेमली. त्याचप्रमाणें राजा शिवराजबहादूर ह्या नांवाचे एक प्रसिद्ध हिंदु जाहागिरदार होते. त्यांच्या जहागिरींचें उत्पन्न ५।३ लक्षांचें होतें. सरकारनें यांच्या जहागिरीची व्यवस्थाही आपल्याकडे ह्या सबबीवर घेतली कीं, व्यवस्था चांगली होत नाहीं, व त्यामुळें कर्ज जास्त झालें आहे. ह्या दोन्ही कमिट्यांवर रावसाहेबांनीं बरींच वर्षें काम केलें.

कोणतेंही काम हातांत घेतलें म्हणजे तें श्रद्धेनें करावें असा राव-साहेबांचा स्वभाव होता. जज्ज असतांना इ. स. १९२५ / १३३५ सालीं एकदां त्यांचा मधुमेहाचा विकार जास्त बळावला व त्यांना काळपुळयाही झाल्या होत्या. त्यांची स्थिति फार चिंताजनक होती व पुढें त्यांस डॉक्टराच्या सल्ल्यावरून सिकंदराबाद येथील दवाखान्यांत ठेवण्यांत आलें.तेथें ऑपरेशन केल्यावर त्यांची प्रकृति थोडी सुधरूं लागली. अजून ते कडक पथ्यावरच होते. डॉक्टरनीं त्यांस ब्रेडचे एक दोन तुकडे, एक दोन कप दूध व दोन तीन संत्रीं यापेक्षां जास्त खाण्याचीही परवानगी दिली नव्हती. उठून बसण्याची व थोडीबहुत चालण्याची शक्ति आली होती. डॉक्टरनें मोटारमध्यें फिरण्याची परवानगी दिली होती. त्याचा फायदा घेऊन रावसाहेब दवाखान्यांत "इन डोअर" पेशन्ट असतांनाच हायकोर्टांत येऊन बेंचावर बसले. सगळयांनाच त्यामुळें फार आश्चर्य वाटलें. त्यांच्या विशेष प्रेमी मंडळींना त्यांच्या प्रकृतीबद्दल काळजी वाटून त्यांच्या या कृतीचा रागही आला, व त्यांनीं तसें बोलूनही दाखविलें. परंतु त्यांनीं तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं, व "मी विशेष काम करीत नाहीं, दवाखान्यांत पलंगावर पडून कंटाळा येतो," वगैरे सबबी सांगून याप्रमाणें जवळ जवळ आठवडाभर रावसाहेब कचेरीच्या वेळीं हाय-कोर्टांत काम करीत व बाकीच्या वेळीं ते दवाखान्याचे "इन् डोअर पेशंट" असत. ह्या एका उदाहरणावरून, त्यांची कर्तव्यतत्परता, त्यांचा काम करण्याचा उत्साह, व त्यांचा निरलसपणा यांची साक्ष पटते.

इ. स. १९२६ / १३३६ फ. सालीं पांच वर्षें नौकरी झाल्यावर ते सेवानिवृत्त झाले. साहजीकच त्यांच्यापुढें खर्चाचा प्रश्न पडला. त्यांनीं जरी हजारों रुपये मिळविले असले तरी त्यांच्या उदारपणामुळें त्यांनीं हजारों रुपये सार्व-जनिक कार्याला दिले होते, आणि सेवानिवृत्त झाल्यावरही सार्वजनिक कार्याला मदत करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांचा खर्चही दांडगा होता. नुसता पेट्रोलचाच खर्च त्यांना तीनशें चारशें

रुपये महिना येई. पुण्यास व बाहेरगांवीं नेहमीं जाण्याचा खर्च व मुलांचा व जांवयाचा विलायतेंतील शिक्षणाचा खर्च, यामुळें त्यांच्याजवळ शिल्लक फार थोडी होती. जी इस्टेट त्यांनीं केली होती ती प्रायः घरें-दारें व जमिनीच होत्या. पण त्यापासून उत्पन्न बेताचेंच होतें. घरांची, बंगल्यांची व जमिनींची किंमत जरी जास्त असली, तरी किंमतीच्या मानानें उत्पन्न कमीच येई. खर्च वाढलेला व सार्वजनिक कामाला मदत करण्याची इच्छा, ह्या दोन्ही गोष्टी हजार पांचशें रुपयांत होणें शक्य नव्हतें. ह्या वेळेस त्यांचीं दोन मुलें विलायतेंतच शिक्षण घेत होतीं. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून सेवानिवृत्त झाल्यावरही रावसाहेबांनीं पुन्हां वकिली करण्याचा बेत केला. त्यांत त्यांचा दुसरा असाही हेतु होता, कीं संस्थानांत न्यायाधिशानें वकिली करणें कमीपणाचें आहे, ही कल्पना खोडून काढावी. हायकोर्टाच्या न्यायासनावरून उतरून दुसऱ्याच दिवशीं त्यापुढें उभा राहून वकील या नात्यानें भाषण करणें, ह्याचें संस्थानांत रावसाहेबांचें पहिलेंच उदाहरण होय. रावसाहेबांच्या ह्या वागण्याचें दुसऱ्या न्यायाधिशांसही फार आश्चर्य वाटलें. कल्पना ही कीं न्यायाधीश मोठा व वकील लहान, व त्यामुळें न्यायासनावरून सेवानिवृत्त झाल्यावर वकिली करणें कमीपणाचें आहे. रावसाहेबांना वकिलांबद्दल फार अभिमान वाटे व ते वकिलांचा दर्जा न्यायाधिशा-पेक्षांही मोठा समजत. ते नेहमीं ब्रिटिश हायकोर्टाचीं उदाहरणें दाखवीत व म्हणत, कीं तिकडील हायकोर्टांत जसा वकील व न्यायाधीश ह्यांत फरक नाहीं, तसा येथेंही जज्जांच्या मनांत फरक असूं नये. येथील सर न्यायाधीश हेही पूर्वी ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रसिद्ध वकील होते. त्यांना रावसाहेबांच्या ह्या विचारांचें मोठें कौतुक वाटलें. तेही प्रसंग-विशेषीं नेहमीं म्हणत असतात, कीं बार आणि बेंच ह्यांच्यांत एकच पावलाचा फरक आहे. एका पावलानें बेंचवरील मनुष्य बारमध्यें जातो व बारमधील मनुष्य बेंचवर येतो.

---

# प्रकरण ५ वें

## सार्वजनिक कामें

### ( सभा व शिक्षणसंस्था )

रावसाहेबांची सार्वजनिक कामगिरी बहुविध होती, व त्यांचें महत्त्व त्यांच्या सार्वजनिक कामामुळेंच आहे. त्यांच्या सार्वजनिक कार्यांचें महत्त्व येथील एकंदर परिस्थिति पाहूनच ठरविलें पाहिजे. हिंदुस्थानांत सध्यां जे मोठमोठे पुढारी आहेत, त्यांची धडाडी व त्यांचा स्वार्थत्याग फार मोठा आहे. अर्थात् त्यांच्या बरोबर रावसाहेबांची तुलना करणें योग्य होणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील ह्या प्रसिद्ध व्यक्तीही मागील ४०।५० वर्षांच्या सार्वजनिक कामगिरीमुळेंच उत्पन्न झाल्या व त्यांच्या कामगिरीस वाव मिळूं शकला. न्या. रानडे, कै. गोपाळ कृष्ण गोखले, किंवा लो. टिळक ह्यांच्या कामगिरीची तुलना महात्मा गांधी किंवा जवाहरलाल नेहरू ह्यांच्यांशीं होऊं शकणार नाहीं. कारण त्या व्यक्ती निराळया परिस्थितींत उत्पन्न झाल्या होत्या व त्यांचें कार्यक्षेत्रही वेगळें होतें. रानडेप्रभृति जुन्या पुढाऱ्यांचें कार्य म. गांधी किंवा जवाहरलाल नेहरू ह्यांच्या कार्याशीं तुलना करून फिकें पडेल हें खरें, परंतु त्यामुळें त्यांच्या कार्याचें महत्त्व कमी होत नाहीं. त्याचप्रमाणें रावसाहेबांच्या सार्वजनिक कार्याची तुलना ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांशीं करून त्या मानानें त्यांच्या कार्याचें महत्त्व ठरविणें योग्य होणार नाहीं. तर रावसाहेबांच्या कार्याचें महत्त्व येथील परिस्थितीच्या सापेक्षत्वानेंच ठरविलें पाहिजे.

हैद्राबाद संस्थान हें जरी सर्व संस्थानांत विस्तार व उत्पन्न ह्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें असलें, तरी सर्व तऱ्हेच्या सुधारणेंत तें बरेंच मागें आहे. येथील साक्षरांचें प्रमाण शेंकडा ३ पेक्षां जास्त नाहीं.

येथील एकंदर राजकीय व्यवस्था, व्यवस्था या नांवास शोभण्यासारखी, अशी नवाब सर सालारजंग ह्यांच्या काळापासून सुरू झाली. रावसाहेबांनीं $\frac{\text{इ. स. १८९६}}{\text{१३०६}}$ फसलींत हैद्राबाद एथें वकिली करण्यास सुरुवात केली. त्या वेळेपर्यंत हैद्राबाद संस्थानांत कायदे-कौन्सिलही स्थापण्यांत आलें नव्हतें. निरनिराळ्या बाबींसंबंधीं सर-कारी सर्क्युलरें ( गस्त्या ) निघत असत व त्याप्रमाणें अम्मल होत असे. पुष्कळ गोष्टी केवळ अधिकाऱ्यांच्या मर्जीप्रमाणेंच होत, व तालुकदार हा आपणांस आपल्या जिल्ह्याचा राजा समजे. तो जर स्वभावानें चांगला असला तर प्रजेला सुख होई. शिक्षणाचा प्रसारही संस्थानांत विशेष नव्हता. फक्त निजाम कॉलेज हें एकच कॉलेज होतें आणि त्यांतही ३०–३५ विद्यार्थ्यांपेक्षां जास्त विद्यार्थी नसत. सन १३०० फ. ( १८९१ ) मध्यें संस्थानांतील हिंदूंची एकंदर लोकसंख्या १०३१५२४९ होती व त्यांतील साक्षरांची संख्या ३४६४७५ होती; म्हणजे सरासरी ३० माणसांत १ साक्षर होता, व केवळ स्त्रियांचें साक्षरतेचें प्रमाण पाहिल्यास तें अत्यंत खेदजनक होतें. ९५४ स्त्रियांत फक्त एक स्त्री साक्षर होती, म्हणजे फक्त आपली सही करूं शकत असे. संस्थानांत शिक्षणाची व्यवस्थाही समाधानकारक नव्हती.

शिक्षणाची स्थिति वरप्रमाणें व त्यांतल्यात्यांत इंग्रजी शिक्षण फारच कमी, इतकेंच नव्हे तर त्या काळांत अशा विचारांचीं पुष्कळ माणसें होतीं, कीं इंग्रजी शिक्षण घेणें म्हणजे पाप समजत व इंग्रजी शिक्षणानें तरुण अधार्मिक होतात अशी त्यांची कल्पना होती. सुखवस्तु ब्राह्मणांत सुद्धां जगांत काय चाललें आहे याची मुळींच कल्पना नव्हती. लिहिणारा वाचणारांना सुद्धां कलकत्ता कोठें आहे, म्हणजे हिंदुस्थानांत कीं विलायतेंत, याची माहिती नसे. वर्तमानपत्र काय असतें व तें कां वाचावें याचीही त्यांना माहिती नव्हती. आपल्या गांवांतून बाहेर जाणें याची त्यांना संवयच नव्हती. वाहतुकीचीं साधनेंही फार

कमी असत. त्यामुळें हिंडणें फिरणेंही कठीण असे. टपालाचीही नीट व्यवस्था नसल्यामुळें टपालमार्गानें जें ज्ञान मिळतें तेंही मिळत नसे. थोडक्यांत असें कीं प्रत्येक मनुष्य आपल्या परिस्थितीच्या बाहेर जाऊं शकत नसे. ब्राह्मणवर्गांत सुद्धां महत्त्वाकांक्षा मुळींच नव्हती. परमेश्वरानें जन्माला घातलें आहे, तेव्हां चार दिवस काढले पाहिजेत अशा उदासीन वृत्तीनें ते रहात असत. त्यांच्या ठिकाणीं अत्यंत अकर्तृत्व बाणलेलें होतें व प्रत्येक गोष्टींत ईश्वरावर भार घालण्याच्या नेभळट कल्पनांनीं त्यांना पछाडिलें होतें. उल्हास नाहीं व मी अमुक एक गोष्ट करीन अशी इच्छाही नाहीं. समाजसेवा तर दूरच राहिली, परंतु स्वकुटुंबसेवासुद्धां त्यांच्याकडून कमीच होत असे. कुटुंबाच्या सांपत्तिक उन्नतीकरितां झटणें, इकडे सुद्धां त्यांचें लक्ष नसे. मुलगा उत्पन्न झाला म्हणजे त्यांना आनंद होई खरा, परंतु त्याच्या शिक्षणाबद्दल ते उदासीन असत. साधारण थोडेसें मराठी शिकला तर त्यांस मोठें कौतुक वाटे; काय दोन चार वडिलार्जित शेतें पोतें असतील तेवढींच जर कायम राहिलीं तर त्यांत ते आपला पुरुषार्थ मानीत. दहाव्या बाराव्या वर्षीं मुलांचें लग्न करून दिलें म्हणजे आपण पुत्रऋणांतून मुक्त झालों असें समजलें जाई. जास्त महत्त्वाकांक्षा म्हणजे थोडें उर्दू शिकून ५।२५ रुपयांची नौकरी मिळविणें हींच होती. तात्पर्य समाजसेवा, समाजकार्य, यांबद्दल लोकांचे मनांत कल्पनाही उत्पन्न झाली नव्हती व झालीच तर ते असें विचारीत, कीं आम्ही घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या काय म्हणून भाजाव्या ? अशा परिस्थितींत रावसाहेबांनीं सार्वजनिक कार्यास सुरुवात केली. वास्तविक आश्चर्य हेंच वाटतें, कीं ज्या गृहस्थाचें शिक्षण सुद्धां नीट झालें नाहीं, ज्याला इंग्रजीचा गंधही नव्हता, ज्याला अपेक्षेपेक्षां दोन पैसे जास्त मिळत होते व पूर्वीची गरीबी जाऊन श्रीमंती आल्यावर कालमानानुरूप चैनीकडे प्रवृत्ति न जातां देशकार्याकडे कशी काय वळली ! वरील परिस्थिति लक्षांत घेऊनच रावसाहेबांच्या कार्याचें महत्त्वमापन केलें पाहिजे.

रावसाहेबांची कामगिरी सर्वांगीण होती. अर्थात्च या अल्प चरित्रांत त्यांची सांगोपांग माहिती देणें कठीण आहे. हैद्राबादेस सध्यां ज्या निरनिराळ्या चळवळी चालू आहेत त्यांचें जनकत्व रावसाहेबांच्याकडेच आहे, व क्वचितच अशी संस्था सांपडेल, कीं जीस रावसाहेबांची मदत झाली नाहीं. रावसाहेब हे कॉंग्रेसचे मोठे भक्त होते, व ते जज्ज होईपर्यंत दरवर्षी नियमानें कॉंग्रेसला जात. नौकरी पत्करल्यावर नियमानुसार कॉंग्रेसला जाणें त्यांना अशक्य होतें, म्हणूनच ते नंतर गेले नाहींत. मित्रमंडळी कॉंग्रेसला जात असतां आपणांस त्यांचा हेवा वाटतो असें ते म्हणत. प्रागतिक पक्षाच्या चळवळीबद्दलही त्यांना फार आदर वाटत असे, व लिबरल फेडरेशनलाही बहुधा ते जात असत. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचा व त्यांचा फार निकट संबंध होता. व सोसायटीच्या वार्षिक समारंभास ते बहुधा नियमानें हजर रहात असत.पुणें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा व त्यांचाही फार जवळचा संबंध असे. तिच्या कार्याबद्दल त्यांना अभिमान वाटे व शक्य तों ते सांपत्तिक मदतही करीत असत. मराठ्यांचा इतिहास हा त्यांच्या आवडीचा विषय होता, व त्यामुळें ते भारत इतिहास संशोधक मंडळाचेही सभासद असत. त्यांनीं ह्या मंडळापुढें कांहीं निबंधही वाचिले होते. उमरावती येथील विदर्भ साहित्य संघाचे ते अध्यक्ष होते व ते विदर्भ साहित्य परिषदेच्या जळगांव येथील अधिवेशनाचे अध्यक्ष होते. पुणें येथें भरलेल्या वाचनालय परिषदेचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचें ते एक सभासद असून साहित्यसंमेलनाच्या बहुधा प्रत्येक अधिवेशनास हजर असत. १९३१ सालीं त्यांस परिषदेनें उपाध्यक्ष निवडिलें होतें. पुण्याच्या वसंतव्याख्यानमालेला ते बहुधा हजर असत व त्यांनीं मालेंत बरींच व्याख्यानें दिलीं आहेत. संस्थानाबाहेरील संस्थांशीं त्यांचा किती व कसा संबंध होता हें यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल व ह्यावरून त्यांस सार्वजनिक कामाची कशी गोडी होती हेंही समजेल.

संस्थानांतील त्यांचें कार्य बहुविध होतें. त्यांना व्याख्यान देण्याची अत्यंत हौस असे व जनतेला शिक्षण देण्याचा व्याख्यान हाच एक परिणामकारक मार्ग आहे असें ते समजत. बहुतेक दर महिना पंधरा दिवसांला, त्यांचें व्याख्यान कोणत्याना कोणत्या विषयावर होत असे व व्याख्यानाचा विषय धार्मिक, सामाजिक किंवा वाङ्मयविषयक असे. धार्मिक व्याख्यानें समाजसुधारणेच्या व आधुनिक दृष्टीनें देत असत. मराठी भाषेंत एखादें नवीन चांगलें पुस्तक निघालें म्हणजे ते अवश्य वाचीत व त्याबद्दल त्यांचें एखादें तरी व्याख्यान होत असे. संस्थानांत बाहेरगांवीं ते कोठें गेले तर प्रत्येक ठिकाणीं एक दोन व्याख्यानें तरी ते देत असत, व बाहेर जाणें हें त्यांच्या नेहमींच्या संवयींतलेंच असे. खुद्द हैद्राबाद येथें व संस्थानांत इतर ठिकाणीं निरनिराळ्या संस्थांचे जे वार्षिक उत्सव होतात, त्यांत बहुधा त्यांचें व्याख्यान अध्यक्ष या नात्यानें होतच असे, व जरी ते अध्यक्ष नसले तरी त्यांस अध्यक्षाच्या सूचनेवरून व्याख्यान द्यावेंच लागे. त्यांच्या अनुभवाचा, त्यांच्या विद्वत्तेचा व सामाजिक कार्य करण्याच्या हौसेचा ह्या संस्थानांत क्वचितच दुसरा मनुष्य असल्यामुळें बहुधा ते प्रत्येक सभेंत अध्यक्ष निवडले जात व त्याचप्रमाणें प्रत्येक संस्थेशीं त्यांचा संबंध असल्यामुळें वार्षिक उत्सवांचेही ते अध्यक्ष असत.ब्रिटिश हिंदुस्थानांतही ते प्रसिद्ध असल्यामुळें तिकडील कोणाही पुढाऱ्याचें हैद्राबाद येथें भाषण झालें म्हणजे त्यांचीच अध्यक्षाचे जागीं निवडणूक होई, व अध्यक्ष या नात्यानें तें कामही फार उत्तम करीत. त्यामुळें कोणत्याही सभेस हैद्राबादकरांना अध्यक्षाची वाण भासली नाहीं. पुष्कळ वेळां विनोदानें ते स्वतः म्हणत कीं "पुण्यास जसे श्री. तात्यासाहेब केळकर, त्याप्रमाणें हैद्राबादेस मी वतनदार अध्यक्ष आहें."

खुद्द हैद्राबाद शहरांत मराठी बोलणारांची संख्या १९०१ सालीं १८५६३ होती व ती आज ११२९९ आहे.त्या वेळीं हैद्राबाद येथील महाराष्ट्रीयांच्यापुढें आपल्या मुलांच्या मराठी शिक्षणाचा प्रश्न उभा होता.हैद्राबाद हें मुख्य

राजधानीचें शहर व साधारण जिल्ह्याचे ठिकाणीं जितकी लोकवस्ती असावी तितकी फक्त मराठी बोलणारांची संख्या येथें होती. परंतु मराठी शिक्षणाची मुळींच सोय नव्हती. ही उणीव दूर व्हावी म्हणून श्री. डिंग्रे आणि श्री. करमरकर ह्यांनीं एक मराठी शिक्षणाची प्राथमिक शाळा रेसिडेन्सी बाजारामध्यें १९०१ पासून सुरू केली होती. ही शाळा १९०७ पर्यंत चालली व तिला चांगलें मूर्त स्वरूप यावें व महाराष्ट्रीय मुलांच्या शिक्षणाची सोय करावी ह्या हेतूनें २५ आक्टोबर १९०७ रोजीं रेसिडेन्सी बाजारांत एक सभा भरविण्यांत येऊन ह्या शाळेचें नांव विवेकवर्धिनी पाठशाळा असें ठेवण्यांत आलें. शाळेच्या व्यवस्थेकरितां एक कार्यकारी मंडळ नेमण्यांत येऊन रावसाहेबांना ह्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें व त्यांनीं तें काम पुष्कळ वर्षें उत्तम रीतीनें बजाविलें. धनीक लोकांचा शाळेला हातभार लागावा ह्या हेतूनें मधून मधून अध्यक्ष म्हणून दुसऱ्यांचीही निवडणूक होई. तरी त्या शाळेशीं रावसाहेबांचा अखेरपर्यंत संबंध राहिला; व शेवटीं ते शाळेचे उपाध्यक्ष होते. ह्या शाळेस श्रीमंत वामनराव नाईकसाहेब ह्यांनींही पुष्कळ मदत केली. आज ही शाळा चांगली नांवारूपास येऊन भरभराटींत चालली आहे. विवेकवर्धिनी पाठशाळेचा कन्यापाठशाळा म्हणून एक विभाग आहे. त्यांत महाराष्ट्रीयांच्या १५० मुली शिक्षण घेत आहेत. मुलांच्या शाळेंत श्रीगणेशापासून मद्रास युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकपर्यंत शिक्षण देण्यांत येतें व ह्या शाळेंत सुमारें ८५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. श्री. नाईकसाहेब व रावसाहेब ह्या दोघांनाही एकमेकांच्या आंगचे सार्वजनिक कार्य करण्यास आवश्यक असणारे गुण चांगले प्रत्ययास आले व तेव्हांपासून ह्या दोन पुढाऱ्यांनीं हैद्राबादेच्या सार्वजनिक कार्याला बरीच मदत केली. विवेकवर्धिनी पाठशाळा ही सार्वजनिक संस्था आहे व तिचे नियम वगैरे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पद्धतीवर आहेत. ही संस्था महाराष्ट्रीयांची एक प्रमुख संस्था आहे व आज १ लाख किंमतीची ह्या संस्थेच्या मालकीची जमीन व

तितक्याच किंमतीची शाळेची इमारतही आहे. ही संस्था निजाम इलाख्यांतील सार्वजनिक संस्थांमध्यें पहिल्या प्रतीची आहे, व ह्या संस्थेस सध्याचें स्वरूप येण्यास रावसाहेबांची बरीच मदत झाली.

गुलबुर्गा येथें ' नूतन विद्यालय ' ही संस्था रावसाहेबांचे परम स्नेही रा. विठ्ठलराव देऊळगांकर वकील ह्यांनीं १३१८फ. ( इ. स. १९०८ ) मध्यें स्थापन केली. अर्थात् ही संस्था स्थापन करण्यांत व चालविण्यांत रावसाहेबांचा बराच हातभार लागत असे. ह्या संस्थेंतही प्राथमिक शिक्षणापासून मॅट्रिकपर्यंत शिक्षण दिलें जातें, व ह्या शाळेंत शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या सुमारें ६०० आहे. रा. विठ्ठलराव ह्यांच्या निधनानंतर रा. गोपाळराव वकील ह्यांनीं ह्या शाळेस उर्जितावस्था यावी म्हणून फार खटपट केली. ही शाळा चालविण्याकरितां मधूनमधून जेव्हां द्रव्याची बरीच अडचण पडे तेव्हां रा. गोपाळराव यांच्याबरोबर रावसाहेबही द्रव्यसाहाय्य मिळविण्याकरितां जात असत व रावसाहेबांच्या वजनामुळें लोकही शाळेला चांगली मदत करीत.

वरील शैक्षणिक संस्थांशिवाय इतरही कित्येक शाळांस रावसाहेबांची चांगलीच मदत होई. रावसाहेब पक्के जाणून होते कीं शिक्षणाशिवाय देशाची स्थिति सुधारणार नाहीं व म्हणून ते सर्वदा शाळा जितक्या जास्त निघतील तितक्या निघाव्या व चांगल्या चालाव्या याबद्दल शक्य ती खटपट करीत असत. पूर्वींच्या वैदिकधर्मप्रकाशिका ह्या संस्थेशीं त्यांचा संबंध होताच व एक्सलशिअर हायस्कूलचेही ते बरींच वर्षें अध्यक्ष होते. एक्सलशिअर हायस्कूल हें पुण्याच्या प्रो. विश्वनाथराव केसकर* ह्यांनीं काढलें होतें. औरंगाबाद येथें " सरस्वतीभुवन " व "शारदा मंदिर " ह्या नांवाच्या दोन शिक्षणसंस्था आहेत. सरस्वति भुवन मुलांची शाळा असून, शारदा मंदिर ही कन्या शाळा आहे. ह्या

---

* प्रो. केसकर हे हल्लीं पुण्या-मुंबईस असतात. ते आतां विश्वनाथ महाराज या नांवानें प्रसिद्ध आहेत.

शाळाही महाराष्ट्रीयांच्याच आहेत व त्यांस रावसाहेबांचें फार साहाय्य होई. सरस्वतीभुवनांत ४५०विद्यार्थी आहेत व शारदामंदिरांत १००।१२५ मुली आहेत. ह्या संस्थांस कै. दिगंबरदास चौधरी यांचीही मदत होती.

संस्थानांत सार्वजनिक संस्था चालविणें हें बरेंच कठीण जातें. सरकारची मदत ह्या संस्थांस व्हावी तशी होत नाहीं. अधिकारी वर्गाला महाराष्ट्रीयांच्या संस्थांबद्दल संशय वाटत असतो व त्यामुळें त्यांची करडी नजर असते. बहुजन समाजास अजूनही शिक्षणाचें महत्त्व पटलें नाहीं.त्यामुळें सार्वजनिक साहाय्य अशा संस्थांस कमी मिळतें.संस्थानांत आजही धनिकांची मनोवृत्ति अशी आहे कीं, त्यांस सहस्र ब्राह्मणभोजन घालावयास सांगितलें तर त्यांची तयारी असते, परंतु शाळेस पन्नास रुपये मागितले तर त्यांच्यानें देववत नाहींत. साधु-संन्याशांना, मठाधिपतींना किंवा भोंदू गुरूंना वर्गण्या चांगल्या पडतात व लौकर गोळा होतात, परंतु शाळेच्या वर्गणीच्या वेळेस बहुतेक टाळाटाळीच होते. लग्न विवाहादि कार्यांत हजारों रुपये खर्च होतात, परंतु शेंपन्नास रुपये सार्वजनिक शाळांस देणें जड जातें. ह्या सर्व परिस्थितीचा परिणाम असा होई, कीं सार्वजनिक संस्था चालविण्याचा भार रावसाहेब व श्री. वामनरावजी नाईक अशांसारख्या व्यक्तींवरच पडे. हैद्राबाद संस्थानांत महाराष्ट्रीयांच्या नांव घेण्यासारख्या संस्था बोटावर मोजण्याइतक्याच असाव्या ही खेदाची गोष्ट खरीच, परंतु रावसाहेबांसारख्यांचें लक्ष इकडे नसतें व त्यांनीं खटपट केली नसती तर त्यासुद्धां अस्तित्वांत आल्या असत्या किंवा नाहीं याबद्दल शंकाच आहे.

मुलांस शिक्षण देण्याकरितां म्हणून ज्याप्रमाणें शाळा असतात त्याप्रमाणें प्रौढांचें शिक्षण ग्रंथसंग्रहालयें व वर्तमानपत्रें ह्या मार्गानें होतें. ह्या तत्त्वाला अनुसरून रावसाहेबांनीं वाचनालयें व ग्रंथसंग्रहालयें असावींत व प्रौढांनीं त्यांपासून फायदा घ्यावा अशी बरीच खटपट केली. मुंबई, ठाणें, व पुणें या ठिकाणीं जशीं मराठी ग्रंथसंग्रहालयें

आहेत तशा पद्धतीवर हैद्राबादेस मराठी ग्रंथसंग्रहालय असावें अशी त्यांची फार इच्छा होती, व आपल्या इच्छेनुरूप त्यांनीं इ. स. १९२२ सालीं एक मराठी ग्रंथसंग्रहालयही स्थापन केलें. रावसाहेबांनीं जर खटपट केली नसती तर ही संस्था हैद्राबादेस स्थापन झाली नसती. अर्थात् संग्रहालयाची अंतर्व्यवस्था करणें रावसाहेबांसारख्या विविध कामगिरीच्या मनुष्यास शक्य नव्हतें. ती उणीव प्रो. चिंतामणराव जोशी, उस्मानिया युनिव्हर्सिटीचे मराठीचे प्रोफेसर, ह्यांनीं पूर्णपणें भरून काढिली. ही संस्था रावसाहेबांच्या इच्छेनुरूप भरभराटीस आली नाहीं. याचें कारण विशेषतः समाजाचें औदासिन्य हें आहे. महाराष्ट्रियांना येथें जी अडचण पडते ती मुख्य एका कारणामुळें. ज्यांच्याजवळ वडिलोपार्जित संपत्ति आहे व जे मदत करूं शकतात, त्यांना सार्वजनिक कामाची गोडी नाहीं व ज्या लोकांना गोडी आहे व सार्वजनिक संस्था चांगल्या चालाव्या अशी इच्छा असते, त्यांच्याजवळ पैसा नाहीं. मराठी ग्रंथसंग्रहालयाशिवाय, मोफत वाचनालय, दक्षिणसाहित्य संघ ह्या संस्थांचेही ते अध्यक्ष होते. औरंगाबाद येथील 'बळवंत वाचनालय' ह्या संस्थेवर रावसाहेबांचें बरेंच प्रेम होतें. हें वाचनालय औरंगाबाद शहराच्या मानानें फार चांगलें आहे, हें कोणीही कबूल करील. रा. वाघमारे व इतर तरुण मंडळी ह्या संस्थेच्या व्यवस्थेकरितां झटत असते व त्यांच्या प्रयत्नांमुळें संस्थाही चांगली उर्जितावस्थेस आली आहे हें त्यांस भूषणावह आहे.

'निजाम विजय' या नांवाचें वर्तमानपत्र रा. लक्ष्मणराव फाटक ह्यांनीं सन १९२० च्या डिसेंबरमध्यें सुरू केलें व आज संस्थानांत हें एकच मराठी वर्तमानपत्र आहे. ह्या वर्तमानपत्रानें मराठीची व जनतेची अमोल सेवा केली आहे. सरकारच्या ह्या वर्तमानपत्रावरील रोषास मध्यंतरीं मूर्त स्वरूप आल्यामुळें ६ महिने तें वर्तमानपत्र सरकारी हुकमानें बंद झालें होतें. रावसाहेब स्वतः वर्तमानपत्रांत केव्हां

केव्हां लिहीत व त्यांस ह्या वर्तमानपत्राबद्दल फार अभिमान वाटत असे. त्यांच्या कामगिरीबद्दल ते प्रसंशा करीत. ह्या वर्तमानपत्रास रावसाहेबांनीं निरनिराळ्या रीतींनीं मदत केली आहे.

येथील दुसरें वर्तमानपत्र "नागरिक" ह्या नांवाचें होतें. तें तीन वर्षें चालून पुढें इ. स. १९३१ मध्यें सरकारी हुकुमानें बंद झालें. रावसाहेबांना ह्या पत्राबद्दल फार आपलेपणा वाटे व त्यांनीं ह्या पत्रास आर्थिक मदतही केली होती. ह्या वर्तमानपत्रांत बरेच धडाडीचे लेख येत व हें पत्र रावसाहेबांच्या कांहीं अंशीं मताप्रमाणें चाले. संस्थानांत मराठी भाषेंत एखादें चांगलें मासिक असावें अशी रावसाहेबांची इच्छा होती व त्याप्रमाणें कांहीं तरुण पदवीधर गृहस्थांस हाताशीं धरून 'राजहंस' ह्या नांवाचें एक मासिक त्यांनीं काढिलें. हें मासिक सरासरी दोन वर्षें व्यवस्थित चाललें व पुढें पुढें त्याचे अंक सटी सहामाहीस निघूं लागले. मासिकाचा खर्च रावसाहेब स्वतः सोशीत असत व हें मासिक नीट चालत नाहीं हें पाहून त्यांना मनस्वी खेद होत असे. त्यांच्या कार्यबाहुल्यामुळें स्वतः लेख लिहिणें व चांगल्या लेखकांकडून लेख मिळविणें अशा प्रकारचें संपादकिय कार्य होणें शक्य नव्हतें. त्यामुळें त्यांचाही नाइलाज झाला.

'रयत' ह्या नांवाचें उर्दू साप्ताहिक वर्तमानपत्र काढण्यास रा. एम. नरसिंगराव ह्यांस रावसाहेबांनींच प्रोत्साहन दिलें होतें. राजभाषा उर्दू, व अधिकाऱ्यांचीही मातृभाषा उर्दू असल्यामुळें, उर्दू वर्तमानपत्राची अत्यंत आवश्कता वाटत होती. सध्यां हैद्राबादेंत पांच दैनिक वर्तमानपत्रें उर्दू भाषेंत निघतात, व तेव्हांही दोनतीन दैनिकें निघत असत. परंतु ह्या वर्तमानपत्रद्वारें बहुसंख्याक प्रजेस शिक्षण देणारें, त्यांचीं गाऱ्हाणीं सरकारपुढें मांडणारें व सरकारच्या कामावर रयतेच्या दृष्टीनें निर्भीडपणें टीका करणारें उर्दू वर्तमानपत्र आवश्यक होतें. ती उणीव ह्या वर्तमानपत्रानें उत्तम रीतीनें भरून काढिली. ह्या पत्रांत पुष्कळ वेळां रावसाहेब स्वतः लेख लिहीत असत व कोणत्या तत्त्वावर हें

पत्र चालवावें ह्याबद्दलही सल्लामसलत देत. हें वर्तमानपत्र रावसाहेब आपल्या स्वतःच्या दक्कन लॉ रिपोर्ट ह्या नांवाच्या छापखान्यांत छापून देत. ह्या वर्तमानपत्रांत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांवर मुद्देसूद व कडक टीका येत असे व प्रजेच्या दृष्टीनें सरकारचें कोणतें कृत्य हितावह आहे ह्याबद्दल वादविवाद होत असे. हें पत्रही सरकारच्या रोषास पात्र झाल्यामुळें सरकारी हुकमान्वयें बंद करण्यांत आलें. नुक्तेंच ऐकण्यांत आलें आहे कीं, ह्या वर्तमानपत्रास सरकारनें कांहीं अटींवर पुन्हां परवानगी दिली आहे.

पुणें येथील सुप्रसिद्ध ' ज्ञानप्रकाश ' ह्या वर्तमानपत्राबद्दल रावसाहेबांस फार अभिमान वाटे. ज्ञानप्रकाशाचा संबंध सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीशीं झाल्यानंतर रावसाहेबांस हें पत्र आपलेंच वाटे. कारण ते आपणांस सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे, पटावर दाखल न झालेले सभासद समजत. जेव्हां ज्ञानप्रकाश व आर्यभूषण छापखान्यास आग लागली, त्यावेळेस रावसाहेबांनीं ५००० रु. ची देणगी जाहीर केली. यावरून ज्ञानप्रकाशवर रावसाहेबांचें किती प्रेम होतें हें स्पष्ट होतें. ते 'ज्ञानप्रकाश'चे तहाहयात वर्गणीदार असल्यामुळें तें त्यांचेकडे येतच असे, व ते तें मोठ्या श्रद्धेनें वाचीत असत. बंदी झाल्यावर तें पत्र आपणांस वाचावयास मिळावें म्हणून, तें पत्र आपल्या एका रेसिडेन्सींतील मित्राच्या नांवावर मागवीत असत व फुरसत काढून वाचीत ते नेहमीं म्हणत कीं आम्ही संस्थानांत असावें व संस्थानांत ' ज्ञानप्रकाशास ' बंदी व्हावी हें आम्हांला लांछनास्पद आहे. बंदी झाल्या दिवसापासून बंदी उठविण्याबद्दल त्यांचे सारखे प्रयत्न चालू होते व शेवटीं त्यांच्या प्रयत्नानें ज्ञानप्रकाशची संस्थानांतील बंदी उठली. ज्या दिवशीं बंदी काढून घेतल्याबद्दलचा सरकारचा खलिता रावसाहेबांच्या नांवावर आला त्या दिवशींचा रावसाहेबांचा आनंद अवर्णनीय होता. केसरीवरील बंदी उठविण्याबद्दल रावसाहेबांनीं बरीच खटपट केली पण त्यांत यश आलें नाहीं.

# प्रकरण ६ वें.

## सार्वजनिक कामें.

### ( सामाजिक व इतर चळवळी )

हैद्राबादेंत सामाजिक सुधारणेचें कार्य करण्याकरितां हैद्राबाद सामाजिक सुधारणासंघ ह्या संस्थेची स्थापना इ. स. १९१५मध्यें झाली. ह्या संस्थेचे रावसाहेब हे एक प्रमुख कार्यकर्ते आणि उपाध्यक्ष होते. ह्या संस्थेतर्फे बरीच कामगिरी झाली. श्री. राघवेंद्रराव शर्मा हे ह्या संघाचे सेक्रेटरी होते व रावसाहेबांचें व त्यांचें सहकारित्व फार उत्तम रीतीनें होत असे. ह्या संस्थेच्या विद्यमानें सामाजिक परिषदेचीं दोन अधिवेशनेंही भरविण्यांत आलीं होतीं. त्यावेळीं खुद्द हैद्राबादेंत बरोबरीनें काम करणाऱ्यांत दोन तट होते. एक पक्ष सामाजिक सुधारणेच्या विरुद्ध होता, व त्यांस समाजाच्या ज्या सनातन चाली आहेत त्यांत कोणत्याही रीतीनें फरक पडूं नये असें वाटत होतें. दुसऱ्या पक्षाचे रावसाहेब हे प्रमुख होते. समाजाची प्रगति समाज सुधारणांशिवाय होणार नाहीं, हें रावसाहेबांचें मत ठरून गेलें होतें. त्यांच्या मतें प्रत्येक धर्मसंस्थापक हा सुधारकच होता, व त्यांना असें वाटे कीं हे निरनिराळे धर्मसंस्थापक उत्पन्न झाले नसते, तर समाजाची प्रगति झालीच नसती. त्यांच्या मतें समाजाला पूर्वीच्या चालीरीतींतच डांबून ठेवणें हें समाजास अत्यंत विघातक आहे. त्यामुळें समाज मृतप्राय होतो. समाजाच्या चालीरीतींत सुधारणा करणें हें अत्यंत आवश्यक असून समाजाच्या चैतन्याचें द्योतक आहे असें तें समजत. सामाजिक सुधारणेंत त्यांचे विचार फार पुढें गेले होते. सन १९११ सालीं पुण्यास जें सहभोजन झालें व ज्यांत अस्पृश्यांचाही समावेश होता, त्या सहभोजनांत रावसाहेबांनींही भाग घेतला होता. त्यामुळें त्यांस हैद्राबाद

येथें बराच त्रास झाला. स्वतः त्यांचे घरांतसुद्धां त्यांचें पान बाहेर मांडण्यांत येई, व त्यांचें उष्टें× भोयाकडून काढविण्यांत येई. बाहेर समाजांत बहुधा जेवणाचें आमंत्रण वरील कारणामुळें कमीच ये. परंतु रावसाहेबांचा स्वभाव फार शांत असल्यामुळें व आपल्या जातिबांधवांच्या आज्ञानाची त्यांना पूर्ण कल्पना असल्यामुळें ते कधींच रागावत नसत, किंवा आपली नाखुशीही दर्शवीत नसत. त्यांना असल्या गोष्टींची पर्वाच नव्हती व ते समजून असत कीं सुधारणा करणारांना समाजाकडून अशा प्रकारचा त्रास होणारच. एकदां असें झालें कीं त्यांच्या एका मित्राचे येथें मुलांची मुंज होती. ते पक्के पुराणमताभिमानी असल्यामुळें त्यांनीं रावसाहेबांस मुंजीचें आमंत्रण दिलें नव्हतें व आमंत्रण न देण्याचें मुख्य कारण रावसाहेबांचे सहभोजनांत भाग घेणें हें होतें. रावसाहेबांना अशी कल्पनासुद्धां आली नाहीं कीं त्यांनीं मुद्दाम आमंत्रण दिलें नसेल. त्यांत मुंजीची बातमी होतीच व ते एकदम मुंजीच्या वेळेस मंडपांत दाखल झाले व स्नेह्यास म्हणाले कीं तुम्ही मला विसरलांत, परंतु मी तुम्हांला विसरलों नाहीं. रावसाहेबांच्या ह्या वागण्यानें स्नेही मात्र खजील झाले.

इ. सन १९१८ सालीं योगानंद नांवाचें एक तरुण ब्रह्मचारी हैद्राबाद येथें आले होते. ते योगासंबंधीं व्याख्यानें देत व योगासनेंही करून दाखवीत, परंतु व्याख्यानें चटकदार होण्याकरितां ते मधून मधून सुधारकांवर घसरत व त्यांच्यावर वेडीवांकडी टीकाही करीत. त्यामुळें तेथील पुराणमताभिमानी पक्षास त्यांचीं व्याख्यानें फार पसंत पडलीं व हा वर्ग त्यांचा अनुयायी बनला. ब्रह्मचारीबुवांच्या अशाच एका व्याख्यानाचे वेळीं रावसाहेबांनीं असें जाहीर रीतीनें सांगितलें कीं "व्याख्यात्यांनीं प्रतिपाद्यविषय सोडून जातां जातां एखाद्या पक्षाची विनाकारण नालस्ती करूं नये. सामाजिक विषयांवर चर्चा करावयाची

× झाडलोट, धुणेंपाणी इत्यादि घरगुती कामें करणाऱ्या मजुरांचीं एक जात. हे लोक तेलंगणांत असतात.

त्यांची इच्छाच असल्यास त्याकरितां स्वतंत्र व्याख्यानाची योजना करून प्रत्येक पक्षास आपले मुद्दे मांडण्याची संधी द्यावी. वस्तुतः राव साहेबांची इच्छा त्यांच्याशीं वाद करण्याची नव्हती. कारण ते गृहस्थ विशेष विद्वानही नव्हते.किंवा त्यांनीं या विषयाचा अभ्यासही केला नव्हता: परंतु पुराण मताभिमान्यांनीं रावसाहेबांच्या वरील म्हणण्याचा फायदा घेऊन सामाजिक विषयावर व्याख्यानें व्हावीं असा आग्रह धरला. त्याचें मुख्य कारण असें कीं, स्थानिक पुराणमताभिमान्यांची डाळ रावसाहेब व त्यांच्या पक्षांच्या मंडळीसमोर शिजत नसे. योगानंद हे चांगले वक्ते होते, चमचमीत भाषा वापरीत व श्रोत्यांना आपल्याकडे ओढून घेण्याची त्यांच्यांत शक्ती होती. याचा फायदा घेऊन त्यांच्या-कडून रावसाहेब व त्यांचे अनुयायी यांची फजिती करावी असा त्यांचा डाव होता. त्यांचे इच्छेप्रमाणें हैद्राबाद सामाजिक सुधारणा संघाच्या विद्यमानें व्याख्यानाचा कार्यक्रम ठरविण्यांत आला, व पहिलीं चार व्याख्यानें रावसाहेब व त्यांच्या मित्रांचीं निरनिराळ्या चार विषयावर झालीं. योगानंदांचें उत्तरादाखल भाषण झालें. परंतु त्यांत मुद्दा कोणताच नव्हता. व्याख्यानामुळें हैद्राबाद शहरांत बरीच खळबळ उडाली व व्याख्यानाला कधींही न जाणारीं माणसें सुद्धां व्याख्यानांस चांगली जागा मिळावी म्हणून अगोदर येऊन बसत. रोज दीड दोन हजार समाज जमा होत असें. ह्या व्याख्यानांमुळें लोकांच्या विचारांना बरीच चालना मिळाली. प्रत्येक पक्षास आपले विचार मांड-ण्यास दोन दिवस दिले जावे असें प्रारंभीं ठरलें होतें. परंतु योगानंदां-शिवाय पुराणमताभिमान्यांतर्फे कोणाचेंही भाषण झालें नाहीं. योगा-नंदांचे दुसरे दिवशींचे भाषणांत ते सुधारक पक्षावर फार घसरले व मुद्यांचा विचार न करतां त्यांच्या भाषणांत अश्लीलतेचा बराच भाग येऊं लागला. त्यामुळें सामाजिक सुधारणा संघाच्या कार्यकारी सभेला हीं व्याख्यानें बंद करण्याचा खास ठराव पास करावा लागला. तरी

पण पुराणमताभिमान्यांच्या हट्टानें त्यांचीं आणखी दोन तीन व्याख्यानें झालीं. ह्याच मतभेदामुळें पुराणमताभिमान्यांना आपलीही एखादी संस्था असावी अशी इच्छा उत्पन्न झाली व अशा परिस्थितींत हैद्राबाद सनातन धर्म संस्थेचा जन्म झाला.

सामाजिक परिषदेचें हैद्राबाद संस्थानांत पहिलें अधिवेशन सन १९१८ सालीं श्री. नंदी महाराज ह्यांचे अध्यक्षतेखालीं कवाणें, जि. नांदेड येथें भरविण्यांत आलें. दुसरें अधिवेशन हदगांव, जि. नांदेड येथें १९१९ सालीं रावसाहेबांचे अध्यक्षतेखालीं झालें.

हीं दोन्हीं अधिवेशनें कवाण्याचे देशमूख के. नागोराव ऊर्फ दादासाहेब कवाणेकर ह्या उत्साही गृहस्थांच्या खटपटीमुळें यशस्वी झालीं. तिसरें अधिवेशन श्री. वामनराव नाईक यांचे अध्यक्षतेखालीं नांदेड येथें झालें. नांदेड हा गांव गोदातटाकीं असून तेथें पुराणमताभिमानी लोकांची बरीच वस्ती आहे. अशा ठिकाणीं सामाजिक परिषद् भरून ती यशस्वी रीतीनें पार पडावी ही समाज सुधारणेची मोठीच कामगिरी झाली असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. चौथें अधिवेशन हैद्राबाद मुक्कामीं प्रो. आण्णासाहेब कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. परिषदेचे स्वागताध्यक्ष रावसाहेब होते. ह्या अधिवेशनामुळें हैद्राबाद येथें बरीच जागृति झाली. परिषदेला लोकसमूहही फार मोठा होता, व सर्व पक्षांनीं परिषदेंत भाग घेतला होता. ह्या परिषदेमुळें लोकांच्या सामाजिक विचारांत बरीच खळबळ उडाली. दोन दिवस परिषदेचें काम झालें. त्या दिवसांत लोकांच्या डोक्यांत सामाजिक प्रश्नाशिवाय दुसरा प्रश्न नव्हता. पांचवें अधिवेशन गुलबुर्गा मुक्कामीं बॅ. मुकुंदराव जयकर यांचे अध्यक्षतेखालीं झालें. ह्या अधिवेनाचे स्वागताध्यक्ष रा. गोपाळराव बोरगांवकर वकील होते. ही परिषदही बरीच यशस्वी झाली. सहावें अधिवेशन पुन्हां हैद्राबाद मुक्कामीं श्री. सरलाबाई चौधरणी, बी. ए. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. ह्या सर्व अधिवेशनांत रावसाहेब प्रामुख्यानें भाग घेत असत व सर्व कार्यक्रम बहुधा त्यांच्या सल्ल्याप्रमाणेंच होई.

अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाची सुधारणा केल्याशिवाय एकंदर हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं असें रावसाहेबांचें मत होतें. हैद्राबाद येथें आदि हिंदु सोशल सर्व्हिस लीग व त्यांच्या शिक्षणाकरितां व उद्धाराकरितां इतर ज्या संस्था आहेत, त्यांत रावसाहेब मोठ्या उत्साहानें भाग घेत असत. आपणांकडून शक्य ती मदत करीत असत.

सन १९१८ सालीं इन्फ्लुएंझाच्या सांथीमुळें संबंध हिंदुस्थानचें जें नुकसान झालें, त्यांत हैद्राबादही वांटेकरी होतें. त्यावेळेस अशी स्थिति होती कीं एकाच दिवशीं सबंध कुटुंबच्या कुटुंब इन्फ्लुएंझानें पछाडिलें जाई, व पाणी देण्यासाठीं घरांत कोणी मनुष्य नसे. शहरांत औषधें सुद्धां मिळेनाशीं झालीं व डॉक्टरवैद्यांचे येथेंही इतकी गर्दी होत असे कीं, सर्वांस औषधें देणें त्यांस अशक्य झालें. त्या वेळीं लोकांस मदत करण्याकरितां हैद्राबादकरांनीं "सोशल सर्व्हिस लीग" नांवाची संस्था काढिली. रावसाहेब त्या संस्थेचे उपाध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या स्वतःच्या घरींही दवाखाना ठेवला होता. त्यांत ते स्वतः बसत व आपले हातानें लोकांना औषधें देत. त्यांच्या हाताखालीं ५०।६० स्वयंसेवकही काम करीत होते. रोज त्यांच्या दवाखान्यांतून साधारणतः एक हजार रोग्यांना औषधें दिलीं जात. ते मधून मधून स्वतः रोग्यांच्या घरीं जात व त्यांची चौकशी करित. खाण्याची व कपड्यालत्त्याची सोय नसल्यास ती करून देत. त्यांच्या ह्या कामगिरीचा लोकांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, दोन हायकोर्ट जज्ज, कै. राय बालमुकुंदसाहेब आणि नबाब जबारथारजंग ह्यांनीं त्यांच्या दवाखान्यांत स्वयंसेवक म्हणून नांवें दाखल केलीं व रावसाहेबांबरोबर ते स्वतःही रोग्यांच्या घरोघर फिरत. ही त्यांची कामगिरी सरकारासही मान्य झाली, व सरकारकडून त्यांस सर अली इमाम ह्यांच्याहस्तें एक प्रशस्तीपत्रही देण्यांत आलें.

रावसाहेबांस व हैद्राबाद संस्थानच्या राजकीय व सामाजिक सुधारणेंत प्रामुख्यानें भाग घेणारे रावसाहेबांचे सहकारी मित्र व श्री.

राघवेंद्र शर्मा यांना असें वाटूं लागलें कीं, संस्थानांतही राष्ट्रीय सभेच्या पद्धतीवर राजकीय परिषद असावी, लोकांची राजकीय परिस्थिति सुधारावी, व प्रजेस राजकीय हक्क मिळावे. लोकांमध्यें राजकीय जागृति उत्पन्न व्हावी म्हणून त्याच सुमारास हैद्राबाद स्टेट रिफॉर्म असोसिएशन स्थापन झाली. रावसाहेब हे ह्या असोशिएशनचे उपाध्यक्ष व राघवेंद्रशर्मा हे सेक्रेटरी होते. इ. स. १९१८ सालीं एक परिषद् भरवावी असें ठरलें. ह्या सुमारास सरकारचें असें फर्मान निघालें कीं, कोणतीही राजकीय किंवा ज्यापासून राजकीय परिणाम उत्पन्न होण्याचा संभव आहे, अशी सभा सरकारच्या परवानगीवांचून भरवूं नये. यामुळें ती परिषद भरूं शकली नाहीं. हैद्राबाद येथें राजकीय परिषद भरविण्याबद्दल ह्या संस्थेतर्फे पुष्कळ प्रयत्न करण्यांत आला. परंतु त्यांत यश आलें नाहीं, व याचा परिणाम असा झाला कीं, रा. राघवेंद्रराव शर्मा ह्यांनीं मुंबई इलाख्यांत हैद्राबाद संस्थान प्रजा परिषद् भरविण्यास सुरुवात केली, व १९२१च्या आगस्ट महिन्यांत हैद्राबाद संस्थानांतील लोकांनीं संस्थानाबाहेर अकोला येथें बॅरिस्टर रामचंद्र नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं प्रजापरिषद् भरविली ही परिषद राजकीय स्वरूपाची असल्यामुळें तीस रावसाहेब हजर राहूं शकले नाहींत. तेव्हां ते सरकारी पेन्शनर होते, व सरकारी नियमाप्रमाणें त्यांना हजर राहणें शक्य नव्हते, याबद्दल त्यांस फार वाईट वाटलें व आणखी एकाद्या निमित्तानें त्यांस जर अकोल्यास त्याच सुमारास जातां येणें शक्य असतें तर तें निदान अकोल्यास तरी गेले असते.

सन १९२५ सालीं हैद्राबाद येथें महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेचें ५ वें अधिवेशन श्रीमंत राजा प्रतापगिरजी यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळेसही रावसाहेब सरकारी नोकर असल्यामुळें त्यांस परिषदेचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष होता आलें नाहीं. तरी पण परिषदेच्या प्रत्येक कार्यांत ते उत्साहानें भाग घेत व परिषद यशस्वी व्हावी याबद्दल खटपट करीत.

४८३६



हैद्राबाद येथें सन १९२७ सालीं विदर्भ साहित्य परिषदेचें ४ थें अधिवेशन झालें. त्याचे स्वागताध्यक्ष रावसाहेब निवडले गेले होते. ही परिषदही रावसाहेबांचे परिश्रमामुळेंच यशस्वी झाली.

हिंदुस्थानभर जेव्हां खिलाफत चळवळ जोरानें चालली होती तेव्हां त्याचा परिणाम हैद्रबाद येथेंही झाला, व येथें एक खिलाफत मंडळही कायम झालें. त्यांतही रावसाहेब एक जबाबदार अधिकारी होते. खिलाफत प्रकरणासंबंधीं हैद्राबादेंत पुष्कळ व्याख्यानें झालीं व श्रोतृसमाजही बराच मोठा जमत असे. त्यांत रावसाहेबांचीं बरींच व्याख्यानें झालीं. त्यावेळीं मुसलमान मंडळी रावसाहेबांना मौलवी व मोलाना या किताबानें संबोधीत व त्यांना रावसाहेब इतके प्रिय झाले होते कीं, ते त्यांना सभास्थानीं उचलून नेत असत. सन १९२० सालीं रावसाहेबांचे घरीं मुलीचें लग्न होतें व लग्नाचे दिवशींच संध्याकाळीं खिलाफतीची सभा होती. रावसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें असें अगाऊ ठरविण्यांत आलें होतें. सभेची व लग्नाची तारीख एक असल्यामुळें रावसाहेबांस सभेस जाणें बरेंच कठीण होतें व दुसरा कोणी असता तर सभेस गेलाच नसता. परंतु रावसाहेबांस आपल्या मुलीच्या लग्नाच्या सुखसोहाळ्यापेक्षां सार्वजनिक काम जास्त पसंत होतें व म्हणून त्यांनीं हजार कामें बाजूस टाकून व सभेच्या चालकांनींही त्यांच्या न येण्यास अनुमोदन दिलें असलें तरी, ते सभेस हजर राहिले, व त्यांनीं आपलें काम फार उत्तम रीतीनें बजावलें. मुसलमानांस रावसाहेबांच्या कर्तव्यनिष्ठेची कल्पना नव्हती. त्यांस रावसाहेबांचें फार कौतुक वाटलें व सभेचें काम संपल्यावर रावसाहेब खुर्चीवरून बाजूस होण्यापूर्वींच लोकांनीं खुर्चीसुद्धां त्यांस उचलून मिरवीत मोटारीपर्यंत पोहोंचविलें. पुढें सरकारी हुकुमान्वयेंच खिलाफत चळवळ बंद पडली.

हैद्राबादेस शिक्षणपरिषद बऱ्याच वर्षांपासून भरत असे. त्या शिक्षण-परिषदेचा अध्यक्ष कोणीतरी सरकारी आधिकारी असे व इतर कार्य-

चाहकही अधिकारीच असत. सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनें ह्या परिषदेनें पैसाही बराच जमा केला होता, व ह्या पैशांतून शिष्यवृत्त्याही दिल्या जात. परंतु ह्या परिषदेचा दृष्टिकोन सरकारी धोरणाप्रमाणेंच असे, व तींत रयतेच्या धोरणाप्रमाणें किंवा रयतेच्या फायद्याचें विशेष काम न झाल्यामुळें, हैद्राबादकरांनीं ऑक्टोबर १९२८ मध्यें पीपल्स एज्युकेशनल कान्फरन्स ( प्रजाशिक्षणपरिषद् ) ही निराळी संस्था काढली. ह्या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ कुंझरु व स्वागताध्यक्ष श्रीमंत राजा धनराजगिरजी हे होते. ह्या परिषदेचीं दोन अधिवेशनें झालीं. परंतु तिसरें अधिवेशन सरकारची परवानगी अजून न मिळाल्यामुळें झालें नाहीं. ह्या दोन्ही परिषदेंत रावसाहेब हे एक प्रमुख कार्यकर्ते होते व परिषदेचें पुष्कळसें कार्य त्यांच्या सल्ल्याप्रमाणेंच होई.

रावसाहेबांच्या आयुष्यांतील सर्वांत महत्त्वाची शेवटची परिषद् म्हणजे महाराष्ट्र साहित्य संमेलन होय. महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या प्रत्येक बैठकीस रावसाहेब बहुधा हजर असत. गोव्यास जेव्हां या संमेलनाचें १५ वें अधिवेशन झालें, तेव्हां रावसाहेबांनीं हैद्राबादकरांतर्फे आमंत्रण दिलें व या संमेलनाचें १६ वें अधिवेशन डॉ. केतकर यांच्या अध्यक्षतेखालीं हैद्राबाद येथें झालें. या संमेलनाची पूर्ण जबाबदारी रावसाहेबांनीं आपल्या शिरावर घेतली होती. रावसाहेबांची प्रकृति चांगली नव्हती. ते वृद्ध झाल्यामुळें शारीरिक कष्ट त्यांच्याकडून होत नसत. हैद्राबादचा उन्हाळा कडक असल्यामुळें दरवर्षीं ते नेहमीं बाहेर जात. तरी पण संमेलनाकरितां ते हैद्राबादेंतच राहिले व त्यांनीं शरीरस्वास्थ्याची यत्किंचितही पर्वा न करितां संमेलन यशस्वी होण्याकरितां रात्रंदिवस बरीच खटपट केली. संमेलनास संस्थानांतील सर्व ठिकाणांहून प्रतिनिधी यावे, म्हणून त्यांनीं उन्हाळ्यांत सुद्धां संस्थानांत दौरा काढला व प्रतिनिधींच्या नांवांची नोंदणी करून घेतली. श्री. राजा धुंडीराज बहादूर रायरायान व रावसाहेब आर. एल.

जोशी यांनीं सुद्धां पुष्कळ परिश्रम केले. राजेसाहेब स्वागताध्यक्ष होते. रा. सा. जोशी हे सेक्रेटरी होते. संमेलनांत थोडींबहुत विघ्नें आलीं तरी संमेलन फार चांगलें झालें. हैद्राबाद येथील संमेलनाबद्दल हकीकत सर्व मराठी वर्तमानपत्रांतून आलीच होती, व एकदोन महिनेपर्यंत वर्तमानपत्रांतून त्यासंबंधाची चर्चा चालली होती. रावसाहेबांनीं त्या वेळेस किती श्रम घेतले हें वाचकांस माहीत आहेच. रा. सा. जोशांनीं संमेलनाचे शेवटीं आभार मानतांना रावसाहेबाविषयीं असे उद्गार काढिले होते कीं, "रावसाहेब म्हणजेच संमेलन व संमेलन म्हणजेच रावसाहेब," व हे उद्गार यथार्थ होते.

रावसाहेब स्वतंत्र विचारांचे असल्यामुळें त्यांस पुराणमताभिमानी राहणें शक्यच नव्हतें. आपल्या समाजांत धर्माचे नांवाखालीं पुष्कळ अयोग्य चालिरीती शिरल्या आहेत, व त्या सर्व काढून टाकल्या-शिवाय समाजसुधारणा होणार नाहीं, असें त्यांस वाटत असे. ते पुराणमताभिमानी नव्हते, याचा अर्थ ते वेद व स्मृतिग्रंथ मानीत नसत असा मात्र मुळींच नाहीं, उलट ते वेदांचे कट्टे अभिमानी होते. म्हणूनच त्यांचा कल साहाजिकपणें आर्य समाजाकडे वळला व ते कट्टे आर्य-समाजी बनले. सुरुवातीस ते आर्यसमाजाच्या नियमाप्रमाणें रोज होम-हवन करीत व पुष्कळ वेळ मूर्तिपूजेच्या खंडनार्थ त्यांनीं व्याख्यानेंही दिलीं होतीं. आर्यसमाजाच्या पुष्कळशा कल्पना नव्या वाटून त्यांचा ते मोठा अभिमान बाळगीत. कांगडी येथील गुरुकुल ही नमुनेदार संस्था आहे असें समजून त्यांनीं आपल्या वडील मुलास गुरुकुलाच्या नियमांप्र-माणें त्याच्या ८ व्या वर्षींच गुरुकुलीं ठेविलें व चौदा वर्षेपर्यंत मुलांस राहूं देऊन त्यांचा तेथील सर्व अभ्यासक्रम संपविण्याची त्यांस संधि दिली. या चौदा वर्षांत त्यांस एकदां सुद्धां घरीं आणिलें नाहीं. ते बहुधा स्वतः वार्षिक उत्सवास कांगडी एथें जात. हैद्राबाद येथील आर्य-समाजांत त्यांची कामगिरी बहुमोलाची झाली. ते कित्येक वर्षें येथील आर्यसमाजाचे अध्यक्ष होते. आर्यसमाजाचें येथील मंदिर हें

त्यांच्याच प्रयत्नाचें फळ आहे. येथील आर्यसमाजांत सुशिक्षितांचा जसा भरणा आहे, तसा अशिक्षितांचाही आहे; किंबहुना तो थोडा अधिकच आहे. अशा लोकांशीं रावसाहेबांस पुष्कळच उरस्फोड करावी लागे. तरी पण आर्यसमाजाचें कार्य ते मोठ्या आनंदानें करीत. हैद्राबाद येथील आर्यसमाज ही एक जबरदस्त संस्था आहे व ह्या संस्थेकडून पुष्कळ महत्त्वाची कामगिरी झाली आहे. हैद्राबादच्या बिकट परिस्थितींत सुद्धां ह्या संस्थेनें जें कार्य केलें त्याचें कोणासही कौतुकच वाटेल. व त्याचें बरेंचसें श्रेय रावसाहेबांच्या वाट्यांस जातें. ह्या संस्थेंत रावसाहेबांनीं पुष्कळ धडाडीनें काम केलें. सरकारी नौकर झाल्यावर रावसाहेबांच्या पुष्कळ मित्रांनीं आर्यसमाजाचा त्यांनीं संबंध सोडावा असा त्यांस सल्लाही दिला होता. परंतु रावसाहेबांस तो पटला नाहीं व शेवटपर्यंत रावसाहेब आर्यसमाजाचे अध्यक्ष राहिले.

रावसाहेब आर्यसमाजी असल्यामुळें आरंभीं आरंभीं त्यांस थोडाबहुत सामाजिक त्रास झाला. परंतु रावसाहेबांचा स्वभाव शांत व गोड असल्यामुळें पुढें त्यांना मुळींच त्रास झाला नाहीं. त्यांची वागणुकही अशा प्रकारची होती कीं, नवीन माणसास ते आर्यसमाजी आहेत असें वाटतही नसे. ते वैदिक, शास्त्री वगैरे आले असतां त्यांचा बहुमान करीत. दरवर्षीं गणपतिउत्सवांत त्यांचीं व्याख्यानें होत व हिंदु देवालयांसंबंधीं जरी एखादा प्रश्न उत्पन्न झाला तरी ते आर्यसमाजी म्हणून दूर रहात नसत. पुढें पुढें त्यांच्या मतांत बराच फरक पडला होता. कांहीं वर्षांपासून इतर हिंदु समाजाचा व आर्यसमाजाचा पूर्वींचा अलिप्तपणा जाऊन जसा सर्व हिंदुस्थानभर एकोपा झाला आहे, तसा हैद्राबादेंतही झाल्यामुळें, बहुजनसमाजाच्या मनांतही हिंदु व आर्यसमाज हा भेद राहिला नाहीं.

रावसाहेबांची हैद्राबाद कायदे–कौन्सिलांतील कामगिरी वाखाणण्यासारखी झाली. १३०७ फसलीच्या कायद्यान्वयें हैद्राबाद संस्थानाकरितां, कायदेकानू करण्यास लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची ( कायदे-

मंडळाची ) स्थापना झाली. ह्या कायदेमंडळास फक्त कायदे करण्याच्याच अधिकार आहे. सरकारच्या परवानगीशिवाय कोणत्याही सभासदास सार्वजनिक पैशासंबंधीं, धर्मासंबंधीं, निजाम सरकारचें लष्कर किंवा ब्रि. सरकारबरोबरचे संबंध, तसेंच कायदेकौन्सिलच्या घटनेंत फेरफार करण्यासंबंधीं, कोणतेंही बिल आणतां येत नाहीं, किंवा त्यावर वादविवादही होत नाहीं. सभासदांस सरकारी धोरणासंबंधीं, राज्यकारभारासंबंधीं चर्चा करण्याचा अधिकार नाहीं किंवा अंमलबजावणी खात्यांसंबंधीं प्रश्नही विचारण्याचा अधिकार नाहीं. ह्या कौन्सिलनें पास केलेल्या कायद्यांत हरतऱ्हेचा फेरफार करण्याचा अधिकार निजाम सरकारनें आपणाकडे राखून ठेवला आहे. इतकेंच नव्हे तर एखादा विविक्षित कायदा कौन्सिलनें पास करावा अशी इच्छा दर्शविल्यास कौन्सिलास तो कायदा पास करावाच लागतो. ह्या कौन्सिलचा उपयोग फक्त कायदे करण्यापुरताच आहे व ब्रि. हिंदुस्थानांतील कायद्याच्या पद्धतीवर येथेंही बहुतेक कायदे झाले आहेत. ह्या कायदेमंडळाचे १४ सरकारी व ११ बिनसरकारी सभासद आहेत. दर दोन वर्षांनीं हायकोर्ट वकिलांतर्फे दोन सभासद व जहागीरदारांतर्फे दोन सभासद निवडून दिले जातात. एक सभासद म्युनिसिपालटीचा प्रतिनिधि व २ डिस्ट्रिक्ट बोर्डाचे प्रतिनिधी असतात. व चार सभासदांची नेमणूक कौन्सिलचा अध्यक्ष आपल्या अधिकारांत करतो.

ज्या कौन्सिलची घटना वरील स्वरूपाची आहे, तेथें प्रजेच्या हिताचें विशेष काम करण्याचा वाव कमीच. तरी पण अशाही परिस्थितींत रावसाहेबांनीं कौन्सिलमध्यें बरेंच काम केलें. ते कौन्सिलमध्यें लोकलबोर्डाकडून व हायकोर्ट वकीलांकडून निरनिराळ्या वेळीं निवडून आले व अध्यक्षांनींही आपल्या अधिकारांत त्यांस बरेच वेळां सभासद नेमिलें. अशा रीतीनें त्यांनीं एकंदर कौन्सिलमध्यें बरींच वर्षें काम केलें, व त्यामुळेंच रावसाहेब महाराष्ट्रांत ना. केशवराव ह्या नांवानेंच जास्त प्रसिद्ध होते.

त्यांच्या सदस्यत्वाच्या काळांत पुष्कळ महत्वाचे कायदे पास झाले व त्याच कायद्यांमुळें सध्यां हैद्राबादेंत व ब्रि. हिंदुस्थानांत कायद्याचे दृष्टीनें विशेष फरक नाहीं.त्यांनीं विधवा विवाहासंबंधीं नुकतेंच कौन्सिल-पुढें बिल मांडलें होतें व त्यामुळें संस्थानांत बरीच गडबड उडाली होती. हें बिल आणण्याचें कारण असें होतें कीं, संस्थानांत सामाजिक सुधारणेचा थोडाबहुत प्रसार झाला असल्यामुळें कांहीं विधवांनीं पुनर्विवाहही केले आहेत. अशा विवाहाची संतती अनौरस समजली जाऊं नये व आपल्या बापाच्या वारशापासून विन्मुख होऊं नये. त्यांनीं आपल्या बिलांत ह्या मुद्यांवरच जास्त लक्ष ठेविलें होतें व म्हणून ते असेंही म्हणत,कीं "माझें बिल विधवाविवाहाचें नसून, त्याचा उद्देश अशा विवाहापासून झालेलीं मुलें कायदेशीर समजलीं जावीं असा आहे." ते म्हणत कीं, "आईबापांच्या कृत्याची जबाबदारी अर्भकांवर पडूं नये." ह्या बिलास संस्थानांतील सनातनीयांकडून बराच विरोध झाला (सनातनीयांचे पुढारी श्री. वामन नाईक हें आहेत) त्यांस असें वाटूं लागलें कीं, या बिलामुळें सनातन धर्मावर मोठेंच अरिष्ट कोसळणार ! मुसलमानांनाहीं हें बिल पास होणें इष्ट वाटेना म्हणून त्यांनीं सनातनीयांना साथ दिली व सरकारनें धार्मिक बाबतींत हात घालूं नये अशी ओरड केली. ज्या इसलामी उर्दू वर्तमानपत्रांत नेहमीं हिंदूंच्या हिताबद्दल अनास्था दाखविली जाते, इतकेंच नव्हे तर विरोध होत असतो, त्यांस हिंदू धर्माबद्दल प्रेमाचा पान्हा फुटला व हिंदू धर्माचे गोडवे गाऊन विधवाविवाह शास्त्रबाह्य आहे, असें तीं प्रतिपादन करूं लागलीं. ज्या सनातनीयांवर हीं पत्रें नेहमीं टीका करीत त्यांनीच या पत्रांकडे धांव घेण्यास सुरवात केली. आजपर्यंत केव्हांही सरकारला लोकमताची जरूरी भासली नाहीं. ती या बिलाचे वेळेस भासूं लागली, व नियमाविरुद्ध जे कौन्सिलचे सभासद नाहींत त्यांस बिलावर चर्चा करण्याची परवानगी देण्यांत आली. ह्या बिलाचे मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न केल्या गेल्या व जरी रावसाहेबांनीं

आटोकाट प्रयत्न केले, तरी आपल्या डोळ्यांदेखत हें बिल पास होण्याचें भाग्य त्यांस लाभलें नाहीं. अजूनही ह्या बिलाचा निकाल लागलेला नाहीं.

रावसाहेबांचें आणखी एक महत्त्वाचें बिल म्हणजे संमतिवयासंबंधीं होतें. इं. पीनल कोडप्रमाणें १४ वर्षांच्या खालील एखाद्या बालिकेशीं एखाद्या पुरुषानें संभोग केला तर तो संभोग जबरी संभोग समजला जातो व तो शिक्षेस पात्र होतो व पुरुषास स्वपत्नीच्या बाबतींत ही वयोमर्यादा १३ वर्षें ठरविलीं आहे. परंतु हैद्राबादच्या कायद्यांत वयाबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. ह्याचा अर्थ असा होतो कीं, नवऱ्यास स्वस्त्री-संभोगाच्या आड तिचें वय येऊं शकत नाहीं व परस्त्रीसंबंधींसुद्धां वयाची अट नसल्यामुळें तिच्या इच्छेविरुद्ध संभोग झाला नाहीं असें ठरलें तर कोणीही पुरुष शिक्षेस पात्र होऊं शकत नाहीं. परंतु ह्या बिलासही सनातनीयांकडून व विशेषतः मुसलमानांकडून कसून विरोध झाला, व हें बिल सिलेक्ट कमिटीकडे सुद्धां जाऊं शकलें नाहीं. ह्या कायद्याच्या चर्चेच्या वेळेस सुद्धां सभासद नसलेल्या लोकांस चर्चा करण्याची परवानगी दिली गेली व कौन्सिलहॉलमध्यें असेंही नाटक करण्यांत आलें कीं, एका मुसलमान गृहस्थानें एका हिंदु मुलीस सभागृहीं उभें करून सांगितलें कीं, ह्या मुलीचें वय १२ पेक्षां कमी आहे. तरीपण ही संसारास योग्य नाहीं असें कोण म्हणेल? परंतु ह्याबद्दल तेथें जमलेल्या बहुजनसमाजास राग आल्याचें किंवा विषाद वाटल्याचें यत्किंचितही चिन्ह दिसलें नाहीं. तेव्हां अशा परिस्थितींत हें बिल पास होणें अशक्यच होतें असें म्हटलें पाहिजे.

रावसाहेब हैद्राबाद येथील म्युनिसिपालिटीचेही पुष्कळ वर्षें सभासद होते. ब्रि. हिंदुस्थानांतील म्युनिसिपल ॲक्टाचे धर्तीवर येथें कायदा नाहीं व म्युनिसिपालटीचा कर देणारांस आपलेतर्फे प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकारही नाहीं. ब्रि. हिंदुस्थानचे पद्धतीवर म्युनिसिपल बिल कौन्सिलमध्यें सुमारें २५ वर्षें भिजत पडलें आहे. पण अद्याप काय-

याचें स्वरूपानें तें अलंकृत झालें नाहीं. जे म्युनिसिपालिटीचे मेंबर आहेत त्यांची दोन दोन वर्षांनीं पाळीपाळीनें मुदत संपते, व बाकी राहिलेले सभासद त्यांस किंवा बाहेरील मनुष्यांस निवडून घेतात. येथील म्युनिसिपालिटी सर्वस्वी एक सरकारी खातें आहे,व लोकांस झाडलोटीचे सुद्धां अधिकार असूं नयेत, याचें रावसाहेबांस फार वाईट वाटे. त्याबद्दल त्यांनीं स्थानिक पत्रांत एक दोन झणझणीत लेखही दिले होते. कोणत्याही परिस्थितींत कमी कां होईना, पण जितकें कार्य होईल तितकें करावें, असा रावसाहेबांचा स्वभाव असल्यामुळें, त्यांनीं म्युनिसिपॅलिटींत राहूनही शक्य ती समाजसेवा केली.

# प्रकरण ७ वें

## स्वभाव–वर्णन

रावसाहेबांचा स्वभाव अत्यंत शांत होता. त्यांना केव्हांही राग येत नसे व आला तर ते केव्हांही बाहेर दाखवीत नसत. त्यांचा आपल्या मनावर पूर्ण ताबा असे. त्यांनीं आपल्या मनास अशा प्रकारचें शिक्षण दिलें होतें कीं त्यांचे मनोविकार त्यांच्या ताब्यांत रहावे. ह्याचा अर्थ त्यांस मुळींच राग येत नसे असें नाहीं. परंतु राग आला तरी ते दर्शवीत नसत. ते रागावले म्हणजे आपल्या डोक्यावरून किंवा कपाळावरून हात फिरवीत व स्वस्थ रहात. अगदीं खालच्या दर्जाच्या नौकरास सुद्धां ते कधींही सडेतोड रीतीनें बोलत नसत. ते नौकरास सुद्धां अहो जाहो म्हणत व आपल्या मुलांसही एकेरी नांवानें संबोधीत नसत. जेव्हां ते कडेवरील मुलांससुद्धां अहो जाहो म्हणत व नांवापुढें राव हा बहुमानार्थी शब्द लावून त्यांस हांक मारीत तेव्हां मात्र त्यांची गम्मत वाटे. ते बोलण्यांत कधींही कोणास नाराज करीत नसत व दुसऱ्यांशीं बोलतांना ते त्यांस बहुमानानें संबोधीत. पुष्कळ वेळां असें होई कीं, आपल्या स्नेह्याच्या घरीं चहा किंवा एखादा पदार्थ घेत असतांना तो चांगला झाला नसला तरी ते नांव ठेवीत नसत. उलट तो पदार्थ "फार छान, फार छान" म्हणून त्याची स्तुति करीत. ह्यामुळें ते पदार्थाची स्तुति करूं लागले, म्हणजे त्यांचे स्नेही समजत कीं हा पदार्थ बिघडला आहे. ह्यावरून कल्पना येईलच कीं दुसऱ्यास नाराज करणें, किंवा त्याचें मन दुखविणें त्यांना सहसा आवडत नसे.

त्यांस कोणत्याही प्रकारचें व्यसन नव्हतें व ते अखेरपर्यंत विद्यार्थि-दशेप्रमाणें रहात असत. जेवण झाल्यावर पुष्कळांना कमींत कमी सुपारी तरी खाण्याची संवय असते परंतु त्यांस तीही नव्हती. विडा खाणें

त्यांना आवडत नसे, व आपल्या विशेष संबंधाच्या मनुष्यानें खाल्लेला सुद्धां खपत नसे. त्यांना खाण्यापिण्याचीही विशेष चटक नसे, व ऐषआरामाचे तर ते शत्रूच होते. ते नेहमीं "साधी राहाणी व उच्च विचार सरणी" ह्या तत्त्वाचें अवलंबन करीत असत. श्रीमंती असून व उपभोगाचीं साधनें जवळ असतांनासुद्धां इतक्या अनासक्तीनें राहणें ही फार मोठी गोष्ट आहे, व त्याचाच परिणाम असा दिसतो कीं, रावसाहेबांचें उदाहरण डोळयासमोर असल्यामुळें हैद्राबाद येथें वकीली करणारे लोक अत्यंत साधेपणानें राहतात व त्यांस कोणत्याही प्रकारचें व्यसन नाहीं.

रावसाहेबांचा करमणुकीचा विषय म्हणजे पत्ते होत. पत्ते खेळण्याचा त्यांना फार नाद असे, व ते उत्तम खेळत असत. हैद्राबाद येथें एखादी महाराष्ट्रीय नाटक मंडळी आली म्हणजे बहुधा ते त्यांच्या खेळास जात असत. त्यांत त्यांचा हेतू करमणूक हा होताच. परंतु आपल्या मंडळीस प्रोत्साहन देणें हाही त्यांचा हेतू असे. तसेंच स्थानिक विद्यार्थी मंडळीकडून नाटक झाल्यास, ते अखेरपर्यंत हजर राहून त्यांस प्रोत्साहान देत. त्यांचें तिसरें करमणुकीचें साधन म्हटलें म्हणजे प्रवास होय. प्रवास करण्याचा त्यांना फार नाद असे व एका दिवसाची जरी सुट्टी मिळाली तरी ते तिचा फायदा घेऊन कोठें तरी जाऊन येत. पुष्कळ वेळां असेंही होई कीं ते एखाद्या गांवीं जात, तेथें दोन तीन तास रहात व पुन्हां तेथून परत निघत. तेवढ्या काळांत त्यांचें कांहीं कामही होत नसे, व पुष्कळ वेळां कांहीं काम नसेही.

त्यांना इतर कोणतेंही व्यसन नसलें तरी त्यांना व्याख्यानाची मात्र इतकी आवड होती, कीं व्याख्यान हें त्यांना व्यसनासारखेंच होतें. आठवड्या पंधरवड्यांतून एखादें व्याख्यान झालें नाहीं, तर त्यांना बरें वाटत नसे. त्यामुळें कोठलेंही व्याख्यानाचें आमंत्रण त्यांनीं कधींही नाकारलें नाहीं. व्याख्यान देण्यापूर्वी, ते त्याची तयारी मात्र चांगली करीत. जशी स्वतः त्यांची व्याख्यान देण्याची तयारी होती, तशी इतरांचीं व्याख्यानें ऐकण्याचीही त्यांना आवड असे.

हैद्राबाद संस्थानांत सर्क्युलर नंबर ५३ प्रमाणें कोणतेंही व्याख्यान, १० दिवस पूर्वी अर्ज देऊन परवानगी घेतल्याशिवाय, होऊं शकत नाहीं. याचा परिणाम पुष्कळ वेळां असा होत असे कीं, एकाद्या पुढाऱ्याचा मृत्यू झाला, तर त्याबद्दल दुखवट्याची सभा लागलीच होऊं शकत नाहीं; कारण तो अमक्या दिवशीं मरणार हें दहा दिवस पूर्वी समजत नाहीं व परवानगी घेतां येत नाहीं ! त्यामुळें रावसाहेबांचा फार कोंडमारा झाला. पण हें सर्क्युलर प्रवचनास लागू नसल्यामुळें ते पुष्कळवेळां प्रवचनरूपेंच व्याख्यान देत, आणि त्यांच्या प्रवचनाचे विषयही पुनर्विवाह, अस्पृश्योद्धार किंवा शेतकीसुधारणा अशा प्रकारचे असत. त्यांच्या वाचनाचे विषय विशेषतः वाङ्‌मय व इतिहास हे असत. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल त्यांना फार प्रेम असे, व नेहमीं त्यांच्या हातांत भारत इतिहास संशोधक मंडळानें प्रसिद्ध केलेलें एखादें पुस्तक असे. त्यांची बुद्धि चौकस व चिकित्सक असे, व ज्या वाचनामुळें ह्या बुद्धीचा विकास होईल अशींच पुस्तकें ते वाचीत. कादंबऱ्यांबद्दल त्यांना तिटकारा वाटत असे, व लोक कादंबरींत इतके गर्क कां होतात ह्याचें त्यांस आश्चर्य वाटे. ते केव्हांही प्रवासास गेले म्हणजे दोन तीन पुस्तकें तरी आपल्या जवळ ठेवीत, व गाडींत सारखें त्यांचें वाचन चालें. घरीं परत येईपर्यंत एक दोन पुस्तकें तरी ते वाचून टाकीत. वाचनाचा त्यांना इतका नाद होता कीं, शेवटीं शेवटीं वृद्धापकाळामुळें त्यांचे डोळे अधू झाले होते, व त्यांस वाचतां येत नसे, तरी त्यांनीं वाचक ( Reader ) ठेवून ते त्याकडून वाचून घेत.

त्यांची नीतिमत्ता वाखाणण्यासारखी होती व स्त्रियांपासून ते फार अलिप्त रहात. होतां होईल तों ते स्त्रियांशीं आपला संबंध येऊं देत नसत. त्यांचें व्रत एखादे वेळेस थोडें जास्तच कडक वाटे. कारण ते आपल्या सुनेशीं सुद्धां क्वचितच बोलत असत. रावसाहेबांचें हें व्रत त्यांच्या स्नेह्यांस माहीत असल्यामुळें, त्यांची तरूण स्नेही मंडळी एखाद्या वेळेस गंमतीनें असें म्हणत कीं, रावसाहेबांस बैठकींतून घालविण्याचा

सोपा मार्ग म्हणजे एखाद्या स्त्रीला बोलवावें. वारांगनांचें गाणें सुद्धां ऐकूं नये असें त्याचें व्रत होतें. ते केव्हांही वारांगनांच्या बैठकीस जात नसत, व तेथें जाणें व बसणें पाप समजत. यदा कदाचित् चुकून तसें झालें तर प्रायश्चित्त म्हणून उपवास करीत.

त्यांचा स्वभाव फार भिडस्त असे व त्यामुळें त्यांस पुष्कळवेळां त्रासही सोसावा लागे. तरी पण ते तो त्रास सहन करीत व कधींही असें निदर्शनास येऊं देत नसत कीं त्यांस त्रास होत आहे. त्यांचा भिडस्तपणा घरीं सुद्धां असे, व मोकळेपणानें कांहीं हवे असल्यास ते सांगत नसत. इतकेंच नव्हे तर भूक लागली तरी सद्धां सांगत नसत, किंवा दुसऱ्यास कळूं देत नसत. यामुळें पुष्कळ वेळां त्यांच्या घरच्या किंवा बरोबरच्या माणसास अडचण पडे. रावसाहेब हे केव्हां केव्हां बेगम पेठेंतील आपल्या बंगल्यांत किंवा शहरांतील बंगल्यांत जेवत. त्यामुळें एक दोन वेळां असें झालें कीं, ते शहरांत आले ते बेगमपेठेहून जेवून आले असतील ह्या कल्पनेवर त्यांस कोणी जेवणाबद्दल विचारलें नाहीं, व रावसाहेबांनींहिं स्वतः सांगितलें नाहीं. ह्याचा परिणाम दोन घरचा मालक ( पाहुणा नव्हे ! ) उपाशी राहिला. त्यांच्या घरच्या मंडळींच्या ही गोष्ट लक्षांत येतांच दोन्ही ठिकाणीं त्यांची विशेष व्यवस्था ठेवण्यांत आली. पण ह्याचाही परिणाम असा झाला कीं त्यांना कधीं दोन वेळां जेवावे लागे. त्यांच्या ह्या भिडस्तपणामुळें व स्त्रियांसंबंधीं त्यांच्या वागणुकीच्या पद्धतिमुळें त्यांच्या शेवटल्या आजारांत त्यांना अत्यंत त्रास झाला. मुंबईस त्यांनीं डोळ्याचें ऑपरेशन केलें होतें, व ते पुण्यास येऊन राहिले होते. त्यांस मधूमेहाचा विकार पर्वीपासूनच होता. दुखणें जेव्हां वाढलें तेव्हां त्यांच्या शुश्रुषेकरितां एक नर्स ठेवण्यांत आली होती. शेवटच्या दिवशीं त्यांस लघवीस लागली परंतु ते नर्सला स्पष्ट सांगेनात. बाथ रूममध्यें व्यवस्था करा अशी त्यांनीं सूचना केली. त्याप्रमाणें नर्सनें व्यवस्था केली. परंतु त्यांस एकटें

राहूं देणें धोक्याचें होतें. म्हणून ते बाथरूमध्यें जातांच नर्स बाहेर पडली नाहीं, व रावसाहेबही कांहीं जरूर नाहीं म्हणून परत फिरले. नर्सला रावसाहेबांचा भिडस्त स्वभाव माहित नसल्यामुळें तिला कांहींच उमज पडेना. दोन तीन वेळां असें झालें व शेवटीं नाइलाज म्हणून रावसाहेब आपल्या खोलींतून, उठून मे महिन्याच्या भर उन्हाळ्यांत, इतके आजारी असतांही, लघुशंकेकरितां नेहमींच्या ठिकाणीं दूर गेले. त्याचा परिणाम असा झाला कीं, ते तेथेंच जवळ जवळ बेशुद्ध झाले.

रावसाहेब फार उदार अंतःकरणाचे व परोपकारी होते. महाराष्ट्री-यांची संस्थानांत एकही संस्था नसेल कीं जीस त्यांच्या औदार्याचा फायदा झाला नसेल. ज्या ज्या व्यक्तींचा त्यांच्याशीं निकट संबंध आला, त्यांचेवर रावसाहेबांचे थोडेफार उपकारच झाले. कोणीही गरीब विद्यार्थी रावसाहेबांकडे गेला नाहीं असें होत नसे व त्यास कांहीं मिळालें नाहीं असेंही कधीं झालें नाहीं. १९०८ सालीं जेव्हां मुसा नदीला महापूर येऊन लोकांचीं घरेंदारें वाहून गेलीं होतीं व हजारों माणसें निराश्रित होऊन अन्नवस्त्रास मोताद झालीं होतीं, त्यावेळीं रावसाहेबांनीं आपल्या जवळ जेवढी शिल्लक होती तेवढी काढून निरा-श्रितांस अन्नवस्त्र दिलें. लोकांची दीनावस्था पाहून त्यांना रडें कोसळलें. त्यांच्या औदार्याचा ओघ संस्थानाबाहेरही वळला, व बाहेरच्याही पुष्कळ संस्थांस त्यांनीं उदार अंतःकरणानें मदत केली कोणत्याही संस्थेच्या उद्घाटन किंवा वार्षिक समारंभाच्या वेळेस ते हजर असले तर ते त्या संस्थेस थोडीफार देणगी देत असत. त्यांनीं आपल्या आयुष्यांत ज्या ठळक ठळक देणग्या दिल्या त्यांची जरी बेरीज केली तरी तो आंकडा पाऊण लाख होईल.

रावसाहेबांनीं पुष्कळ तरुणांस वकिलीच्या धंद्यांतही मदत केली. पुष्कळ वकील संस्थानांत असे आहेत कीं त्यांच्या मदतीनेंच ते पुढें आले. त्याचप्रमाणें त्यांच्याजवळ कारकून या नात्यानें राहिलेले लोकही आज वकील आहेत व त्यांची वकिली चांगली चालली आहे. याशिवाय

मासिक स्थानिक वर्गण्या व विद्यार्थ्यांस मासिक मदत यांची रकम दरमहा जवळ जवळ २०० रुपये असे. एकदां रावसाहेब गुरुकुलास गेले होते, व तेथून परत फिरतांना स्टेशनावर त्यांचे चिरंजीव व इतर विद्यार्थी त्यांस पोहोंचविण्यास आले होते. विद्यार्थ्यांनीं खाऊकरितां त्यांस विचारिलें तर रावसाहेबांनीं लगेच आपल्या खिशांतून १०० रुपयाची नोट काढून दिली. विद्यार्थी आश्चर्यचकित झाले व ते म्हणाले कीं आम्हांस दोन चार रुपये पुरे झाले. परंतु रावसाहेबांनीं त्यांस 'राहू द्या' एवढेंच उत्तर दिलें.

रावसाहेबांचा स्वभाव दिसावयास फार मऊ दिसे. परंतु ते फार करारी होते, व आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास ते कचरत नसत. मागें सांगितल्याप्रमाणें त्यांच्या करारी स्वभावाची साक्ष म्हणून दोन उदाहरणें पुरीं आहेत. एक आपल्या मुलांस लहानपणींच आपल्या कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध गुरुकुलांत ठेवणें व दुसरें त्यांच्या नोकरीच्या मुदतींत वाढ करून घेणें.

रावसाहेब मोठे स्वाभिमानी होते. ते दुसऱ्यास मान देत, याचा अर्थ ते हांजी हांजी करीत किंवा ते स्वतःस मुळींच किंमत देत नसत असा नाहीं. हायकोर्टांत वकील म्हणून काम करीत असतांना एकदां एका न्यायाधिशानें त्यांच्याबद्दल विनाकारण कांहीं टीकात्मक शब्द निकालांत लिहिले होते. रावसाहेबांस त्याचा फार राग आला. त्यांनीं सर न्याया-धीश व इतर न्यायाधीश यांचेकडे तक्रार केली व निकालांतील ते शब्द काढून टाकविले. एकदां एका व्याख्यानांत असें झालें होतें कीं एका प्रसिद्ध वक्त्यानें आर्यसमाजावर व त्याबरोबरच रावसाहेबांवर टीका केली होती. रावसाहेबांनीं त्याचें सणसणीत उत्तर दिलें व बाजू जिंकली.

सार्वजनिक कामामध्यें त्यांचा एक विशिष्ट गुण असा होता कीं, लोकोपयोगीं कामें नेहमीं व्हावींत अशी त्यांना तळमळ असे. नेहमीं असें होतें कीं कार्य करण्याच्या पद्धतींत मतभेद होतो. त्यामुळें निर-

निराळे गट उत्पन्न होतात. गट झाले म्हणजे एकमेकांबद्दल अनादर उत्पन्न होतो व कलहाचें बीजारोपण होतें. एका पक्षाचे लोक दुसऱ्या पक्षाच्या कार्याला हातभार लावीत नाहींत. पुष्कळ वेळां असेंही होतें कीं, एका पुढाऱ्यास विशिष्ट प्रकारची कार्यपद्धति आवडते किंवा अमुक परिस्थितींत अमूक करणेंच योग्य आहे असें त्यास वाटतें व त्याच्या म्हणण्याप्रमाणें कार्यास सुरवात झाली तर तो त्या कार्यास मदत करतो. परंतु त्याच्या म्हणण्याप्रमाणें कार्य झालें नाहीं तर त्यांतून तो अंग काढून घेतो, इतकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां विरोधही करतो. रावसाहेबांचा स्वभाव असा मुळींच नव्हता. त्यांचें लक्ष नेहमीं कार्याकडे असे, मग तें कार्य कोणत्याही संस्थेकडून किंवा कोणत्याही पक्षाकडून होवो. त्यामुळें ते सर्व प्रकारच्या कार्यांत भाग घेत. त्यांचीं भाषणें सामाजिक सुधारणा संघ, सनातन धर्म संस्था, आर्यसमाज, अस्पृश्यता निवारक संघ वगैरे निरनिराळ्या मतांच्या व विचारांच्या संस्थाकडून होत असत, व ते ज्या संस्थेकडून बोलत त्या संस्थेच्या तत्त्वाला बाध येऊं देत नसत, व स्वतःचें तत्त्वही सोडीत नसत.

पुष्कळ वेळां असेंही होई कीं, त्यांचें मत इतर कार्यकर्त्यांच्या मताहून भिन्न पडे. तरीपण बहुमत जर त्यांच्या विरुद्ध असेल तर ते बहुमतास मान देत व कार्यांत तितकेंच लक्ष घालून मदत करीत. साधारणतः त्यांची सार्वजनिक कार्य करण्याची पद्धति अशी होती कीं, प्रत्येक संस्थेंत जो विशेष मेहनतीनें व कळकळीनें काम करतो त्याच्याच मताला ते जास्त महत्त्व देत, व त्यांची अशी इच्छा असे कीं त्याच्याच मताप्रमाणें कार्य व्हावें. ते असें म्हणत कीं अमुक मनुष्य पूर्ण विचार करून पुढाकारानें एक कार्य करतो किंवा आपल्या कामाची दिशाही ठरवितो. आम्ही आयत्या वेळेस जाऊन विशेष विचार न करितां आपलेंच तट्ट दामटण्याचा प्रयत्न करणें योग्य नाहीं व त्यामुळें कार्य यशस्वी न होतां त्यांत विनाकारण अडथळे मात्र उत्पन्न होतात. अशा प्रकारचें धोरण असल्यामुळें कार्य सुलभ होई, व कार्यकर्त्यांलाही उत्साह वाटे.

याचा अर्थ असा नव्हे कीं ते आपलीं मतें बाजूस ठेवीत. त्यांचा प्रयत्न असा असे कीं, कार्याचें धोरण सर्वांच्या विचारानें ठरावें व तपशील विशिष्ट कार्यकर्त्यांच्या मतानें ठरावा.

सार्वजनिक कार्याकडे त्यांचे विशेष लक्ष असल्यामुळें त्यांची अशी इच्छा असे कीं, लोकोपयोगीं कामें नेहमीं व्हावीं परंतु कोठेंही कार्यकर्त्यांची उणीव असतेच. विशेषतः ही उणीव हैद्राबादसारख्या मागासलेल्या ठिकाणीं तर जास्त भासते. त्यामुळें रावसाहेबांना नेहमीं अडचण पडे, व ही अडचण दूर करण्याकरितां त्यांचे तरुण मंडळीकडे बरेंच लक्ष असे. कोणी नवीन तरुण थोडा बहुत होतकरू दिसला कीं रावसाहेब लागलीच त्याची निवड करीत व त्यास सार्वजनिक कामांत ओढीत. त्यांचा स्वतःचा दर्जा जरी मोठा होता तरी पण ते स्वतः त्याकडे दहा पांच वेळां जात, त्याच्याशीं संभाषण करून त्याच्या मनाची व वृत्तीची पारख करीत; त्याची योग्यती स्तुति करून त्याच्या मनांत आत्मविश्वास उत्पन्न करीत, व त्याचा सार्वजनिक कार्य करण्याचा हुरुप वाढवीत. माणसांची परीक्षा त्यांस चांगली असल्यामुळें ते चांगलीं माणसें हुडकून काढीत व तीं आपलीशीं करून ठेवीत. त्यामुळें त्यांच्याबरोबर काम करण्यास कोणासही आनंद वाटे. एखादा कार्यकर्ता एकादे वेळेस कांहीं कारणामुळें हिरमुसला झाल्यास रावसाहेब लागलीच त्याची समज काढीत व त्यास कार्यास प्रवृत्त करीत. त्यांच्या सहकारी मंडळीपैकीं कोणीही एक दोन सभांस आला नाहीं, किंवा तो कार्यापासून अलिप्त होत आहे असा त्यांस यत्किंचित् संशय आल्यास ते लागलीच त्यास भेटून तो कार्यप्रवृत्त होईल अशी व्यवस्था करीत. ते स्वतः इतके कार्यनिष्ठ होते कीं, कुठल्याहि सार्वजनिक कार्यास हजर राहून हातभार लावणें ते आपलें कर्तव्य समजत असत. कुठल्याहि सभेस ते हजर नाहींत असें कधीं नसे. प्रत्येक सभेस मग ती लहानांची असो वा मोठ्यांची असो, ते नियमानें व वेळेवर हजर रहात, व दक्षतेनें सर्व

कार्य पहात. त्यांच्यामुळें त्यांच्या सहकाऱ्यांसही टाळाटाळी करतां येत नसे व त्यामुळें सर्व कार्यें व्यवस्थित व यशस्वी रीतीनें पार पडत.

सार्वजनिक कार्यांत ते मुरलेले असल्यामुळें व परिस्थितीची त्यांना पारख असल्यामुळें ते पुष्कळ कार्यें मोठ्या कुशलतेनें निभावून नेत. रावसाहेब अध्यक्ष असले म्हणजे तरुण मंडळीस आपल्या स्वतःबद्दल फारशी काळजी वाटत नसे. कोणी वक्ता कितीही कडक बोलला तरी त्यावर संकट येण्याची भीति नसे. कारण रावसाहेब अध्यक्ष या नात्यानें जें भाषण करीत त्यांत त्यास सांभाळून घेत. पुष्कळ वेळीं वक्त्याच्या भाषणाचा ते फार गमतीदार अर्थ करीत व व्याख्यात्याचा हेतु अमूक होता असें सांगत. त्यामुळें दोन्हीं कार्यें होत. कडक बोलणारा बोलून जाई व रावसाहेब त्याच्यावरची जबाबदारी उडवून लावीत. रावसाहेबांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे सहकाऱ्याबद्दल त्यांची कळकळ होय. एखादें महत्त्वाचें कार्य झालें कीं रावसाहेबांचें पहिलें काम म्हणजे कोणावर कांहीं किटाळ तर येत नाहींना हें पाहणें. त्यांचें वजन फार होतें व अधिकारी वर्गांतही त्यांचे पुष्कळ मित्र असत. त्यामुळें महत्त्वाच्या बातम्या त्यांना फार लवकर समजत, व कांहीं अनिष्ट परिणाम होऊं नये ह्याबद्दल लागलेच ते प्रयत्न करीत. एखादा चुकीचा रिपोर्ट गेला असल्यास ते लागलीच त्याची दुरुस्ती करीत, व आपल्यावर जबाबदारी घेऊन प्रकरणें जागच्या जागींच मिटवीत. आपल्या एखाद्या मित्रावर कांहीं किटाळ येण्याची गुणगुण जरी त्यांच्या कानांवर गेली, तरी ते अस्वस्थ होत. ते आपलीं दहा कामें बाजूस सारून त्याचा शोध लावीत व जोंपर्यंत त्या बातमींत विशेष तथ्य नाहीं अशी खातरी होत नसे तोंपर्यंत त्यांस चैन पडत नसे. कोकोनाडा येथें सन १९२३ सालीं जेव्हां राष्ट्रीय सभा भरली, तेव्हां कोकोनाडा जवळ असल्यामुळें हैद्राबादेंतून पुष्कळच मंडळी गेली होती. तेथील राष्ट्रीय वारें व अनेक सभा पाहून, हैद्राबादकरांनींहीं तेथें एक सभा केली व त्यांत कांहीं ठराव पास केले. रावसाहेब त्यावेळेस न्याया-

सनावर असल्यामुळें येथील सरकारी नौकरीच्या नियमाप्रमाणें त्यांना राष्ट्रीय सभेस जातां येणें शक्य नव्हते, व म्हणून ते गेले नाहींत. ह्या सभेबद्दल हैद्राबादेस बरीच गडबड उडाली, व रोज नव्या नव्या कंड्या पिकं लागल्या. कोणी सांगे कीं ह्या सर्व लोकांस हैद्राबाद् सरकार चांगलीच शिक्षा करील. कोणी म्हणे जेवढे वकील हजर होते त्यांच्या सनदा परत घेण्याचें ठरलें आहे. कोणी म्हणे यांतील पुढारी व कार्यकर्त्यांस संस्थानांत येऊं देऊं नये असे हुकूम सुटले आहेत. अशा निरनिराळया बातम्यांमुळें साहाजिकच लोकांचीं मनें चिंताग्रस्त झालीं. येथील त्यावेळच्या एका प्रसिद्ध वकीलांनीं कोकोनाड्याच्या सभेंत प्रामुख्यानें भाग घेतला होता. त्यामुळें त्यांच्याबद्दल जास्त बातम्या पसरल्या होत्या. कोर्टांतच त्यांस ही बातमी समजली व त्यामुळें येतांना ते आपल्या एका पुढारी व सहकारी मित्रास मुद्दाम भेटून त्यांच्याजवळ ते चौकशी करूं लागले. परंतु त्या मित्रांनीं त्यांची उलट टरच करण्यास सुरवात केली. ते म्हणाले तुम्हाला जर इतकी भीति वाटते, तर तुम्ही सार्वजनिक कार्यांत पडता कशाला ? ह्या भाषणामुळें ते बिचारे खजील होऊन घरीं गेले. रावसाहेबांस ही बातमी कोर्टांतच समजली. वास्तविक ह्या चळवळींत रावसाहेबांचा मुळींच संबंध नव्हता. तरी पण ही बातमी ऐकिल्यामुळें त्यांस स्वस्थ बसवेना. कोर्टांचें काम आटोपून घरीं न जातां किंवा चहा फराळ कांहीं न करितां, ते खरी परिस्थिति काय आहे याचा शोध करूं लागले. पांच सहा तास हिंडल्यावर त्यांस समजलें कीं ह्या बातमींत कांहीं अर्थ नाहीं, व अशी खातरी झाल्यावर रात्रीं अकराचे पुढें त्या वकील मित्राकडे जाऊन त्यांनीं त्यांस धीर दिला, व बातम्या खोट्या आहेत असें सांगितलें. वस्तुतः त्या वकील मित्राचें व रावसाहेबांचें याबद्दल भाषणही झालें नव्हतें. रावसाहेबांच्या ह्या कृतीमुळें त्यास फार आश्चर्य वाटलें,व रावसाहेबांच्या कळकळीमुळें त्यास गहिंवर आला. पण आमचे

दुसरे एक मित्र कोकोनाडा येथें हैद्राबाद परिषद भरविण्यांत पुढाकार घेणारे परिषदेचे सेक्रेटरी श्री. राघवेंद्र शर्मा यांची वकीलीची सनद मात्र कोकोनाडाहून परत आल्यावर निजाम सरकारचे फर्मानानें काढून घेण्यांत आली. रावसाहेबांच्या सहकाऱ्यांस त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटे. त्याला त्यांचा हा गुणही प्रामुख्यानें कारणीभूत होता.

---

# प्रकरण ८ वें

## शेवटचे दिवस.

मागील प्रकरणांवरून वाचकांच्या ही गोष्ट लक्षांत आलीच असेल कीं, न्या. केशवरावसाहेब हे संस्थानांतील सार्वजनिक कार्यांचे जनकच होते. त्यांचें शिक्षण जरी विशेष झालें नव्हतें, तरी ते फार बहुश्रुत होते. वाचनानें व देशपर्यटनानें त्यांनीं आपलें ज्ञान वाढविलें होतें. विद्वानांच्या संगतींत काल घालविण्याचाही ते प्रयत्न करीत व अशी संधि दवडीत नसत. महाराष्ट्रांतील बहुतेक थोर व विद्वान् गृहस्थ त्यांचे मित्र होते; व त्यांपासून ते ज्ञान मिळवीत. त्यांच्या पूर्व वयांत त्यांस इंग्रजी शिकणें शक्य झालें नाहीं. म्हणून त्याची उणीव थोडी बहुत त्यांनीं आपल्या उत्तरवयांत भरून काढली. साधारणतः इंग्रजी भाषण व लेखन त्यांस समजत असे. पण बोलण्याचा मात्र त्यांस सराव नव्हता. तरीपण त्यांच्या एकंदर माहितीवरून व ज्ञानावरून कोणासही असें वाटत नसे कीं, त्यांस इंग्रजी विशेष येत नाहीं. त्यांचे विचार फार पुढें गेलेले व मन फार सुसंस्कृत असे. त्यांची ज्ञान मिळविण्याची इच्छा वृद्धापकाळींही कमी झाली नव्हती. सर्व हिंदुस्थानभर दोन तीन वेळां फिरून त्यांनीं प्रत्यक्ष ज्ञान मिळविलें होतें. इंग्लंडचीच यात्रा शिल्लक राहिली होती. ती त्यांनीं आपल्या वयाच्या ६२ व्या वर्षीं करून घेतली. इंग्लंडांत जाण्याचा त्यांचा मुख्य उद्देश, इंग्लंडची परिस्थिति प्रत्यक्ष डोळ्यानें पहावी. इंग्रज हे राज्यकर्ते कसे व कोणत्या गुणानें झाले हें पहावे, व त्यांची समाजसंस्था कशा प्रकारची आहे व त्यांच्या व आपल्या समाजव्यवस्थेंत काय फरक आहे याचा अभ्यास करावा असा होता. रावसाहेबांनीं विलायतच्या प्रवासाकरितां एकंदर तीन महिने खर्च केले व त्यांत पुष्कळ माहिती मिळविली.

रावसाहेबांच्या शेवटल्या आयुष्यांत त्यांचा तीन खटल्यांत प्रत्यक्ष संबंध आल्यामुळें त्यांना मानसिक त्रास फार झाला. पक्षकार म्हणून त्यांच्या आयुष्यांत ह्या तीनच खटल्यांत त्यांचा संबंध आला, व तोही अगदीं आयुष्याच्या शेवटीं शेवटीं यावा याबद्दल त्यांस फार वाईट वाटे. ह्या तिन्ही खटल्यांचा अजून निकाल न झाल्यामुळें त्याबद्दल विशेष लिहिणें योग्य होणार नाहीं. तरी पण त्यांचा नामनिर्देश केल्या-शिवाय हें चरित्रही अपूर्णच राहील. म्हणून संक्षेपानें थोडी तरी हकी-कत देणें जरूर आहे.

येथें शंकरराव पथ्थरगट्टी या नांवाचे एक गृहस्थ रहात होते. त्यांची कांहीं इस्टेटही होती व त्यांस कर्जही होतें. ते वारले तेव्हां त्यांची बायको अज्ञान होती व त्यांस दुसरे कोणी नातेवाईक नव्हते. बाय-कोच्या माहेरींही कोणी योग्य मनुष्य व्यवस्था पाहणारा नव्हता. म्हणून त्या अज्ञान मुलीच्या असहाय्य स्थितीचा विचार करून व इष्टमित्रांच्या आग्रहावरून रावसाहेब कोर्टाच्या हुकुमान्वयें तिचे पालक नेमले गेले. त्यांनीं तिचें पालन केलें, व तिच्या इस्टेटीची व्यवस्थाही केली. कायद्यान्वयें ती सज्ञान झाल्यावर त्यांनीं तिची इस्टेट तिच्या स्वाधीन केली व सर्व हिशेबही समजावून दिला. तिनें कोर्टांत अर्ज करून आपणास हिशेब समजला आहे असें कोर्टास कळविलें, कोर्टानेंही रावसाहेबांस त्यांच्या जबाबदारींतून मुक्त केलें. हें सर्व झाल्यावर कांहीं काळानें त्या बाईनें रावसाहेबांच्या विरुद्ध हिशेब समजावण्याचा दावा केला. हा दावा कां झाला याचीं कारणें पाहण्याचें कारण नाहीं. विला-यतेला जाण्यापूर्वी रावसाहेबांनीं त्या बाईच्याच पक्षाच्या एका मनुष्यास पंच नेमलें. त्यांचा हेतु हा होता कीं थोडी बहुत घस लागली तरी दाव्याचा निकाल आपसांत व्हावा व विलायतेच्या प्रवासांत ह्याबद्दल काळजी असूं नये. पंचानें निकाल दिला. पण पंचाचा निकाल जेव्हां कोर्टांत दाखल झाला, तेव्हां पूर्वीच्या निकालांत पुष्कळ दुसऱ्या गोष्टी मागाहून मध्येंच दडपल्या गेल्या आहेत असें रावसाहेबांस दिसलें.

म्हणून रावसाहेबांस पंचांचा निकाल मान्य नव्हता. त्यामुळें हा दावा मिटला नाहीं व अजूनही चालू आहेच. ह्या दाव्यामुळें रावसाहेबांवर असा शिंतोडा उडविण्याचा विरोधकांचा प्रयत्न होता कीं रावसाहेबांनीं अज्ञानाच्या इस्टेस्टीचा थोडाफार अपहार केला. ज्या पुरुषानें पैशाची केव्हांच किंमत बाळगली नाहीं, त्यास अशा प्रकारचा आरोप ध्वनित करण्यानें सुद्धां फार दुःख झालें असेल यांत नवल नाहीं.

हैद्राबाद जवळ बेगमपेठ येथें वैदिकाश्रम या नांवाची एक सार्वजनिक संस्था आहे. तीस पस्तीस वर्षांपूर्वी हैद्राबाद येथील आर्य समाजाच्या पुढाऱ्यांनीं ही संस्था कायम केली. गुरुकुलाच्या पद्धतीवर, संस्थानांतही एखादें लहानसें गुरुकुल असावें असा त्यांचा उद्देश होता. ह्या संस्थेची पुष्कळ जमीनही आहे व मध्यभागावर एका लहानशा टेकडीवर एक लहान इमारतही आहे. कांहीं वर्षें १०।१५ विद्यार्थि ह्या संस्थेंत रहात असत. ह्या संस्थेची पुष्कळशी जमीन विकल्यामुळें ह्या संस्थेच्या चालकांनीं असा ठराव पास केला होता कीं ह्यापुढें संस्थेची जमीन मुळींसुद्धां विकूं नये. श्रीमंत वामनरावजी नाईक यांचा बेगम पेठ येथील बंगला या संस्थेच्या इमारतीच्या जवळच आहे. त्यांस आपल्या बंगल्याजवळ ह्या संस्थेच्या जमिनीचा थोडासा भाग हवा होता. रावसाहेब आर्यसमाजाचे प्रेसिडेंट असल्यामुळें ठरावाच्या विरुद्ध जमीन विकण्यास तयार नव्हते. रावसाहेब विलायतेस गेल्यावर संस्थेची जमीन नाईक साहेबांनीं विकत घेतली म्हणून रावसाहेबांनीं ह्या जमिनीची विक्री रद्द करण्याकरितां दावा आणिला. श्रीमंत वामनरावजी नाईक हे येथील प्रसिद्ध पुढारी व रावसाहेबांच्या बरोबरीनें काम करणारे आहेत. अशा दोन व्यक्तींमध्यें भांडण व्हावें हें कोणासही पसंत नव्हतें. रावसाहेबांसही अर्थात् दावा आणण्याचें दुःखच होई. परंतु रावसाहेब म्हणत कीं आर्यसमाजाचा अध्यक्ष या नात्यानें या मार्गाशिवाय दुसरा मार्गच मोकळा नाहीं. ह्या दाव्याचा निकाल कोर्टामार्फत पंच नेमून करण्याचें पुढें ठरलें व सध्यां याची चौकशी पंचासमोर चालू आहे.

तिसरा दावा एका पुनार्विवाहामुळें उत्पन्न झाला. गुलबुर्गा येथें एका विधवेचा एका मास्तराशीं पुनर्विवाह झाला. दोघेही ब्राह्मणच आहेत. याच सुमारास रावसाहेबांचें पुनर्विवाहाचें बिल कौन्सिलपुढें होतें व त्याबद्दल सर्व देशभर चर्चा चालू होती. ज्या दिवशीं रात्रीं पुनर्विवाह लागला त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत रावसाहेब गुलबुर्गा येथें होते. परंतु पुनार्विवाहाचे वेळेस ते तेथें नव्हते असें ते म्हणत. पुनार्विवाह विधि निर्विघ्नपणें पार पडला. परंतु मागाहून बरीच खळबळ उडाली. वधूचे वडील पुनर्विवाहाच्या विरुद्ध होते. त्यांनीं रावसाहेब व गुलबुर्गा येथील कांहीं वकील व इतर मंडळीवर विवाहाचे खोटे विधि करून फसविल्याबद्दलचा आरोप ठेवून फौजदारी खटला भरला. वराकडूनही बायको नांदावयास पाठविली जात नाहीं व ती नांदण्यास यावी असा दिवाणी दावा झाला. ह्या दिवाणी दाव्याच्या निकालापर्यंत फौजदारी खटला तहकूब रहावा असा कोर्टानें निकाल दिला. ह्या दिवाणी दाव्यांत शास्त्राधारें पुनर्विवाह होऊं शकतो किंवा नाहीं हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे व त्याबद्दल साक्षी पुरावे व शास्त्री मंडळींची तपासणी चालू आहे. हा महत्त्वाचा मुद्दा असल्यामुळें रावसाहेबांना तिकडे लक्ष देणें जरूर होतें व ते देत असत. अजून ह्या दोन्ही दिवाणी व फौजदारी खटल्यांचा निकाल झालेला नाहीं.

रावसाहेबांची प्रकृति चांगली असे. परंतु ते आपल्या वयाच्या मानानें जास्त दगदग करून घेत, ते कधीं स्वस्थ बसत नसत. त्यांस मधुमेहाचा विकार बराच जुना होता. हर्नियाचाही रोग त्यांना होताच. वृद्धापकाळामुळें त्यांच्या डोळयांत मोतिबिंदु उत्पन्न झाले होते. त्यामुळें त्यांस फार कमी दिसे. वाचतां येणें अशक्य झालें होतें. मनुष्य सुद्धां ते अंदाजावरून ओळखीत असत. डोळयांच्या इलाजाकरितां ते मार्च १९३२ मध्यें मुंबईस गेले होते. डॉक्टरनीं दोन महिने त्यांस थांबण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें ते मे महिन्यांत मुंबईस गेले. मुंबई येथील प्रसिद्ध नेत्रवैद्य डॉ. डगन ह्यांनीं त्यांचें ऑपरेशन केलें. दुसरें

ऑपरेशन जून महिन्यांत व्हावयाचें होतें. उन्हाळयामुळें पहिलें ऑपरेशन झाल्यावर ते आपले मित्र रा. राघवेंद्रराव शर्मा यांचेजवळ पुणें येथें वैदिकाश्रमांत येऊन राहिले. ता. २० मे १९३२ पर्यंत त्यांची प्रकृति चांगली होती, व ते आनंदांत दिसत होते. २० मे च्या रात्रीं त्यांची प्रकृति थोडी बिघडली. जवळच्या डॉक्टरचें औषधपाणी चालूं होतें तरी पण गुण येईना. २१ मे रोजीं दुसऱ्याही प्रसिद्ध डॉक्टरांस त्यांची प्रकृति दाखविली. सुरुवातीस डॉक्टरांना रोगाचें निदान झालें नाहीं व 'डायबिटिक कोमा'चें निदान अशा वेळेस झालें कीं, रोग इलाजाबाहेर गेला होता. त्यांचे वडील चिरंजीव रा. विनायकराव यांस, प्रकृति चांगली असल्यामुळें ता. १८ मे रोजीं हैद्राबादेस रावसाहेबांनीं कांहीं खासगी कामाकरितां पाठविलें होतें. प्रकृति बिघडेल अशी कल्पनाच नव्हती. अंतकाळीं श्री. राघवेंद्ररावाशिवाय जवळच्या आप्तेष्टांपैकीं कोणीच नव्हता. वकीली पास झाल्यावर राघवेंद्ररावांचे सामाजिक व राजकीय शिक्षण रावसाहेबांच्या सान्निध्यानेंच झालें होतें व ते त्यांच्याबरोबरच वकीली करीत होते. राघवेंद्ररावांवर रावसाहेब पुत्रवत् प्रेम करीत असत व राघवेंद्ररावही त्यांना आपल्या पित्याप्रमाणेंच समजत. ह्या दुखण्यांत शर्मांनीं रावसाहेबांची अत्यंत परिश्रमपूर्वक सेवाशुश्रूषा केली पण विधिलिखित निराळेंच होतें. अशा स्थितींत रावसाहेबांचा अंत राघवेंद्ररावांजवळ व्हावा हें शर्मांच्या पुण्याईचें व रावसाहेबांच्या निःसीम प्रेमाचें द्योतकच होय. ता. २१ मे रोजीं रात्रीं १० च्या सुमारास त्यांचा अंत झाला व त्यामुळें त्यांच्या आप्तेष्टांस व शेकडों मित्रमंडळीस अत्यंत दुःख झालें. हैद्राबाद संस्थानांतील एक फार मोठा पुढारी नाहींसा झाला.

रा. विनायकरावांस २१ तारखेस तार दिली होती. गाडी निघून गेल्यामुळें ते मोटरनेंच त्याच दिवशीं सायंकाळीं पुण्यास रवाना झाले व ते दुसरे दिवशीं १ वाजतां पुण्यास पोहोंचले. रावसाहेबांची प्रेतयात्रा संध्याकाळीं ५ वाजतां निघाली. त्याबरोबर पुण्यांतील त्यांची

पुष्कळशी मित्रमंडळी होती. स्मशानांत त्यांस हार अर्पण केले. रा. वामनरावजी नाईक हे त्या वेळेस महाबळेश्वरास होते. त्यांस ही बातमी लागल्याबरोबर ते लागलीच पुण्यास आले. आपल्या बरोबरीचा काम करणारा दिवंगत झाल्यामुळें श्री. वामनरावजींस फार दुःख झालें. हैद्राबादच्या सार्वजनिक कार्यांत श्री. वामनरावजी नाईक हे रावसाहेबांचे जबरदस्त सहकारी होते. स्मशानांत डॉ.र. पु. परांजपे, रा. नाईक व पुण्यांतीलही प्रसिद्ध पुढाऱ्यांचीं अत्यंत हृदयस्पर्शी भाषणें झालीं व सर्वांनीं त्यांच्या सार्वजनिक कार्यासंबंधीं व उदारतेबद्दल मुक्त कंठानें त्यांची प्रशंसा केली. हैद्राबाद संस्थानांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांसही त्यांच्या निधनाबद्दल दुःख झालें. त्या वेळेस रा. विनायकरावांचे नांवावर जीं कित्येक दुखवट्याचीं पत्रें व तारा आल्या होत्या त्यांवरून हें स्पष्ट आहे कीं, रावसाहेबांचें वजन जसें बहुजनसमाजावर होतें तसेंच अधिकारी वर्गावरही होतें. रावसाहेबांच्या चळवळी अधिकाऱ्यांस आवडत नसल्या तरी त्यांच्या मतांबद्दल व कार्याबद्दल त्यांना आदर वाटे.

REFBK-0004836

क्र. 4836